शनिवार । २० जून १९८१ । एक रुपया

# माणूस

## मीनाक्षिपुरम् येथे काय घडले?

त्यांनी गावाचे नाव
बदलण्याचाही
निर्णय घेतला.
—अवतीभवती
पृष्ठ....८

सई परांजपे यांचा 'स्पर्श' हा चित्रपट पारितोषिकविजेता म्हणून वास्तविक आधी गाजला. परंतु अजून तो प्रेक्षकांपुढे आलाच नाही. 'चश्मेबद्दूर' मागून येऊन पुढे गेला. आता प्रेक्षक 'स्पर्श'ची आणखी उत्सुकतेने वाट पहात आहेत.

चित्रपटपरीक्षण
पृष्ठ....२४

# पूर्वार्ध आणि उत्तरार्ध

श्री. ग. मा.

दोन दृश्यांमुळे यशवंतराव चव्हाणाची अस्वस्थता अधिकच वाढली असावी.

एकीकडे अरस कॉंग्रेसचे जगजीवनरामांसारखे नेते व बहुधा खुद्द अरसमहाशयदेखील इंदिरा गांधीशी जवळिक साधू पहात होते. जगजीवनरामाचे इंदिरा गाधींची स्तुती करणारे लोकसभेतील भाषण त्या दृष्टीने पुरेसे सूचक होते.

दुसरीकडे आपले शिष्योत्तम व मानसपुत्र श्री. शरद पवार यांचे दूत दिल्लीत घिरट्या घालत आहेत, इंदिरा गांधी-राजीव गाधी यांच्याशी काही सौदा जमतो का याची चाचपणी करीत आहेत, हेही यशवंतरावाना दिसत होते.

जगजीवनरामांसारखे स्वपक्षातील प्रतिस्पर्धी नेते किंवा शरद पवारांसारखे तरुण व तडफदार अनुयायी मुक्कामाच्या ठिकाणी अगोदरच पोचले तर आपल्याला त्यांच्या मागोमाग फरफटत जावे लागेल किंवा कुचंबलेल्या सध्याच्या स्थितीतच आणखी काही काळ कंठावा लागेल, हे चव्हाणांनी वेळीच ओळखले.

कुचंबणे किंवा फरफटले जाणे हे दोन्ही पर्याय बाद ठरवून चव्हाणानी म्हणूनच एकदम प्रवाहात उडी ठोकून लाटा उसळवून दिल्या. विलिनीकरण, एकीकरण वगैरे शाब्दिक घोळात न अडकता, अरस कॉंग्रेसपक्ष गुडाळण्याच्या सर्व लोकशाही प्रक्रिया खुटीवर टांगून ठेवून चव्हाणानी एकतर्फी, विनाअट व अगदी स्वतःपुरता निर्णय घेऊन टाकला व बाजी मारली ! उडी चव्हाणानी ठोकली असल्यामुळे पाणी आता पवारांच्या, जगजीवनरामादी नेत्यांच्या नाका-तोंडात गेले आहे. चव्हाण स्वगृही पोचले तर पवार, जगजीवनरामादिकांचा वनवास सुरू झाला. किती दिवस पवार वनवास पत्करतात हे आता पाहायचे ! □

यशवंतरावाची ही कृती इतकी अनपेक्षित, धक्कादायक होती का, की वृत्तपत्रानी त्यावर इतकी रणधुमाळी माजवावी ? संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातली, फलटणच्या मनमोहन राजवाड्यातून चव्हाणांनी मारलेली पलटउडी जे विसरले नसतील त्याना यशवंतरावांच्या आजच्या पलटउडीचे बिलकूल आश्चर्य वाटायला नको. त्या वेळी यशवंतरावानी ‘ महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे ’ असे म्हणून चळवळीतून अंग काढून घेतले व द्वैभाषिकाचे मुख्यमंत्रीपद त्यांनी स्वतःकडे खेचून घेतले. तसेच आता घडले आहे. इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाहीविरुद्ध ते कालपरवापर्यंत लढू म्हणत होते. आज एकदम त्यांनी या लढ्यातून अंग काढून घेतले व ते इंदिरा गांधींच्या पक्षालाच जाऊन मिळाले. आता संयुक्त महाराष्ट्र जसा त्यांनी कॉंग्रेसमध्ये राहून, नेहरूंचे मन वळवून वळवून मिळवला व मंगल कलशाचे ते धनी ठरले किंवा त्याना ठरवण्यात आले, तसेच एकाधिकारशाहीशी ते आत जाऊन, इंदिरा गाधीचे मन वळवून वळवून किंवा राजीवला हाताशी घेऊनच कशावरून लढणार नसतील ? त्या वेळी संयुक्त महाराष्ट्र आंदोलन जोमात होते, सारी मराठी जनता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या मागे पक्षभेद, जातिभेद विसरून एकमनाने उभी होती, तरी यशवतरावांनी ऐनवेळी संघर्षातून माघार घेऊन मनमिळाऊपणाचा गोड मार्ग पत्करला. आज तर इंदिरा गांधी-विरोधाची, एकाधिकारवादाशी टक्कर घेऊ पाहणारी कुठलीच चळवळ, जनआंदोलन अस्तित्वात नाही. जनमानसात इंदिरा गांधीचे स्थान अढळ आहे. चळवळ जोमात असतानाही जे लढ्याकडून मनमिळाऊपणाकडे वळले ते चळवळ नसताना, जनतेचा पाठिंबा नसताना लढत राहतील, खांद्यावरचे निशाण गुंडाळून ठेवणार नाहीत अशी अपेक्षा बाळगणारे बावळट किंवा अंधभक्तच असू शकतात. चूक यशवंतरावांची नाही. त्यांच्याकडून भलत्यासलत्या अपेक्षा बाळगणाऱ्यांची आहे. चव्हाणांनी हे वेळीच ओळखले की, विरोधक म्हणून, योद्धा म्हणून आपली प्रतिमा फार काही उंची गाठणारी नाही. शिवाय त्यांनी कॉंग्रेसपक्षही सोडलेला नाही. इंदिरा गाधीच्या सामर्थ्याविषयी

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : तिसरा

२० जून १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

सगळ्यांचेच अंदाज चुकले तसे त्यांचेही चुकले, एवढेच. ही चूक त्यांनी वेळीच सुधारून घेतली. दिल्लीच्या १, रेस कोर्स रोडवर कुचंबत राहून किंवा कराडला निवृत्त होऊन उर्वरित आयुष्य काढण्याऐवजी त्यानी शरणागत होऊन सत्ताप्रवाहात उडी घेतली. त्यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीशी सुसगत असाच हा निर्णय आहे.एखाद्या तत्त्वासाठी अकटोविकट संघर्ष करण्याचा, लढाऊ राजकारणाचा मार्ग चव्हाणांच्या तब्येतीला आजवर कधीच मानवलेला नाही. जे काही मिळवायचे ते लढून हस्तगत करण्याऐवजी योग्य वेळी बाजू बदलून, संधीची वाट पहात राहून, धीमेपणाने, निर्णायक क्षण अचूक पकडून त्यांनी आजवर पदरात पाडून घेतले आहे मावळत्या सूर्याला साक्षीला ठेवून उगवत्या सूर्याकडे ते आजवर जात आले व याही वेळी त्यानी यापेक्षा वेगळे काही केलेले नाही. संजय गांधीमुळे आजवर ते हे करू शकत नव्हते. कारण संजय तुफानी होता. संजयसेनेशी, संजय-कार्यपद्धतीशी जमवून घेणे चव्हाणांना कठिण गेले असते; पण संजय गेल्यावर चव्हाणांचा मार्ग मोकळाच झाला. प्रथम इंदिरा गांधीच्या परराष्ट्रीय धोरणाची स्तुती झाली मग राष्ट्रीय सरकार हाच एकमेव पर्याय असल्याचे सांगून झाले. एकाधिकारशाही, घराणेशाही, इंदिरा गांधीची कार्यपद्धती याबद्दलचे विरोधी बोलणे वगैरे तर बदच पडले. तरी इंदिरा गाधी ढिम्मच इकडे जगजीवनराम-पवार यांच्या हालचाली सुरू झाल्या. थांबावे तर उशीर होतो, न थांबावे तर शरणागती दिसेल.पण लोक विसराळू असतात ! शरणागतीचा काळा डाग पुसला जाईल. आपल्यासाठी इतिहासातले एक सोनेरी पान माडणारे पुण्यातले पत्रकार-संपादक आहेत, रॉयवादी विद्वान आहेत, करतील काही रंगसफेती पुढे ! पण उशीर होऊन गाडी चुकली तर सगळाच वांधा. तेव्हा देवाचे नाव घ्यावे आणि ठोकावी उडी झाले ! पुढचं पुढे. असा हा सगळा इंदिरा नाट्यातला यशवंत-प्रवेश घडला. वृत्तपत्रांनी उगाचच त्याला राजकीय युद्धाचे स्वरूप दिले. म. टाइम्सकार म्हणतात तशी, ' रंगू बाजारला 'ही गेली नाही. युद्धावर जणू काही ती निघाली आहे असे केसरीकारांसारखे भासवण्याचे ही कारण नाही. सध्याकाळ झाली की सगळ्यांनाच घराची ओढ लागते. तशी ती यशवतरावांना लागली असणे अस्वाभाविक नाही. त्यांच्या घराचे नाव अगदी प्रथमपासून ' राजगृह ' होते व आहे, हे मात्र नेहमी ध्यानात ठेवले पाहिजे.

¤

यंदाच्या पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत भाषण करताना शरद पवार यांनी देशात यापुढे भा. ज. प., डावे कम्युनिस्ट व काँग्रेस हे तीन मुख्य राजकीय प्रवाह उरणार असून नजीकच्या भविष्यकाळात केवळ इंदिरा आणि अरस काँग्रेसच नाही तर समाजवादी, लोकदल वगैरे सर्व आजी व माजी काँग्रेसजनांना एकत्रित येऊन देशासमोरील प्रश्नांची सोडवणूक करण्याचा व्यापक प्रयत्न करावा लागेल, असे सांगितले होते. यापैकी अरस आणि इंदिरा काँग्रेस एक करण्याचा पूर्वार्ध यशवतरावांनी उरकून टाकलेला आहे. पवारांना आता या सकल्पित व्यापक काँग्रेस-ऐक्याच्या उत्तरार्धाकडे वळता येईल. कारण यशवंतरावांच्या मागोमाग आता इदिरा काँग्रेसमध्ये जाणे अगदीच अशोभनीय दिसेल ! एवीतेवी उशीर झाला आहेच. तेव्हा आणखी काही काळ थांबणे व काँग्रेसपासून फार पूर्वी दूर गेलेले तुकडे जोडून, नवी ताजी कुमक घेऊन, व्यापक काँग्रेस-ऐक्याचा उत्तरार्ध पूर्ण करणे त्यांना कठीण नाही. वय त्यांना अनुकूल आहे. राजकीय इच्छाशक्ती असलेला दुसरा नेता आज तरी महाराष्ट्रात दिसत नाही. लांब पल्ल्याची उद्दिष्टे ते डोळ्यासमोर ठेवू शकतात. महाराष्ट्रातले समाजवादी यासाठी उत्सुक आहेतच. तिकडे लोकदल, चद्रशेखरही त्याना अगदीच परके नाहीत. भा. ज. प. व डावे कम्युनिस्ट वगळून इतर सर्वच त्यांना मध्यडाव्या काँग्रेसच्या निशाणाखाली एकत्रित आणता येतील. आणि गांधीवादी समाजरचना स्वीकारणाऱ्या भाजपचेही काय सांगावे ? त्यातीलही रा. स्व. संघाचा संबंध नको म्हणणारा गट इकडचा तिकडे होणार नाही याची काय शाश्वती ? डाव्याचा कम्युनिस्ट पक्ष, इतर किरकोळ डावे गट केव्हाही गिळकृत होऊ शकतात. असे काही दूरचे चित्र पवारांच्या दृष्टीसमोर असू शकते. ते असले तर आज जरी ते एकाकी वाटले तरी उद्या त्याचा पाठिंबा वाढत जाणे अवघड नाही. कारण देशासमोरील प्रश्नच इतके विविध व विकट आहेत की इंदिरा गांधीचा काँग्रेसपक्ष अपुराच पडणार व विरोधी आंदोलनाची, पर्यायी नेतृत्वाची येथे नेहमीच गरज भासणार. असे नेतृत्व पवारांच्या प्रयत्नातून उभे राहू शकते. मात्र ही वाट शेवटी व्यापक काँग्रेसऐक्याकडे जाणारी असेल, इतरांना त्यात फार फार तर आजूबाजूच्या भूमिकाच जेमतेम वठवण्याची संधी मिळेल, हेही विसरून चालणार नाही. चव्हाण महाराष्ट्रात सत्तेवर आले आणि त्यानी आपल्या शैलीदार राजकारणाने विरोधी पक्ष खलास केले. पवारांची शैली थोडी-फार वेगळी राहील, पण परिणाम तोच होईल. पूर्वार्ध यशवतरावांकडे, उत्तरार्ध पवाराकडे अशीही वाटणी असण्याचीही शक्यता आहे. म्हणूनच तर यशवंतराव म्हणाले नसतील ना, की पवार माझ्या मागोमाग येतील, त्यांना यावे लागेल ! आणि पवारही यशवंतरावांना न दुखवता, त्याचा अनादर होईल असा शब्दही न उच्चारता आपली वेगळी वाट का ठरवीत आहेत ? काँग्रेसशी मूलभूत मतभेद असणाऱ्यांनी म्हणूनच दुरळून जाण्यात अर्थ नाही. उत्तरार्ध पूर्वार्धापेक्षा फार वेगळा असू शकत नाही. □

## सप्रेम नमस्कार..

¤ माझ्या 'बुद्धिप्रामाण्यवाद– काही गैर-समजुती' या लेखावरील श्री. अळवणी यांची प्रतिक्रिया वाचली. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण–

१) **माझ्यावर आक्रमक भूमिकेवरून लिहिण्याचा आरोप केला आहे.** आपल्या विरुद्ध मते मांडणारी व्यक्ती बहुतेकांना आक्रमक वाटते. मी शक्यतो तर्कशुद्ध आणि शास्त्रीय कसोटीवर टिकणारी विधाने करतो, तीच श्रद्धावाद्यांना आक्रमक वाटतात. (सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी फिरते हे गॅलिलिओचे विधान तत्कालीन श्रद्धावाद्यांना कमालीचे आक्रमक वाटले होते ! हे केवळ उदाहरण आहे. 'कुठे गॅलिलिओ आणि कुठे अभ्यंकर' हे मलाही कबूल आहे)

२) **देहांताची सजा झालेल्यांची पंथवार आकडेवारी मी दिली आहे** कारण किरकोळ गुन्हेगारीची दिली तर श्रद्धावादी लगेच म्हणतात, हे काय किरकोळ गुन्हे झाले. धर्म मानणारा माणूस खूनबीन तर करत नाही ना ?

३) **एकूण धार्मिक श्रद्धा असणाऱ्यांमध्ये गुन्हेगारांचे प्रमाण काय आहे ?** ही आकडेवारी कोणी गोळा केल्याचे मला माहीत नाही; पण अनेक कट्टर गुन्हेगार, दरोडेखोर, डाकू यांच्या देवीदेवता असतात, त्यांची ते भक्तिभावाने पूजाअर्चा करतात, उपास करतात, नवस करतात हे मला ठाऊक आहे. फार काय दरोडा घालायला जाण्यापूर्वी ही मंडळी फरशी-कुऱ्हाडीचीसुद्धा पूजा करतात. याउलट हॅवलॉक एलिस यांच्या मते 'बुद्धिपुरःसर धर्म न मानणारी माणसे तुरुंगात असल्याचे फारच क्वचित आढळून येते.' (The Criminal, 1895)

४) **हिंदू धर्मपद्धती** Flexible **आहे. त्यात बदल होतच आहेत.** फक्त हे बदल पुरेशा वेगाने आणि आवश्यक त्या सर्व क्षेत्रात होत नाहीत. मुलाची मुंज केल्याने त्याचे आचार, विचार, उच्चार, अभ्यास, बुद्धी, यात काडीचाही फरक पडत नाही, हे मुंज करणारे सर्वजण मान्य करतात; पण 'संस्कार' या भ्रमक समजुतीखाली मुंजी करतच रहातात. 'मग मुलींच्यावर संस्कार का नकोत ? या प्रश्नाला उत्तर नाही !

विधवा-विवाह, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यतानिवारण या गोष्टी सनातन हिंदू धर्माला मान्य नाहीत असे जाहीरपणे सांगणाऱ्या शंकराचार्यांच्या दर्शनासाठी हजारोंनी लोक धावत असतात. यात बदल केव्हा होणार ?

५) **फलज्योतिष विसंगत आहे हे सिद्ध करावे.** माझ्या दोन्ही लेखांत मी हेच केले आहे. आता पुन्हा एकदा करतो. फलज्योतिषी अनेक पूर्णपणे अशास्त्रीय समजुती त्यांच्या शास्त्राचा पाया म्हणून मानतात. काही नमुने– १) पृथ्वी आकाशाच्या मध्यभागी आहे असे कल्पून यांची गणिते बसवलेली असतात २) ग्रहांची फक्त दिशा लक्षात घेतात. अंतर वा वजन यांना किंमत नसते. खरे तर गुरुत्वाकर्षण, चुंबकशक्ती यासारख्या शक्तींचा जोर वस्तुमानाच्या समप्रमाणात आणि अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात असतो. ३) युती म्हणतात त्या वेळी दोन ग्रहातले अंतर एरवीपेक्षाही जास्त असू शकते. ४) राहू व केतू हे ग्रह नाहीत. ५) शनिपासून पृथ्वीवर प्रकाशकिरण पोचायला काही वेळा दीड तासापेक्षा जास्त वेळ लागतो. म्हणजे प्रत्यक्षात दिसणारी स्थिती १½ तासापूर्वीची असते. आता असल्या भ्रामक गोष्टींवर आधारित शास्त्र हे शास्त्र म्हणण्याच्याच योग्यतेचे नाही. त्यातली विसंगती आणखी सिद्ध ती काय करणार?

६) **ज्योतिषाला स्टॅटिस्टिक्सचे नियम व एकानॉमिक्सला ज्योतिषाचे नियम लावणाऱ्या मित्राची गोष्ट.** याचा माझ्या लेखाशी काहीच संबंध नाही.

७) **अमावास्या व पौर्णिमेचा परिणाम वेड्या लोकांचेवर का अभ्यासला ?** कुठल्याही ज्योतिषाला विचारा ग्रहांच्या स्थितीचा माणसावर परिणाम होतो याला पुरावा काय ? तो लगेच सांगेल. 'अहो, अमावास्या-पौर्णिमेला वेडे लोक जास्त उन्मत्त होतात !' या विधानाला काहीही शास्त्रीय आधार नाही हे सांगण्याकरता डॉ. देव यांच्या संशोधनाचा हवाला दिला आहे.

८) **ज्योतिष–अभ्यासू जास्त संशोधक वृत्तीचे आहेत.** तसे असेल तर गणकयंत्राच्या साहाय्याने काही हजार लोकांच्या पत्रिका आणि त्यांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या घटना यांचे पृथक्करण करून फलज्योतिष सिद्धान्त खरे आहेत असे ही मंडळी का सिद्ध करत नाहीत ? कारण उघड आहे. हे सर्व भंकस आहे असे सिद्ध झाल्यास त्यांच्या पोटावरच पाय येईल. आणि तसे सिद्ध होण्याचीच शक्यता असल्यामुळे झाकली मूठच बरी !

९) **बुद्धिप्रामाण्यवाद्यांची अवस्था केविलवाणी झालेली आहे.** हे मात्र खरे आहे. कारण आपल्या समाजात बहुतेक सर्वजण श्रद्धावादीच आहे. बुद्धिप्रामाण्यवादी फारच अल्प कारण विचार करण्यापेक्षा श्रद्धा ठेवणे फारच सोपे असते. पण 'गो स्लो' जाऊन हे प्रमाण बदलणार थोडेच ! पुन्हा 'आक्रमक' भूमिका घेऊन 'शॉक–ट्रीटमेंट' दिली तरच थोडीफार जाग येण्याची शक्यता !

### आणखी समज–गैरसमज

¤ 'बुद्धिप्रामाण्यवाद काही गैरसमज' या माझ्या लेखामुळे गैरसमज कमी होण्याऐवजी वाढलेच आहेत, असे ६ जूनच्या अंकातील पत्रव्यवहार वाचून वाटू लागले आहे.

पैकी प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांनी माझी बाजूच मांडली आहे. फक्त काही बाबींचा खुलासा : मला नास्तिक असण्याची भीति मुळीच नाही. बुद्धिप्रामाण्यवादी विचाराचा परिपाक म्हणजेच नास्तिक्य. लोक 'नास्तिक' हा शब्द शिवीसारखा वापरतात, नास्तिक म्हणजे कोणी तरी भयंकर पापी, दुराचारी, काहीही करावयास मागे-पुढे न पहाणारा असे समजतात, तसे प्रत्यक्षात नसते हे दाखवण्याचा माझा प्रयत्न होता.

तसेच श्रद्धावान लोकांच्या दुष्कृत्यांचे आणि नास्तिकांच्या सत्कृत्यांचे. 'श्रद्धावान असणे म्हणजे आपोआपच सज्जन असणे आणि नास्तिक असणे म्हणजे दुर्जन असणे' ही सर्वमान्य समजूत खरी नाही, हे सिद्ध करण्याकरता मी उदाहरणे दिली आहेत. अर्थातच या सिद्धांताचा व्यत्यास (Corrollwry) देखील खरी नाहीच.

श्रद्धावान देखील शतप्रतिशत श्रद्धावान कधीच नसतो. अगदी देवावर वा ज्योतिषावर ठाम श्रद्धा असणारा माणूस देखील

आजारी पडल्यावर 'देव सर्व समर्थ आहे' किंवा 'ग्रहदशा असेल तसे होईल' असे न म्हणता औषधोपचार घतोच. शिवाय कमकुवत मनाला आधार म्हणून स्तोत्रपठण किंवा ग्रहशांती करतो. त्याचा श्रद्धाविषय वगळता सर्व बाबतीत तो बुद्धिप्रामाण्यच मानतो. तुकाराम व रामदासांच्या अवतरणातून हेच सिद्ध होते.

पाश्चात्याचे आम्ही अनुकरण करतो याचा मला राग नाही. 'बुद्धिप्रामाण्यवादी केवळ पाश्चात्त्याचे अनुकरण करतात. सबब ते भारतीय संस्कृतिविरोधी आहेत' असे मानणाऱ्याचा आहे.

'आई कोण याबद्दल खात्री असते, पण बाप कोण याची खात्री तुम्ही कशी देणार ?' हा एक बुद्धिप्रामाण्यवाद्यांना विचारला जाणारा आवडता प्रश्न आहे. (खरे तर आई कोण याची सुद्धा खात्री कशावरूनही देता येणार नाही. अगदी रक्त गट तपासूनही !) परिस्थितिजन्य पुरावा–उगीच एखादे पोर कोण लहानाचे मोठे करेल ? आणि Law of averages-हॉस्पिटलमध्ये मूल बदलण्याची शक्यता फारच कमी. एवढ्यावरच मातृत्व आणि पितृत्व मानले जाते.

शब्दप्रामाण्य हे प्रत्येकालाच मानावे लागते. रेडिओवर ९ वाजले आहेत असे सांगितले की मी लगेच सूर्याचा कोण मोजायला धावत नाही; पण हा शब्द मी मानतो. कारण हा 'तपासलेला शब्द' आहे, शास्त्रीय पद्धती वापरून काढलेला निष्कर्ष आहे याची मला खात्री असते. असे असंख्य 'शब्द' आणि 'निष्कर्ष' मला प्रमाण मानावेच लागतात. कारण प्रत्येकाची सिद्धता मी मांडू शकत नाही. यात बुद्धिप्रामाण्यवादास विरोधी काहीही नाही.

पुष्पचक्र वहाणे, ईशदूत म्हणणे, राख गंगेत टाकणे या गोष्टी निश्चितच बुद्धिप्रामाण्य विरोधी आहेत. प्रत्येकाला आपला ती रूढी तेवढी योग्य कशी वाटते याची एक गमतीची हकीगत आहे.

एक अमेरिकन नागरिक जपानमध्ये मरण पावला. त्याचे तेथच दफन केले होते. श्राद्धदिनी त्याचे नातवाईक त्याच्या थडग्यावर फुले वहाण्यासाठी आले होते. शेजारी काही जपानी लोक त्यांच्या आप्ताच्या थडग्यावर वहाण्यासाठी भात वगैरे नैवेद्य घेऊन आले होते. त्याची टर उडवण्याकरता एका अमेरिकनाने विचारले, 'काय हो, हा तुमचा मेलेला आप्त भातबित खायला केव्हा येणार आहे ?' त्यावर जपान्याने शांतपणे उत्तर दिले, 'तुमचा आप्त तुम्ही ठेवलेल्या फुलांचा वास घ्यायला येईल तेव्हा त्याच्याबरोबरच येणार आहे !'

## खरा देशाभिमान

आता चंद्रकांत कुलकर्णी यांच्या गोलंदाजीचा समाचार घेऊ. आपले नियंत्रण नसणाऱ्या कुठल्याच गोष्टीचा अभिमान धरू नये असे मी म्हटलेले नाही. अशा गोष्टीचा अवाजवी वा वृथा अभिमान धरू नये. माझा देश प्रचंड आहे, निसर्गसौंदर्याने नटलेला आहे, नैसर्गिक साधनसामुग्रीने समृद्ध आहे, इथले नागरिक अतिशय सोशिक आणि समजूतदार आहेत, अनेक नररत्ने या देशात निर्माण झाली आहेत, याचा मला जरूर अभिमान आहे; पण त्याचबरोबर इथला नागरिक आळशी, घाणेरडा, दैववादी, रूढिप्रिय, संकुचित मनोवृत्तीचा आहे याचा अभिमान थोडाच बाळगता येणार ? खऱ्या देशाभिमान्याने या गोष्टी झपाट्याने कशा बदलतील यासाठी प्रयत्न करायला हवेत. नुसतेच आमचा देश महान, आमची संस्कृती महान, आमची भारतमाता महान म्हणत राहून काय फायदा ?

यापुढची कांद्याच्या रसाचे इंजेक्शन देणाऱ्या कपौंडरची गोष्ट अशीच आहे. अशा परिस्थितीत बुद्धिप्रामाण्यवादी म्हणेल, 'अरे, असे उपचार करू नकोस. ते सिद्ध झाले आहेत का ? तपासलेले आहेत का ?' उलट श्रद्धावादी वा दैववादी म्हणेल, 'करा तर इंजेक्शन. व्हायचा असला उपयोग तर होईल. नशिबात काय असेल कुणी सांगितलंय !' देवळे, चर्च वा मशिदी उभारून लोकांना सत्प्रवृत्त करायचा मार्ग कुणी आजकाल 'तपासला' आहे का ? त्याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे का ? आहेत ती देवळं पाडून टाका असे मी म्हणत नाही; पण निदान वर्गणी करून नवीन तरी उभारू नका. हा पैसा समाजोपयोगी कामासाठी वापरा.

दारूचे गुत्ते, वेश्यावस्त्या, उकिरडे या काही फार चांगल्या गोष्टी आहेत असे मला अजिबात म्हणायचे नाही; पण कुणी सार्वजनिक निधी उभारून तरी या गोष्टी करत नाही

फलज्योतिषी सगळे पोटार्थी असतात हे मान्य केलेत ते बरे झाले. मला तेच म्हणायचे आहे. यात शास्त्राचा थोडाही संबंध नाही.

धर्माचरणी लोकांमध्ये दुष्प्रवृत्त लोक असतात हा धर्माचा दोष नव्हे ? मग कुणाचा ? कुठलाही धर्म हिंसा, पापाचरण, व्यभिचार यांची शिकवण देत नाही, तरीही लोक तसे करतात, म्हणजे सत्प्रवृत्ती व दुष्प्रवृत्ती याचा धर्माशी संबंध नाही, हे सिद्ध करणारी आकडेवारीच मी सादर केली आहे.

शेजारचा धर्मवाला तलवार घेऊन आला तर मीही तलवार उपसणार हा युक्तिवाद असाच. धर्मासाठी तलवार उपसावी लागते हा त्या 'हिंसा, दुराचार, पापाचरण' न शिकवणाऱ्या धर्माचा पराभवच नव्हे काय ? असले कालबाह्य झालेले धर्म आणि त्यांनी जोपासलेल्या संकुचित प्रवृत्ती यांचा आता त्याग करायची वेळ आली नाही का ? सर्व जगाचा मानव हा एकच धर्म मानला तर फायदा होईल की नुकसान ? लगेच सगळे लोक व्यभिचारी आणि हिंसाचारी बनतील होय ?

आता महाभारतातील श्लोकाचे भाषांतर. कुशीलको शब्द मी गाळला कारण शीलभ्रष्ट लोकांना पंगतीला घेऊ नकोस हे सांगणे सर्वसामान्य होईल; पण त्यांच्या जोडीला देवळांवर आणि ग्रहफलादेशावर उपजीविका करणाऱ्यांची गणना व्यासांनी केली आहे. कुलकर्ण्यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्थ लावला तर फक्त हे दोन व्यवसाय करणारे शीलभ्रष्ट लोक टाळा, बाकीचे चालतील असा अर्थ होईल.

शेवटी आणखी एक गैरसमज. बुद्धिप्रामाण्यवादी माणूस म्हणजे बुद्धिमान माणूस असे बरेच लोक समजतात. श्री. कुलकर्णीही माझ्या बुद्धीची मापे काढू लागले आहेत. प्रखर बुद्धिमान माणूस हा बुद्धिप्रामाण्यवादी असतोच असे नाही. याउलट अगदी अडाणी माणूसही निखळ बुद्धिप्रामाण्यवादी असू शकतो.

पूर्वीच्या एका लेखातली दोन वाक्ये पुन: उद्धृत करून हे पत्र पुरे करतो.

'हे कसे ?' असा प्रश्न न विचारता मान्य केली जाते ती श्रद्धा. या उलट 'हे कसे ?' असे प्रश्न उपस्थित करून निर्माण होते ते शास्त्र असे प्रश्न उपस्थित करण्याची आणि त्याची योग्य उत्तरे शोधून काढण्याची क्षमता म्हणजे बुद्धी.

Reason thinks, while relegion believes. And as it is far more easy to believe than to think, we have many more believes than thinkers."

आता तरी या विषयाबद्दलचे गैरसमज कमी होतील ही आशा.

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

# चीन

## वैचारिक संघर्ष संपलेला नाही

वा. दा. रानडे

माओ त्से तुंग (नवा उच्चार माओ झेडॉग) यांच्या कार्याचे मूल्यमापन करणारा एक प्रदीर्घ लेख चीनमध्ये नुकताच प्रसिद्ध झाला. सध्याच्या सत्तारूढ नेतृत्वाची भूमिका त्यात मांडली असून ती देशाने मान्य केली व या प्रश्नावरचा वैचारिक संघर्ष संपला असा या लेखाचा अर्थ लावण्यात आला; पण संघर्ष संपला आहे असे दिसत नाही. 'लिबरेशन आर्मी डेली' या चिनी लष्कराच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या एका लेखाने पुनः वैचारिक संघर्षाचे वादळ निर्माण केले आहे.

चिनी लेखक बाय हुआ यांनी 'कडू प्रेम' 'बिटर लव्ह' नावाची एक कादंबरी लिहिली. तिच्यावर चित्रपटही निघाला. ही कादंबरी 'पक्षविरोधी व समाजविरोधी' आहे असे म्हणून तिच्यावर टीकेचा जोरदार हल्ला 'लिबरेशन आर्मी डेली' मधील लेखात करण्यात आला आहे. असे या कादंबरीत आहे काय? एका तरुण कलावंताच्या जीवनावर ही कादंबरी आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट स्थापन झाल्यानतर आता आपल्या देशाच्या विकासाच्या उभारणीस आपण मदत करावी या अपेक्षेने हा तरुण परदेशातून चीनला परततो; पण सांस्कृतिक क्रांतीच्या काळात त्याचा छळ होतो. परदेशातून पटवणारे चिनी प्रतिक्रांतिकारकांचे हस्तक असतात असे त्या वेळी मानले जात होते. या कलावंताची मुलगी त्याला विचारते, 'तुम्ही मातृभूमीवर एवढे प्रेम करता; पण मातृभूमी तुमच्यावर प्रेम करते का ?' माओच्या व्यक्तिपूजेवरही त्यात प्रच्छन्न हल्ला आहे. कथानकावरून ही कादंबरी व चित्रपट उघडउघड माओविरोधी व सांस्कृतिक क्रांतिविरोधी आहेत. 'लिबरेशन आर्मी डेली'ने त्यावर टीका केली आहे ती या चित्रपटात कलात्मकता व सौंदर्याचे दृष्टीने काही उणीवा आहेत त्याकडे लक्ष वेधण्यासाठी नव्हे, तर त्यातल्या माओविरोधी संदेशावर या पत्राचा मुख्य रोख आहे. वास्तविक हा चित्रपट गेल्या वर्षीच अधिकारी व काही परदेशी पत्रकाराना दाखविण्यात आला होता. नंतर तो काढून घेण्यात आला; पण 'लिबरेशन आर्मी डेली'ने त्या वेळी टीका केली नव्हती हे लक्षात घेतले पाहिजे.

सध्याचे वस्तुनिष्ठ, व्यवहारवादी नेतृत्व आणि सैद्धांतिक कट्टर माओवादी यांनी आपला वैचारिक संघर्ष थांबवून एकोप्याने काम करण्याचे ठरविले असताना लष्कराच्या मुखपत्राने हा वाद उकरून काढावा ही गोष्ट सत्तारूढ नेतृत्वाला रुचली नाही. 'लिबरेशन आर्मी डेली'मध्ये लेख प्रसिद्ध झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशी 'पीपल्स डेली'मध्ये चिनी कम्युनिस्ट पक्षाचे उपप्रचारप्रमुख 'झाऊ याग' यांचे एक भाषण प्रसिद्ध झाले टीकेत संयम पाळावा असे आवाहन त्यात केलेले होते. चिनी साहित्यात काही उदारमतवादी प्रवृत्ती दिसून येत आहेत त्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला होता; पण त्याचबरोबर 'कलात्मक आविष्कारात एखाद्या लेखकाच्या हातून काही चूक झाली तर एकदम अविचारीपणाने तो पक्ष विरोधी किंवा समाजवादविरोधी असल्याचा शिक्का त्याच्यावर मारू नये' असा सावधगिरीचा सल्लाही त्यात दिलेला होता.

नव्या सत्तारूढ नेतृत्वाने केलेल्या माओच्या अधिकृत मूल्यमापनात माओंनी वर्गलढयाच्या दृष्टिकोनाचा अतिरेक केला आणि सर्वच टीकाकार वर्गशत्रू मानले ती त्याची चूक झाली असे म्हटले होते. अधिकृत मूल्यमापन मांडणारा हा प्रदीर्घ लेख जैन हुआ केचेंग यांनी लिहिला होता आणि चीनमधील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रांत तो प्रसिद्ध झाला होता. पण 'लिबरेशन आर्मी डेली' मधील लेखाने माओवादावर पुनः चर्चा सुरू झाली आहे.

पेकिंग विद्यापीठाच्या संदर्भ ग्रंथ सूचि विभागाने एक पोस्टर लावले'लिबरेशन आर्मी डेली' मधल्या लेखातली टीका कितपत बरोबर आहे अशी शंका त्यात प्रदर्शित केली होती. हा चित्रपट सर्वांना पाहू द्या व लोकांनाच त्याचे मूल्यमापन करू द्या अशी सूचनाही त्यात केली होती; पण ही सूचना मान्य होण्याचा संभव दिसत नाही. या विषयावर आणखी वाद व संघर्ष टळावा याबाबत लष्करातील सैद्धांतिक माओ-समर्थकाचे मन वळविण्याचा प्रयत्न 'पीपल्स डेली' व इतर वजनदार पत्रे करीत आहेत. या गटाचे समाधान करण्यासाठीच उदारमतवादी प्रवृत्तीवर अधिक जोरदार टीका केली जात आहे. कला व साहित्यावर पूर्वीसारखे कडक नियंत्रण पुनः येणार नाही असे झाऊ याच्या भाषणात म्हटले आहे; पण त्याचबरोबर पक्षनेतृत्वाशी फारकत घेणे आणि समाजवादी मार्गापासून दूर जाणे धोक्याचे आहे असा इशाराही त्यात दिला आहे. काही साहित्यकृतीत देशाभिमानाचा अभाव आणि सध्याच्या पद्धतीवरील विश्वासाचा अभाव दिसून येतो, अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही ' असे झाऊ यांनी म्हटले आहे.

देशाभिमानाचा अभाव आणि सध्याच्या पद्धतीवरील विश्वासाचा अभाव हे दोन्ही शब्दप्रयोग संदिग्ध आहेत. कम्युनिझमच्या मूळ कल्पनेप्रमाणे तर देशाभिमान, राष्ट्रवाद या कल्पना भांडवलदारी आहेत; पण प्रत्येक देशातल्या कम्युनिस्ट चळवळीवर आज राष्ट्रवादाचा प्रभाव दिसून येतो. राष्ट्रीय हितसंबंधाच्या संघर्षातूनच आंतर्राष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत अंतर्गत विरोध व संघर्ष निर्माण झाले आहेत. तसेच सध्याच्या पद्धतीवरील विश्वासाचा अभाव म्हणजे समाजवादावरील विश्वासाचा अभाव असा अर्थ लावणे चुकीचे होईल. समाजवादावर विश्वास असणाराचे सुद्धा समाजवाद आणण्याच्या मार्गाबद्दल मतभेद होऊ शकतात. त्यांना आपली मते मांडण्याची मोकळीक असली पाहिजे; पण सध्याच्या चिनी नेतृत्वाची तशी तयारी दिसत नाही.

झाऊ याग यांच्या भाषणाच्या प्रसिद्धीनंतर बेजिंगच्या (पेकिंग) प्रमुख वृत्तपत्रात आणखी एक निवेदन प्रसिद्ध झाले. समाजवाद विरोधी गटांना दडपून टाकण्यात येईल, पण सांस्कृतिक क्रांतीतील दडपशाहीची पुनरावृत्ती होणार नाही असे त्यात म्हटले होते. हे निवेदन प्रथम 'ग्टांगमिंग डेली' या बुद्धिजीवी वर्गाच्या मुखपत्रात प्रथम प्रसिद्ध झाले. समाजात अनेक प्रकारचे अंतर्विरोध असतात. त्या सर्वांनाच वर्गकलह मानण्याची चूक माओच्या काळात झाली. त्याचेच पर्यवसान सांस्कृतिक क्रांतीच्या शोकांतिकेत झाले आणि समाजातल्या एका गटाला शत्रू मानण्यात आले. चीनमध्ये काही प्रमाणात अजून वर्गलढा आहे; पण त्यावर सारखा भर देऊन बेकी निर्माण करू नका असा इशारा या निवेदनात दिला आहे; त्याचबरोबर लष्करातील आणि कम्युनिस्ट पक्षातील कट्टर माओवाद्यांचे समाधान करण्यासाठी 'प्रतिक्रांतिकारकाविरुद्ध आणि समाजवादविरोधी गटाविरुद्ध लढा चालू ठेवलाच पाहिजे' अशी भूमिकाही मांडली आहे. लोकशाही सुधारणा घडवून आणण्याचे कार्य आपण करीत असता समाजवादविरोधी गट संधी शोधून अडचणी निर्माण करीत आहेत आणि राजकीय ऐक्याला सुरुंग लावू पहात आहेत त्यापासून सावध राहिले पाहिजे' असे निवेदनात म्हटले आहे.

चीनमधील या वैचारिक संघर्षाची माहिती 'हिंदुस्थान टाइम्स'च्या १० जूनच्या अंकात गीताजली सिंग यांनी हाँगकाँगहून पाठविलेल्या वार्तापत्रात दिली आहे. लष्करात एक कट्टर माओवादी गट आहे असे त्यावरून दिसते. लष्कराने आज सध्याच्या नेतृत्वास पाठिंबा दिला आहे; पण देशापुढील प्रश्न सोडविण्यास या नेतृत्वास अपयश आले तर लष्करातील माओवादी गट पुनः जोर करून सत्तेवर पकड मिळविण्याचा प्रयत्न करण्याचाच संभव आहे. □

## उत्तरमीमांसा : १० :

स. शि. भावे

# शैक्षणिक नियोजनाची अष्टपदी

या आठवड्यात शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत आहे माझ्या अध्यापनाचे एकविसावे वर्ष सुरू होत आहे.

मी फर्गसन कॉलेजात काम करतो. फर्गसन कॉलेज ही संस्था मला वेतन देते म्हणजे मी त्या संस्थेचा सेवक आहे. सेवकाने वेतनाच्या मोबदल्यात वेतन देणाराची सेवा करावयाची असते. इथे मी सेवा कोणाची करतो? तर विद्यार्थ्यांची. त्याना मी शिकवितो. संस्थेकडून वेतन घेतो आणि विद्यार्थ्यांना शिकवतो.

या परिस्थितीमुळे शिक्षण हा इतर व्यापारी उद्योगांसारखा उद्योग होऊ शकत नाही, तर ती एक सेवा होते. आरोग्य आणि समाजसेवा या अशाच आणखी दोन सेवा आहेत. या तीनही सेवांत वेतन एकाकडून मिळते, पण काम दुसऱ्याचे करावयाचे असते. तांत्रिक दृष्टीने नोकरी एकाची पण सेवा दुसऱ्याची अशी ही तीन क्षेत्रे आहेत.

सेवकाची गुणवत्ता येथे वेतन देणाऱ्याच्या कामी येत नाही, तर ती सेवा घेणाऱ्यासाठी असते. शिक्षकाची गुणवत्ता कमवायची असते, सदा ताजी ठेवायची असते; सर्वस्वाने वापरायची असते ती विद्यार्थ्यांसाठी. 'संप' या नेहमीच्या हत्याराचा या क्षेत्रात वेगळ्या दृष्टीने विचार करावा लागतो. वेतन देणाऱ्याची गैरसोय व्हावी असा संपाचा व्यावहारिक उद्देश असतो; परंतु या तीन क्षेत्रांतील संपाने वेतन देणाऱ्याची प्रत्यक्ष गैरसोय काहीच होत नाही.

शिक्षकानी, प्राध्यापकानी किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संप केला की त्याची झळ विद्यार्थ्यांना आणि त्याच्या पालकानाही पोचते. समजा एकजण पदवीच्या परीक्षेला बसला आहे. पदवीनंतर अमुक एक नोकरी अथवा अमुक एक शिष्यवृत्ती त्याला मिळणे शक्य आहे. (आवश्यक तर असतेच.) या नोकरीसाठी वा शिष्यवृत्तीसाठी अमुक तारखेच्या आत अर्ज करायचा आहे. अशा वेळी संप झाल्याने जो महिना–दीड महिना उशीर होईल त्या उशिराने अशा होतकरू व गरजू विद्यार्थ्यांचे वर्षाचेच काय,सर्व आयुष्याचे नुकसान होणे शक्य आहे. हे नुकसान व्यक्तिगत एका विद्यार्थ्याचे न होता, एका सबंध कुटुंबाचेही होणे शक्य आहे.

जी गोष्ट शिक्षणाची, तीच आरोग्य-सेवेची आणि समाजसेवेची. वेतन एकाकडून मिळते. त्याचेविरुद्ध संप होतो; पण त्याची कल्पनातीत झळ मात्र विद्यार्थ्याला, रुग्णाला किंवा अपंग–मनोरुग्णाला आणि त्याच्या नातेवाइकाना पोचत असते. असे असल्याने या क्षेत्रातील संप करणाराना जनतेचा वाईटपणा सोसावा लागतो.

अर्थात्, यामुळे शिक्षण, आरोग्यसेवा, किंवा समाजसेवा या क्षेत्रातील सेवकांनी कधीही संप करू नयेत असे म्हणता येणार नाही. याविषयी आपल्याला अशी भूमिका घ्यावी लागेल की, या तीन क्षेत्रात संप होऊ नयेत म्हणून अन्याय–निवारणासाठी इतर क्षेत्रापेक्षा जास्त परिणामकारक व जास्त जलद गतीने चालणारी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. विद्यार्थी, रुग्ण, गरजू व त्याचे नातेवाईक याचे महत्त्वाचे हित या क्षेत्रांतील सेवांवर अवलंबून असल्याने, अशी विशेष गतीची व तीव्रतेची अन्यायनिवारक यंत्रणा या क्षेत्रात असणे अत्यावश्यक आहे आणि जोवर अशी यंत्रणा होत नाही आणि जोवर ही क्षेत्रे 'विशेष कल्याणकारी म्हणून विशेष महत्त्वाची क्षेत्रे' अशी मान्य होऊन त्यातील सेवकाना विशेष संरक्षण मिळत नाही, तोवर संपाचा त्यांचा अधिकार अमान्य करता येणार नाही.

¤

ही क्षेत्रे विशेष अर्थाने जसा या क्षेत्रातील सेवेसंबधाने विशेष व वेगळा विचार करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे या क्षेत्रात होणाऱ्या खर्चाचाही वेगळा विचार होणे आवश्यक आहे. या क्षेत्रात खर्च होणारा पैसा हा उपभोग्य खर्च नसतो, तर ती गुंतवणूक असते. अर्थात् खर्चापेक्षा गुंतवणुकीला महत्त्व अधिक असते. कारण गुंतवणुकीचे फळ भविष्यकाळात दुपटी–दसपटीने यावयाचे असते. याबाबतीत सरकारची म्हणजेच समाजाची दृष्टी, वर्तमानकालीन खर्चाकडे बघण्याच्या दृष्टीपेक्षा अधिक उदार, भविष्यदर्शी आणि कल्पकतापूर्ण असावयास हवी.

अनुभव मात्र अगदी उलटा येतो काटकसरीचा पहिला घाव पडतो तो शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवा याच क्षेत्रावर. या कपातीमुळे तावडतोबीचे काही बिघडत नाही अथवा आरडाओरड होत नाही अशी भूमिका त्यामागे असावी. ६२ साली, चिनी आक्रमणानंतर जेव्हा खर्चात पहिली कपात आली तेव्हा तिची कुऱ्हाड याच तीन क्षेत्रांतील खर्चावर पडली होती. हे धोरण विवेकाचे आहे असे म्हणता येणार नाही. उलटपक्षी, या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक करण्याचे धोरण असावे असाच आपला आग्रह असावा लागेल.

¤

प्राधान्याने गुंतवणूक करायची म्हटली की खरा प्रश्न येतो तो हा की, या गुंतवणुकीचा केंद्रबिंदू कोणता? त्याचे नि.संदिग्ध उत्तर असे की, हा केंद्रबिंदू विद्यार्थी हाच असला पाहिजे शिक्षणसंस्था, त्याच्या इमारती, प्रयोगशाळा, वर्गखोल्या, फर्निचर, शिक्षक, इतर कर्मचारी, त्याचे वेतन व सुविधा इ. इ. खर्चाची इष्टानिष्टता असा खर्च विद्यार्थिहिताला उपकारक आहे की, नाही या निकषावरच ठरविली जावयास हवी. अर्थात हे खरे की, जोवर रेल्वेत किंवा एसटीत प्रवासी, आयुर्विमा महामंडळात विमेदार आणि सरकारी खात्यात सामान्य नागरिक–अशा केंद्रबिंदूना प्राधान्य मिळत नाही तोवर याच क्षेत्रात ते विद्यार्थ्याला मिळण्यास विरोध होईल आणि तो तेवढ्यापुरता समर्थनीयही ठरू शकेल; पण तत्त्वतः विद्यार्थी हा केंद्रबिंदू धरून आणि विद्यार्थिहित हे मार्गदर्शक तत्त्व पत्करून, शिक्षण-

क्षेत्रातील गुंतवणुकीचा आराखडा तयार व्हावा यासंबंधी दुमत असेल किंवा होईल असे वाटत नाही.

¤

येथे विद्यार्थिहित म्हणजे काय ? असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. राधाकृष्णन आयोग, कोठारी आयोग अशा अनेक आयोगांनी, अनेक शिक्षणतज्ज्ञांनी, शिक्षण-मंत्र्यांनी त्या त्या वेळी या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार केला आहे. आपण तूर्त 'विद्यार्थिहित' या संकल्पनेचा पायाभूत घटक पाहू.

(१) एक म्हणजे असा आराखडा तयार करताना तो किती वर्षांसाठी व किती विद्यार्थ्यांसाठी हे निश्चित करावे लागेल. प्रत्येक संस्थेने असा वास्तव अंदाज केला पाहिजे. या अंदाजाच्या एकत्रीकरणातून साऱ्या देशाचा अंदाज तयार होईल जन-गणनातज्ज्ञ आणि संख्याशास्त्रज्ञ यांचेकडून हा अंदाज पडताळून घ्यावा लागेल. असा पडताळून घेतलेला अंदाज समोर आला की, आपल्या आराखड्याची संख्या–काळ–चौकट तयार होईल. उदाहरणार्थ, येती वीस वर्षे म्हणजे पदवीधराच्या पाच तुकड्या. अमुक इतके पदव्युत्तर वगैरे वगैरे अशी चौकट समोर तयार नसेल तर आपला कोणताच अंदाज वास्तव ठरणार नाही आणि यशस्वीही होणार नाही.

(२) यानंतर विचार येईल तो कोणत्या विद्याशाखांत किती प्रगती साधावयाची, हे ठरविण्याचा. अमुक शाखेत अमुक इतके पदवीधर–द्विपदवीधर हवेत हा आकड्या-तील अंदाज असेल; पण संख्येच्या उद्दिष्टा-बरोबर गुणवत्तेचे उद्दिष्टही ठरवावे लागेल. संख्येचे उद्दिष्ट बरेचसे व्यावहारिक घटकां-वर व मागणीवर अवलंबून असू शकेल. मात्र गुणवत्तेचे उद्दिष्ट असे मागणीनुसार वा बहुमताने ठरू शकणार नाही. ते तज्ज्ञाच्या मताने ठरेल व ठरले पाहिजे. एखाद्या विद्याशाखेतील आंतरराष्ट्रीय गुणवत्ता आणि आपल्या देशातील सध्याची गुणवत्ता यांच्या पातळ्या व या पातळ्या-तील अंतर, हेही या उद्दिष्टाचे वेळी लक्षात घ्यावे लागेल.

(३) म्हणजेच लोकांची सोय, लोकाची मागणी आणि लोकाचे किंवा राजकीय पक्षांचे बदलते पवित्रे यांचा विचार जरी शैक्षणिक नियोजनात झाला तरी शैक्षणिक नियोजनाचे नियंत्रण शिक्षणतज्ज्ञांनीच करा-वयाचे असेल आणि त्यांच्या एकूण समाज-हित-बुद्धीची खात्री करून घेतल्यावर, समाजाने त्यांच्यावर भरवसा ठेवला पाहिजे. लष्करी अधिकारी अथवा अणुसंशोधनतज्ज्ञ अथवा अंतराळविज्ञानाचा कार्यक्रम, तपशील व अंदाजपत्रक ठरवणारे तज्ज्ञ यांच्यावर जसा आपण भरवसा ठेवतो, तसा शैक्षणिक नियोजनाच्या बाबतीत शिक्षणतज्ज्ञांवर ठेवला पाहिजे.

(४) या ठिकाणी शैक्षणिक नियोजना-बाबत अत्यंत महत्त्वाचा असा आणखी एक घटक लक्षात येतो तो म्हणजे कोणत्याही नव्या नियोजनाची कमीत कमी कालमर्यादा. हे नियोजन गुंतवणुकीचे आहे हे ध्यानात घेतल्यास या कालमर्यादेचे महत्त्व वेगळे पटवावे लागणार नाही. आज एक धोरण, दोन-तीन वर्षांनी सरकारमध्ये वेगळा पक्ष आल्यावर दुसरेच धोरण, पुन्हा तीन-पाच वर्षांनी पहिल्या धोरणाचे पुनरागमन अशा धरसोडीने गुंतवणूक नासून जाते. ज्यासाठी शैक्षणिक नियोजन करावयाचे अशा विद्या-र्थ्यांचे आणि पर्यायाने भावी समाजाचे कधीही भरून येऊ न शकणारे नुकसान या धरसोडीने होत असते आणि तरीही समा-जाचे धुरीण म्हणून वावरत असलेल्या व्यक्ती वा गट, अशी धरसोड अत्यंत क्रूरपणे आज करीत आहेत. ही धरसोड ताबडतोब थांबली पाहिजे आणि सारासार विचार करून ठरवलेले एखादे धोरण, कमीत कमी पंधरा (१०+२+३ चे एक आवर्तन) वर्षे तरी कायम राहील असा निर्बंध आपण स्वत:वर घालून घेतला पाहिजे. सर्व राजकीय पक्षांनी ही बाब तहनाम्याचे अपरिवर्तनीय कलम म्हणून मान्य केली पाहिजे.

(५) राजकीय पक्षांचा असा तहनामा शैक्षणिक नियोजनाच्या एका पायाभूत विचारासाठी अपरिहार्यतेने आवश्यक आहे. पंधरा वर्षांनंतर एकवीस ते छत्तीस वयो-मर्यादेतील नागरिक आपणास सर्वसाधारण-पणे कसे हवे आहेत याचा हा विचार. एकरी किती ऊस काढायचा आहे, या उसा-तील साखरेचा उतारा किती पडावा अशी कल्पना आहे असा उद्दिष्टाचा विचार जसा प्रगत, तज्ज्ञ शेतकरी करतो, त्याचप्रमाणे आजपासून पंधरा वर्षांनी जे मतदार नाग-रिक तयार होणार त्यांची किमान गुणवत्ता कोणत्या प्रकाराची आणि कोणत्या प्रतीची असावी हे ठरविणे अत्यावश्यक आहे. एकदा हे ठरविल्यावर, तशीच आणीबाणी आल्याशिवाय किंवा उद्दिष्टात गंभीर उणीव किंवा चूक आढळल्याशिवाय त्यात बदल होता कामा नये.

(६) व्यक्तिमत्त्वाचा किमान गुणवत्ता-व्यूह असा एकदा आवश्यक ठरला की सर्वच विद्याशाखात तो विषय, मग त्याला नावाने 'व्यक्तिमत्त्व' म्हणा किंवा 'व्यक्तित्व-विकास' म्हणा आवश्यक ठेवण्याचे तत्त्व मान्य करावे लागेल. इतिहास, शास्त्र-संशोधन, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्व-ज्ञान, साहित्य याचा उचित मिलाफ करून विषयाचा गतिशील अभ्यासक्रम ठरवावा लागेल आणि या अभ्यासक्रमात नव्या नव्या पवित्र्यांनी बदल करावयाचा नाही असेही ठरवावे लागेल.

(७) किमान गुणवत्तेचे व किमान व्यक्तित्वव्यूहाचे अशी ही दोन तत्त्वे जशी एका बाजूला अपरिहार्य आहेत, त्याचप्रमाणे ऐच्छिक विद्याशाखांचे तत्त्व दुसऱ्या बाजूला आवश्यक म्हणून मान्य करावे लागेल, येथे तत्त्व आहे ते हे की, शिक्षण ही काही केवळ कौशल्य प्राप्त करण्याची सुविधा नाही, तर तो प्रत्येक मानवाचा व्यक्तित्वविकासाचा मूलभूत हक्क आहे आणि व्यक्तीसंबंधी समाजाचे ते कर्तव्य आहे.

विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे हे या बाजूने आज फार कंजूषपणाने लक्षात घेण्यात येते. विद्याशाखांचे आणि त्या त्या विद्याशाखांच्या अंतर्गत असे पर्याय फार कमी असतात. जे असतात त्याचे गट अगदी कडक-पक्के असतात. तत्त्वज्ञान, संगीत आणि भौतिकी असा गट विद्यार्थ्याला का घेता येऊ नये ? पण आज त्याला तसा गट घेता येत नाही. अध्यापनाची सोय नाही अशी सबब सांगितली जाते; पण स्वतंत्रपणे अध्य-यन करून परीक्षा देण्याची तयारी असली तरीही विद्यापीठे अशी परीक्षा घेण्यास तयार नसतात. समजा, असा विद्यार्थी एखाद-दुसरा असेल; पण त्याचा शिक्षणाचा मूलभूत हक्क आपल्या शैक्षणिक नियोजनात समाविष्ट

असावयास नको काय ? आपले शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन तेवढे लवचिक आणि कल्पक असावयास नको काय ?

प्रत्येक विद्यार्थ्याच्या बौद्धिक गुणवत्तेची एक मागणी असते आणि एक आव्हान असते. हे आव्हान स्वीकारून ही मागणी पुरी करण्याचे कर्तव्य समाजाने म्हणजे आपण मान्य करायला हवे. शैक्षणिक नियोजनाच्या मूलभूत विचारात या लवचिकतेचा उचित विचार व्हावयास पाहिजे तरच किमान गुणवत्तेचे उद्दिष्ट पुरे करून कमाल गुणवत्तेच्या शक्यता निर्माण करणे, हे आदर्श कार्य येत्या पंधरा वर्षांचा आपला आराखडा करू शकेल.

(८) शैक्षणिक नियोजनात सर्वांत शेवटी लक्षात घ्यावयाचा, पण वास्तव दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा विचार म्हणजे आराखडा तयार करता वेळची म्हणजे आजची, शैक्षणिक परिस्थिती, या परिस्थितीच्या खास अडचणी आणि आजची खास दुखणी. या अडचणी आणि ही दुखणी नीट समजून घेऊन ती दुरुस्त करण्याची तरतूद आपल्या आराखड्यात हवीच. तशी ती नसेल तर आपल्या आराखड्याच्या अपयशाचे बीज आपणच पेरून ठेवले असे व्हावयाचे.

पुरेसे द्रव्यबळ नाही व प्रशिक्षित मनुष्यबळ नाही या अडचणी आहेतच; पण त्यांचा विचार येथे करीत नाही. कारण या अडचणी सर्वच क्षेत्रांत आहेत. दोनच दुखण्यांचा विचार इथे करू. कारण ती विशेष महत्त्वाची आहेत.

पहिले दुखणे देशीपणाच्या तिटकाऱ्याचे. आजचा उच्चशिक्षित वर्ग शैक्षणिक व्यवस्थापनात नियंत्रकपदी आहे. हा वर्ग देशीपणापासून तुटलेला आणि पाश्चात्य ( म्हणजे इंग्रजी किंवा अमेरिकन) नमुन्यांचा आंधळेपणाने गौरव करणारा असा झाला आहे. इंग्रजी अमलाच्या दीडशे वर्षांत ही विकृती फार खोल घुसली आहे. शिक्षणक्षेत्रात इंग्रजी माध्यमाचा आग्रह हीच मंडळी धरत असतात आणि येथील सर्वसाधारण समाजाची प्रकृती नीट लक्षात न घेता, सेमेस्टर पद्धती सरसकट राबवण्याची, अगदी अर्धीकच्ची असली तरीही राबविण्याची, हौस याच मंडळींची आहे. या हौसेत, धड परिपूर्ण सेमेस्टर पद्धती नाही, धड देशी परिस्थितीला पूर्ण साजेल अशी पद्धती नाही, अशा अर्धवट पणात आमचे हजारो विद्यार्थी फसविले जात आहेत. उत्तम दूध म्हणून पाणी मिसळलेले दूध त्यांना दिले जात आहे. प्रत्यक्ष जीवनात या शिक्षणाचा उपयोग करण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा या शिक्षणाचा काहीही उपयोग नाही हे त्यांना कळते; पण त्या वेळी ते फसले जाणाऱ्यांच्या गटात सामील झालेले असतात. ' मारुतीची बेंबी कशी ? तर गार' या पद्धतीने सारे चुपचाप असतात; पण मनात तीव्र असमाधान असते. आजची शिक्षणक्षेत्रातील बेशिस्त ही या तीव्र असमाधानातून तयार झाली आहे. शैक्षणिक नियोजनाचे व व्यवस्थापनाचे आजचे इंग्रजीकरण जाऊन त्याचे वास्तव देशीकरण झाले म्हणजे ही बेशिस्त आपोआप विरेल.

दुसरे दुखणे म्हणजे शैक्षणिक मागासलेपणाचे. पंधरा वर्षांनी जवळजवळ सर्वजण एका किमान पातळीवर आणणे हे आपले उद्दिष्ट आहे आणि कमाल गुणवत्तेच्या शक्यता निर्माण करणे हेही आपले उद्दिष्ट आहे. म्हणून सध्याच्या सवलती एकदम रद्द करून चालणार नाही. तसेच आहेत या स्वरूपात त्या अखंड चालू ठेवणेही योग्य होणार नाही. हळूहळू सध्याच्या आर्थिक सवलतींचे रूपांतर आपल्याला शैक्षणिक सवलतीत आणि शैक्षणिक सुविधात केले पाहिजे. तसेच या सवलती आणि सुविधा यांच्या रूपात जी विशेष गुंतवणूक समाज करणार त्या गुंतवणुकीचे फळ अपेक्षेप्रमाणे मागासलेल्या विद्यार्थिगटाला मिळते आहे की नाही, याची परीक्षा मधून-मधून व्हावयास हवी. पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्याचे पीक भरघोस यावे, त्याने कर्जही फेडावे आणि स्वतःसाठी दोन पैसेही राखावे या हेतूने कर्ज देणारी बँक शेतकऱ्याला शेतीत मार्गदर्शन व मदत करण्यासाठी शेती अधिकारी नेमत असते, तसे खास अधिकारी आपल्याला नेमावे लागतील.

एक प्रत्यक्ष विधायक सूचना : प्रत्येक कारखान्याप्रमाणे प्रत्येक कॉलेजात 'विद्यार्थी कल्याण-अधिकारी' नेमावे. असे Students ' Welfare Officers आज अत्यंत आवश्यक आहेत. दर हजार विद्यार्थ्यांमागे एक अधिकारी असावा. निवृत्त किंवा निवृत्त होऊ इच्छिणाऱ्या प्राध्यापकांची नेमणूक, एकमुठी वेतनावर, तीन ते पाच वर्षांसाठी करता येईल.

असे अनेक उपाय योजावे लागतील. प्रत्येक प्रगत कॉलेजाने दर वर्षामागे साठ ते नव्वद मागासलेल्या विद्यार्थ्यांची जी तुकडी आवश्यकतेने चालवावी अशी सूचना यशवंतराव चव्हाणांनी १९६० साली मुख्यमंत्री असताना केली होती, ती अद्यापि तशीच राहिली आहे.

मुद्दा हा की, अपंगांची सोय झाल्याशिवाय धडधाकटांनी आपली सोय करून घेऊ नये. शैक्षणिक दृष्टीने मागासलेल्यांना सामाजिक अपंग असे ओळखून त्यांचा विचार आपल्या शैक्षणिक नियोजनात व्हावयास हवा.

अशी ही शैक्षणिक नियोजनाची अष्टपदी. यातले एक पद जरी चुकले तरी नियोजन बिघडणार हे नक्की. कारण, शिक्षण ही सुटचा दुव्यांची साखळी नसते. एखादा दुवा तुटला किंवा खराब झाला तर तो तेवढा टाकावा, बाकीचे दुवे पुन्हा जमवून घ्यावे, असे शिक्षणात करता येत नाही. कारण शिक्षण हा सावयव एकात्म वाढ हवी असणारा वृक्ष आहे.

□

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

अवतीभवती । शरद कृष्णन

# □ नवे सरसेनापती : जनरल के.व्ही. कृष्णराव

भारतीय भूदलाचे १२ वे सरसेनापती म्हणून जनरल के. व्ही. कृष्णराव यांनी अलीकडेच सत्तासूत्रे हाती घेतली. नवी दिल्ली येथे याच महिन्याच्या पहिल्या सप्ताहामध्ये झालेल्या एका समारंभामध्ये त्यानी ही नवी जबाबदारी स्वीकारली. १९४८ मध्ये कृष्णराव लष्करामध्ये अधिकारी म्हणून दाखल झाले. ४१ वर्षांच्या आपल्या प्रदीर्घ लष्करी सेवेमध्ये त्यानी जबाबदारीच्या अनेक जागांवर काम केले असून अनेक लष्करी सन्मानही संपादन केले आहेत. प्रारंभी लंडनच्या इम्पीरिअल डिफेन्स कॉलेजमधून शिक्षण घेऊन ते भारतीय लष्करामध्ये अधिकारी म्हणून सामील झाले. आपल्या लष्करी जीवनामध्ये त्यानी युरोपमधील सर्व देशांना भेटी दिल्या आहेत. तसेच कॅनडा, अमेरिका आणि रशिया या देशांचे कामाच्या निमित्ताने दौरे केले आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ते ब्रह्मदेशामध्ये होते. तसेच त्या वेळी त्यांनी काही काळ भारताच्या उत्तर सीमेवरही काम केले. स्वातंत्र्योत्तर काळानंतर लगेचच काश्मीरमध्ये लष्करी हालचाल करावी लागली त्या वेळी ज्या मोजक्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना संधी देण्यात आली त्यामध्ये कृष्णराव याचा समावेश होता. १९७१ च्या युद्धाच्या वेळी मणिपूर आणि नागालँड येथे असलेल्या लष्करावर त्यांचे जनरल या नात्याने संपूर्ण नियंत्रण होते. विभागीय सेनानी म्हणून त्यानी त्या युद्धात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. विभागीय सेनानी म्हणून त्या वेळी त्यानी जी कामगिरी बजावली त्याबद्दल त्याना परमविशिष्ट सेवापदक देण्यात आले. त्या युद्धाच्या वेळी सिल्हेट मोहिमेचे संपूर्ण नियंत्रण विभागीय सेनानी कृष्णराव यानीच केले. आता भारताचे सरसेनानी म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर, १९७१ च्या युद्धाच्या वेळी डाक्का येथे जो शत्रूची शरणांगती स्वीकारण्याचा कार्यक्रम झाला, त्या समारंभाचे छायाचित्र त्यांनी मागवून घेतले असून आपल्या नवीन कचेरीत ते लावण्यास सांगितले आहे.

आपल्या लष्करी जीवनामध्ये जनरल कृष्णराव यानी ज्याप्रमाणे आघाडीवरील कामगिरी यशस्वीपणे पार पाडली आहे त्याचप्रमाणे व्यवस्थापकीय आणि अन्य तांत्रिक स्वरूपाच्या जबाबदाऱ्या निरनिराळया जागांवर काम करत असताना यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्विसेस स्टाफ कॉलेजमध्ये कृष्णराव यांनी इन्स्ट्रक्टर म्हणून काम केले आहे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ मिलटरी ऑपरेशन्स म्हणूनही त्यांनी काही काळ काम पाहिले आहे. १९६९–७० मध्ये त्यांनी जम्मू–काश्मीरमध्ये एका डिव्हिजनचे नेतृत्व केले. पश्चिम विभागाचे सेनाप्रमुख म्हणूनही त्यानी तीन वर्षे काम पाहिले त्याच जागेवरून त्यांची लेफ्टनंट जनरलपदी नियुक्ती करण्यात आली या अधिकाराच्या जागेवर असताना त्यांनी काश्मीरमध्ये पुन्हा १॥ वर्षं काम केले. प्रदीर्घ लष्करी अनुभव असलेले कृष्णराव आता जनरल झाले असून भारतीय सेनादलाचे सरसेनानी आहेत. लष्करी सेवेचा एक अपरिहार्य भाग म्हणजे बदली. अधिकारी, जवान आणि अन्य लष्करी सेवामधील मंडळी याना बदलीला तोंड देण्याची तयारी ठेवावीच लागते. स्वाभाविकपणे निरनिराळया ठिकाणी, विशेषतः सीमा-प्रदेशात जवानांना व अधिकाऱ्यांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते त्याची अधिकाऱ्याना परिपूर्ण कल्पना येते. अधिकार ग्रहण केल्यावर नवीन सरसेनापतींनी पहिल्या प्रथम नेमकी हीच गोष्ट सांगितली. ते म्हणाले की, सीमा-प्रदेशात काम करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्याना आणि जवानांना कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते याची मला पूर्ण कल्पना आहे आणि त्यामुळेच जवानांसाठी, विशेषतः आघाडीवर काम करणाऱ्या जवानांसाठी काही विशेष सोयी उपलब्ध करून देण्याचा मी जरूर प्रयत्न करीन.

मावळते सरसेनानी जनरल ओ. पी. मल्होत्रा यांच्याकडून त्यांनी या नवीन पदाची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर त्यांनी लगोलग पंतप्रधानांचीही भेट घेतली. या भेटीमध्ये त्यानी संरक्षणविषयक समस्या पंतप्रधानांसमोर ठेवल्या. तसेच आपल्या कारकीर्दीमध्ये आपण काय करू शकू याचीही कल्पना दिली. लष्कराची पुनर्रचना व आधुनिकीकरण यासाठी जी समिती नेमण्यात आली होती त्या समितीच्या अध्यक्षपदी त्यानी काम केले असल्याने या विषयाबाबत त्याची काही निश्चित मते आहेत. त्याचाही तपशील त्यांनी पंतप्रधानाना दिला.

## दांडगा आत्मविश्वास

सरसेनापतीला आत्मविश्वास असावाच लागतो; पण कृष्णराव यांचा आत्मविश्वास दांडगा आहे. आपल्या सैनिकाच्या सामर्थ्यावर आणि अधिकाऱ्याच्या युद्धकौशल्यावर त्यांचा दांडगा विश्वास आहे. देशावर कोणतेही संकट आले तरी त्याला तोंड देण्याचे सामर्थ्य आपल्या सेनेजवळ आहे असे ते आत्मविश्वासाने सांगतात. सरसेनापती म्हणून सूत्रे हाती घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी सैनिक–समाचारला मुलाखत दिली. याच मुलाखतीमध्ये त्यानी वरील विचार व्यक्त केले आहेत. त्याखेरीज त्यांना विचारण्यात आलेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली.

**प्रश्न :** देशावर युद्ध लादले गेले तर त्याला तोंड देण्याची व यश मिळविण्याची आपल्या लष्करात सिद्धता आहे काय ?

**उत्तर :** युद्ध करण्याची आपली इच्छा नसली तरी युद्ध लादले गेलेच तर त्याला सामोरे जावेच लागेल आणि आजची भोवतालची परिस्थिती अशी आहे की, आपल्या लष्कराला सतत युद्धतत्पर राहावेच लागेल. त्यासाठी सतत सराव, तसेच आधुनिक शस्त्रांचा वापर, काल्पनिक युद्धप्रसंग यांसारख्या गोष्टींद्वारा सैन्याला सतत सिद्ध ठेवावे लागते. देशाचे रक्षण करण्यासाठीच सैन्याचे अस्तित्व असल्याने याबाबत कोणतीही हयगय केली जात नाही.

**प्रश्न :** आपल्या कारकीर्दीमध्ये आपली काही विशेष योजना आहे काय ?

**उत्तर :** लष्कर हे नेहमी युद्धसिद्ध असलेच पाहिजे याची मी दक्षता घेईन. त्याचप्रमाणे जिवाची बाजी लावून देशसेवेचे काम करणाऱ्या माझ्या जवानांसाठी देशाची विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन जे करता येण्यासारखे आहे ते सर्व मी अवश्य करीन. लष्करावर जो अवाढव्य खर्च होतो त्या खर्चाला जनतेचा विश्वा-

साचे पाठबळ असते. लष्कर या विश्वासास पात्र आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी माझ्यावर आणि पर्यायाने मी ज्यांचे नेतृत्व करतो त्या सेनादलावर आहे आणि त्याबाबतीत भारतीय सेनादल कदापि मागे सरणार नाही असे मी निश्चितपणे म्हणू शकतो.

**प्रश्न :** भारतालगतच्या देशामधील हालचाली पाहता परिस्थिती स्फोटक आहे असे वाटते. याबाबत आपली प्रतिक्रिया काय आहे ?

**उत्तर :** १९७१ च्या युद्धानंतर पुन्हा लवकर युद्ध उद्भवणार नाही असे वाटत होते; पण प्रत्यक्षात परिस्थिती खूपच बदललेली दिसते आणि म्हणूनच आपल्यालाही लष्करी सिद्धतेच्या बाबतीत जराही कसूर करून चालणार नाही. मात्र प्रश्नाला उत्तर देताना सरसेनापतींनी चीन आणि पाकिस्तान यांच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, चीनने गेल्या काही वर्षांत आपले लष्करी सामर्थ्य जवळजवळ दुप्पट केले आहे. तिबेटमध्ये चिनी लष्कराच्या सात ते आठ डिव्हिजन्स असून तेथे अत्यल्प काळामध्ये तेवढ्याच डिव्हिजन्स उतरवता येतील अशा पद्धतीने वाहतूक-व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तिबेटमध्ये रेल्वेलाइन्स टाकण्यात आल्यामुळे लष्करी हालचाली सुकर झाल्या आहेत. १९७१ मध्ये म्हणजे बांगलादेश--युद्धाच्या वेळी पाकिस्तानची एकत्रित शक्ती जेवढी होती त्यापेक्षाही पाकिस्तान आज जास्त प्रबळ झालेला दिसतो. लष्करी साहित्य, हत्यारे आणि मनुष्यबळ यामध्ये पाकिस्तानने प्रतिवर्षी भर घातली आहे. त्यामुळे आपण दखल घ्यावी एवढे त्या देशाचे सामर्थ्य खचितच आहे.

**प्रश्न :** पाकिस्तानला अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रपुरवठा होत आहे. त्याचा खरा धोका भारतालाच नाही काय ?

**उत्तर .** अमेरिकेकडून मिळालेल्या शस्त्राचा भारताविरुद्ध वापर करणार नाही असे सुस्पष्ट आश्वासन देऊनही पाकिस्तानने अमेरिकेन शस्त्रास्त्राचा भारताविरुद्ध वापर केलेला आहे आणि तरीही अमेरिका जर शस्त्रपुरवठा करत असेल तर आपल्याला जागरूक रहावेच लागेल पाकिस्तान अमेरिकेकडून विमाने, हेलिकॉप्टर, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे तसेच प्रभावी क्षेपणास्त्रे खरेदीकरत आहे. या शस्त्रांचा वापर कोठे व कशा पद्धतीने केला जातो ते अनुभवावरून चागलेच माहीत आहे.शस्त्रे पदरात पाडून घेण्यासाठी कोणतीही आश्वासने दिली गेली तरी त्याचा वापर करताना ही आश्वासने धाब्यावर बसवली जातात. शस्त्रपुरवठा करणाऱ्या अमेरिकेसारख्या देशाने या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

**प्रश्न :** पाकिस्तान व चीन यांच्याकडून जो वाढता धोका आपल्या देशाला आहे, त्याबाबत कोणते उपाय योजले जात आहेत ?

**उत्तर :** अमुक एका राष्ट्राकडून धोका आहे असे म्हणणे अवघड आहे; परंतु आमच्या लष्कराची रचना, वृद्धी आणि हालचाली या गोष्टी अतिशय विचारपूर्वक केल्या जातात. अर्थात याबाबतचा तपशील सांगणे सयुक्तिक होणार नाही. मी फक्त एवढेच म्हणेन की, भारतासारख्या शांतताप्रिय राष्ट्रालाही शांतता टिकवून धरण्यासाठी सतत युद्धसज्ज रहावे लागते. युद्ध लादले गेले तर त्यातून यशस्वीपणे बाहेर पडले पाहिजे एवढी सिद्धता ठेवावी लागते आणि तसा विश्वास सर्वसाधारण जवानापासून सर्वांना वाटला पाहिजे असे शिस्तबद्ध वातावरण ठेवावे लागते. शस्त्रास्त्राच्या बाबतीत भूदलाला अत्याधुनिक शस्त्रे पुरवण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.

**प्रश्न ·** तिन्ही सेनादलांमध्ये सुसूत्रता असावी यासाठी कोणते उपाय योजले जातात ?

**उत्तर :** हा प्रश्नच चुकीचा आहे. तिन्ही सेनादलामधील सुसूत्रता हा गृहीत भाग धरावा लागतो. हवाईदल, भूदल आणि नौदल याच्यामध्ये सुसूत्रता असल्याखेरीज लष्कराची उभारणी होऊच शकणार नाही. आपल्या सेनादलाच्या बाबतीतही या सुसूत्रतेला असाधारण महत्त्व आहे. या तिन्ही दलाचा परस्परांशी सतत संपर्क असतो. पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धाच्या वेळी आपल्या विमानदलाने किती उत्तम कामगिरी बजावली ! आणि भूदल आणि विमानदल याच्यामधील परस्पर सहकार्य उत्कृष्ट प्रतीचे असल्यामुळेच भूदलाला आपले काम चोख बजावता आले. तिन्ही सेनादलाची सुसूत्रता ही पायाभूत गोष्ट आहे आणि आपल्या देशाच्या लष्करी निर्णयावर नेहमीच तिन्ही दलाच्या एकत्रित विचाराचा ठसा उमटलेला असतो.

**प्रश्न ·** जवानाचे वेतनमान आणि अन्य सुविधा याबाबत तुम्ही समाधानी आहात का ?

**उत्तर :** या गोष्टीला प्राधान्य असले तरी त्याचा अलग विचार करता येत नाही. देशाच्या एकंदर आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात जवानाचे वेतन आणि अन्य सुविधा यांना पुरेसे प्राधान्य दिले जाते की नाही ही बाब महत्त्वाची असते आणि मला असे वाटते की, शासन याबाबतची आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत आहे. विमायोजनेची आता यशस्वीपणे अंमलबजावणी होत आहे. या योजनेमुळे जवान आणि सैन्यातील अधिकारी यांच्या कुटुंबियाना फार मोठा दिलासा मिळाला आहे. तथापि जवानांना उपकारक ठरणाऱ्या अन्य अनेक कल्याणयोजनांबाबत पुष्कळ काही करता येण्यासारखे आहे. कुटुंबियापासून लष्करी सैनिकाला दीर्घकाळ दूर रहावे लागते. कुटुंबियांसह राहता येईल अशा निवासी जागाचे प्रमाण १४% वाढवण्याचा निर्णय झालेला असला तरी प्रत्यक्षात ७% टक्क्यांनीही अशा जागाचे प्रमाण वाढलेले दिसत नाही. हे प्रमाण वाढविण्यासाठी मी प्रयत्नशील रहाणार आहे. अर्थात अनेक मर्यादांमध्ये काम करावे लागते. अग्रक्रम ठरवतानाही अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात याचे भान मला आहे. तथापि कल्याण योजनेबाबत जेवढे करता येणे शक्य आहे तेवढे मी अवश्य करीन आणि याबाबत सतत आग्रही भूमिका घेईन.

**प्रश्न:** लष्कराला अनेक वेळा नागरी स्वरूपाची कामे करावी लागतात. मोठ्या प्रमाणात आपत्ती कोसळली तर लष्कराला पाचारण करण्यात येते. याबाबत आपले मत काय आहे?

**उत्तर:** याबाबत मत देण्याचा प्रश्नच येत नाही. जी जबाबदारी आमच्यावर सोपवण्यात येते ती निर्धारपूर्वक पार पाडणे एवढेच आमचे काम. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आणि नागरी भागामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी ज्या वेळी आमचे सहकार्य घेण्यात येते तेव्हाच आमचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येतो आणि त्या वेळी आम्ही जे काम करतो त्यामुळेच जनतेमध्ये आमच्याबद्दलची आपलेपणाची भावना निर्माण होते.

## □ हरिजनांचे धर्मांतर – एक जबर तडाखा

सवर्णांकडून सतत होत असलेला त्रास, साध्या नागरी सुविधा मिळण्याबाबत होत असलेली उपेक्षा आणि उच्चवर्णीयांकडून होणारी छळणूक याला कंटाळून तामीळनाडू-केरळसीमेवरील तिरुनवेल्ली जिल्ह्यामधील मीनाक्षिपुरम या गावामधील हरिजनांनी सामुदायिकरीत्या हिंदुधर्माचा त्याग करून मुस्लिमधर्माचा स्वीकार केला. या छोट्या गावामध्ये ९४५ हरिजन आहेत. त्यापैकी ५५८ व्यक्तींनी सामुदायिकरीत्या मुस्लिमधर्माचा स्वीकार केला. मुस्लिम धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या 'साउथ इंडियन इस्लामिक सोसायटी'

या संस्थेने या कामी हरिजनांना मार्गदर्शन केले, आर्थिक सहाय्य दिले व समान भावनेच्या वागणुकीचे आश्वासन देऊन त्यांना आपल्या धर्मात सामावून घेतले. १९६९ पासून गेल्या १२ वर्षांत सुमारे ८ हजार दलित हिंदूना मुस्लिम धर्मात सामावून घेतले आहे. मीनाक्षिपुरम येथे ज्या ५५८ व्यक्तींनी, मुस्लिम धर्माचा स्वीकार केला आहे, त्यांच्या घरामधील परिस्थिती मोठी विचित्र झाली आहे. कारण एकाच घरामधील सर्व व्यक्तींनी धर्मांतर न केल्याने स्वतःचे नात्याने बांधले गेलेले परंतु धर्मांतरामुळे दुरावले गेलेले हिंदु व मुसलमान तेथे एका घरात राहताना दिसत आहेत. आश्यप्पा पिल्ले नावाच्या इसमाने धर्मांतर केले नाही; परंतु त्याचा भाऊ शशी मात्र मुसलमान झाला आहे. आधी करत होते तेच काम आणि आधी मिळत होता तोच दाम घेऊन हे हिंदु-मुसलमान तेथे एकत्र रहात आहेत. व्यंकटेश नावाचा वृद्ध धर्मांतरास तयार होता; परंतु असे धर्मांतर केल्यास त्याच्या मुलीच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होईल. कारण बऱ्यापैकी मुस्लिम मुलगा मिळण्यासाठी त्याला कमीत कमी १॥ हजार रुपये मेहेर म्हणून मोजावे लागतील, असे त्याला सांगण्यात आल्याने या वृद्धाने धर्मांतराचा आपला विचार सोडून दिला. कारण हरिजन म्हणून चार–पाचशे रुपयांत आपली पोर त्याला आता उजवता येईल. निम्म्यापेक्षा अधिक मंडळींनी धर्मांतर केल्यामुळे ज्यांनी धर्मांतर केले त्यांनी गावाचे नाव बदलण्याचाही निर्णय घेतला व मीनाक्षिपुरमचे रहिमतनगर असे नामकरण करण्यात आले. तथापि या नामांतराला शासनाची मान्यता मिळाली नसल्याने कागदोपत्री अजून रहिमतनगर अशी नोंद झालेली नाही. ज्यांनी धर्मांतर केले त्यांनी आपले धर्मांतर झाल्याचे शासनाला कळवून सरकारी गॅझेटद्वारा त्याची प्रसिद्धी करणे बंधनकारक असते; परंतु असे केल्याने या गोष्टीची अवाजवी वाच्यता होईल असे वाटल्याने साउथ इंडियन इस्लामिक सोसायटीने याबाबत नरमाईचे धोरण स्वीकारले आहे. प्रत्यक्षात एकाच समारंभामध्ये एकाच वेळी ५५८ हिंदूना मुस्लिम धर्मात सामावून घेण्यात आले असले तरी या धर्मांतराबाबत पुढाकाराची भूमिका घेणाऱ्या इस्लामिक सोसायटीने दरमहा केवळ २० व्यक्तींची नावे गॅझेटद्वारा प्रसिद्ध होतील अशी दक्षता घेतली आहे,

ज्या ठिकाणी हे धर्मांतर झाले त्याच्या परिसरामध्ये थेवर या उच्चवर्णी हिंदु समाजाचे वर्चस्व आहे. मीनाक्षिपुरमपासून जवळच असलेल्या मेकराई नावाच्या खेड्यात थेवर जमातीमधील दोन व्यक्तींचे खून झाले. हे खून हरिजनाकडून झाले असावेत असे समजून थेवर समाजातर्फे पोलिसांवर दडपण आणण्यात आले. पोलिसाकडून अनेक हरिजनाची अकारण छळवणूक करण्यात आली.. पानबोझी हे मीनाक्षिपुरमजवळ - असलेले आणखी एक गाव. या गावात थेवर समाजाची वस्ती जास्त. उच्च वर्णीय असला तरी येथील थेवर समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेलाच आणि त्यांच्या तुलनेमध्ये मीनाक्षिपुरममधील हरिजनाची आर्थिक स्थिती उजवी आहे. या समाजात दोन डॉक्टर्स व एक इंजिनिअरही आहे. शासनातर्फे ज्या सवलती देण्यात येतात त्यांचा लाभ घेऊन हरिजन समाजाने आपली परिस्थिती सुधारली आहे. थेवर समाजाला ही गोष्ट रुचली नाही आणि त्यांनी हरिजनांना त्रास देण्यास प्रारंभ केला. एका हरिजनाने पानबोशी येथे चहाचे दुकान घातले; परंतु त्याला तेथून हुसकावून लावण्यात आले. तसेच आणखी एक किराणा दुकान घालणाऱ्या हरिजनाला मारहाण करण्याची धमकी देण्यात आली. त्याने पोलिसाचे संरक्षण मागितले; परंतु ते मिळू शकले नाही आणि त्यालाही बिचाऱ्याला आपला गाशा गुंडाळावा लागला आणि व्यवसायासाठी घेतलेली शासकीय मदत परत करावी लागली. मीनाक्षिपुरममधील अनेक हरिजन शेतमजूर म्हणून काम करतात. एका मठाची जमीन कसण्यासाठी त्यांना दररोज पाणबोटीमधून जावे लागते. तथापि तेथील थेवर समाज त्यांना कामावर जाऊन देताना त्रास देऊ लागला आणि त्यामुळेही काही चकमकी उडाल्या. बारीक-सारीक गोष्टीतही जातीच्याच दृष्टिकोनातून विचार सुरू झाला. बसमधून जात असताना एका कंडक्टरने एका उतारूस सिगारेट पिण्यावरून हटकले. वास्तविक हटकणारा कंडक्टर त्याचे कर्तव्य करत होता. तरीही गाडीतून प्रवास करणाऱ्या बहुसंख्य थेवर मंडळींनी हरकत घेणारा कंडक्टर हरिजन आहे या सबबीवर सिगारेट ओढणाऱ्या उतारूची बाजू घेतली. इतकेच नव्हे, त्याच्या बाजूने कंडक्टरविरुद्ध तक्रार गुदरली. या बारीक–सारीक गोष्टीतून वातावरणातील तणाव वाढत गेले आणि त्यात दोन थेवर समाजामधील व्यक्तींचे खून पडल्यामुळे भर पडली. हे सारे असह्य झाल्यामुळे हरिजनांमध्ये ज्याच्या शब्दाला किंमत होती अशा एका सुशिक्षित तरुणाने धर्मांतराचा प्रस्ताव समोर ठेवला. प्रारंभी थोडाफार विरोध झाला; परंतु बहुसंख्य मंडळी धर्मांतराला अनुकूल आहेत हे लक्षात आल्यावर तो तिरुनवेल्ली येथे गेला व तेथील साउथ इंडियन इस्लामिक सोसायटीच्या पदाधिकाऱ्याबरोबर सर्व गोष्टी निश्चित करूनच परत आला. ठरल्या योजनेप्रमाणे गेल्या महिन्याच्या १९ तारखेस हा धर्मांतराचा सोहळा पार पडला. ज्या तरुणाने पुढाकार घेतला होता त्याला विचारण्यात आले की, मुस्लिम धर्माचीच निवड का केली ? तर त्यावर त्याने उत्तर दिले, आम्ही नवबौद्ध झालो तर केवळ मानसिक समाधान मिळते. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तर धर्मांतर करताना जे काही थोडेबहुत देण्यात येते त्यानंतर या समाजाकडून अथवा त्यांच्या धर्मपीठाकडून कोणतेही सहकार्य मिळत नाही. मुस्लिम समाज व मुस्लिम धर्म मात्र आपल्या धर्मबांधवासाठी शक्य ते सर्व काही करण्यास सदा तत्पर असतो. खेरीज या धर्मांतरामुळेच सवर्ण हिंदूचा सूड घेतल्याचे समाधानही मिळू शकते !

## सरकारी चौकशी–उशीरा जाग !

या धर्मांतराच्या बातमीचा बराच गवगवा झाल्यानंतर आर्यसमाजाने आपले चौकशी–पथक पाठवले. तिरुनवेल्ली येथील हिंदु समाज सुधारक समितीनेही लगोलग हालचालीस प्रारंभ केला. मीनाक्षिपुरम येथील हरिजनांना या समाजातर्फे आर्थिक सहाय्य देण्यात आले. तसेच ज्यांनी धर्मांतर केले नाही अशा मंडळींच्या नेत्याबरोबर चर्चा करून अन्य अडचणी दूर करण्याचे आश्वासन देण्यात आले. या धर्मांतरामुळे थेवर समाजामधील लोकही चांगलेच हादरले आणि पानबोझी येथे हरिजनांना समान वागणूक दिली जाईल असे सुस्पष्ट आश्वासन त्यांनी दिले, इतकेच नव्हे तर ज्या हरिजन तरुणाने त्रासाला कंटाळून चहाचे दुकान बंद केले होते, त्या तरुणाला थेवर समाजातर्फे पानबोझी येथे जागा देण्यात आली आहे. ज्यांनी धर्मांतर केले त्यांच्याबरोबर बातचीत करण्यात आली आणि त्यापैकी ३८ जणांना शुद्धीकरणविधीनंतर पुन्हा हिंदू करवून घेण्यात आले. सामुदायिक धर्मांतराच्या या प्रकाराची चौकशी करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाच्या दलित समाज कल्याण संचनालयाचे एक वरिष्ठ अधिकारी एम्. के. अरुमुधम मीनाक्षिपुरम येथे जाऊन आले. या प्रकरणी त्यांनी जो अहवाल सादर केला त्यामध्ये धर्मांतरप्रकरणी जबरदस्ती झालेली नसली तरी लालूच दाखवण्यात आली अशी नोंद केली असून काही उदाहरणेही दिली आहेत. धर्मांतराचे हे प्रकरण चांगलेच गाजल्याने या प्रकरणी पुढाकार घेणाऱ्या साउथ इंडियन इस्लेमिक सोसायटीने नव्यानेच आपल्या धर्मात आलेल्या धर्मबांधवाना सहाय्य करण्यासाठी मीनाक्षिपुरम येथे आपले दोन पदाधिकारी सहा महिनेपर्यंत ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. □

# नासिकचा शेतकरी निपाणीच्या शेतकऱ्यामागे उभा राहिला असता तर ?



लेखक : विजय परुळकर । लेखांक : सातवा

२४ फेब्रुवारी १९८१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजराथ येथील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्या मेळाव्याअगोदर दोन-तीन दिवस, मेळाव्याची पूर्वतयारी म्हणून, शरद जोशींनी बेळगाव आणि कोल्हापूर जिल्ह्यांचा दौरा केला. ह्या तीन दिवसांत त्यांच्या पंधरा सभा झाल्या आणि मेळाव्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी जमणार असा रंग दिसू लागला.

तंबाखू पिकविणाऱ्या भागातून सभा घेत दौरा करत असतानाच शरद जोशींनी कार्यकर्त्यांशी, शेतकऱ्यांशी सांगोपांग चर्चा करून तंबाखूच्या उत्पादनखर्चाची शास्त्रोक्त आकडेवारी निश्चित केली, त्याचबरोबर तंबाखूच्या दरासाठी जर आंदोलन छेडायची वेळ आली तर त्या आंदोलनाची दिशा, मार्ग, तंत्र आणि कार्यक्रम ठरविण्यासाठी कर्नाटकचे गांधीवादी पुढारी श्री. अण्णु गुरुजी ह्यांच्या नेतृत्वाखाली एक कृतिसमिती स्थापन केली. ह्या कृतिसमितीमध्ये कोल्हापूरचे एस. के. पाटील, संकेश्वरचे बसगौडा पाटील, अकोळचे आय. एन्. बेग आणि सातप्पा शेटके, गळदग्याचे एस्. टी. चौगुले, एकसंब्याचे दत्ता पांगम, कापशीचे शामराव देसाई आणि निपाणीमधील गोपीनाथ धारिया ऊर्फ 'भाई' आणि आयेशा-शान ए दीवान ऊर्फ 'चाची' ह्यांचा समावेश होता.

२४ फेब्रुवारीच्या पहाटेपासूनच निपाणीमध्ये शेतकऱ्यांची वर्दळ सुरू झाली. त्याचबरोबर पोलिसांचा पहारादेखील वाढत चालला. साप्ताहिक 'सोबत'चे संपादक श्री. ग. वा. बेहेरे ह्यांची भेट घेण्यासाठी जमलेल्या कॉलेजयुवकांनी, बेहेऱ्यांच्याबरोबर मनमोकळ्या गप्पा मारून झाल्यावर निपाणीमधून विद्यार्थ्यांचा मोर्चा काढून मेळाव्यात सामील होण्याचा निर्णय जाहीर केला.

मेळाव्यासाठी निपाणीमधील निंबाळकर वाड्यासमोरच्या प्रशस्त मैदानात एक भव्य मंडप उभारण्यात आला होता. सभेची वेळ जवळ येत चालली तशी मंडपातील गर्दी वाढू लागली. शरद जोशींचे विचार आणि कृतिसमितीतर्फे मांडण्यात येणारा ठराव ऐकण्यासाठी जमलेल्या ह्या समुदायाला 'गर्दी' म्हणणं तसं पाहता जरा अयोग्यच ! तंबाखू आणि विडीकामगार-स्त्रिया, तंबाखू उत्पादक शेतकरी, शेतमजूर आणि कॉलेज-विद्यार्थी ह्यांचा एक शिस्तबद्ध समुदाय भव्य मंडपाच्या सावलीखाली जमला होता, अतिशय शांतपणे बसून होता. घोषणाबाजी नाही, गडबड-गोंधळ नाही. सर्वत्र शिस्त, शांतता आणि टापटीप. सभेसाठी जमलेल्या श्रोत्यांची संख्या बारा-पंधरा हजाराच्या आसपास असावी. श्रोत्यांमध्ये शिस्त होती; पण व्यासपीठावर मात्र जाणवण्याइतकी 'गर्दी' आणि नजरेस पडावा इतका गोंधळ होता. शरद जोशी, अण्णु गुरुजी, सातप्पा, बेग, धारिया ह्यांच्या आजुबाजूला दाटीवाटीनं अनेकजण व्यासपीठ अडकवून बसले होते. व्यासपीठावर बसलेले नेते, कार्यकर्ते आणि 'बसलेले' सर्वचजण दाटीवाटीमुळं काहीसे हैराण झाल्यासारखे दिसत होते. सुभाष जोशी व्यासपीठावर नव्हता, तो श्रोत्यांमध्ये काही तरुण शेतकऱ्यांच्या समवेत, एका कोपऱ्यात आरामात बसला होता.

व्यासपीठावरून बोलू इच्छिणारे कार्यकर्ते आणि शरद जोशी ह्यांची भाषणे संपल्यानंतर कृतिसमितीने एक ठराव मांडला. तो एकमुखानं सर्वांनी संमत केला. त्या ठरावातील मुख्य मुद्दे असे :

व्यापाऱ्यांनी तंबाखूची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमानुसार आणि कायद्याला धरून करावी, तंबाखूचा उत्पादनखर्च एका किलोस रु. ११. ४० इतका असल्यामुळं पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या दर्जाच्या तंबाखूस अनुक्रमे रु. १५, रु. १२ आणि रु. १० हा भाव मिळावा. सरकारने तंबाखूची एकाधिकार खरेदी करावी.

व्यापाऱ्यांनी जर खरेदीच्या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमांचे पालन करण्यास नकार दिला तर कृतिसमितीला आंदोलनाचा विचार करावा लागेल. सरकारने ह्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास १४ मार्च १९८१ पासून तंबाखू उत्पादक शेतकरी आंदोलन करतील. तंबाखू खरेदीबाबत कृतिसमितीनं ज्या मागण्या मान्य केल्या त्यांपैकी प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे :

☐ तंबाखूची खरेदी किलोच्या हिशोबानं करावी.

☐ सौदा ठरताच खरेदीचा करार लेखी असावा.

☐ तंबाखूचा दर त्यामधील काडीमातीचा अंदाज आणि दर्जा पाहून ठरवला जावा.

☐ बारदान-सूट दोन किलो धरावी.

☐ त्याव्यतिरिक्त इतर कुठल्याही 'सुटी' व्यापाऱ्यांनी घेऊ नयेत.

☐ सौदा ठरताच सात दिवसांचे आत तंबाखूचे वजन केले जावे आणि सौदा करणाऱ्या खरेदीदाराने शेतकऱ्याच्या तंबाखूच्या वजनाची लेखी पावती द्यावी.

☐ तंबाखू खरेदी करणाऱ्याने शेतकऱ्याला मिळायच्या रकमेतून कसलेही 'कमिशन' कापून घेऊ नये.

☐ तंबाखूचे वजन झाल्यावर खरेदीदाराने शेतकऱ्याचे पैसे शक्यतो लगेच रोख चुकते करावेत. कुठल्याही परिस्थितीत सात दिवसांचे आत शेतकऱ्याला त्याचे सर्व पैसे रोख मिळणे आवश्यक आहे. खरेदी करणाऱ्याकडून पैसे देण्यास विलंब झाला तर त्या रकमेवर व्याज आकारण्यात यावे.

☐ मार्केट सेस्, एंट्री-टॅक्स नियमानुसार तंबाखू खरेदी करणाऱ्याने भरावा हा कर तंबाखू उत्पादक शेतकऱ्याकडून वसूल केला जाऊ नये.

☐ नियमाप्रमाणे वाहतूकखर्चदेखील खरेदी करणाऱ्याने करावा. तंबाखू उत्पादक शेतकऱ्यावर हा खर्च लादण्यात येऊ नये.

निपाणी येथील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्या मेळाव्यानं एकमतानं संमत केलेल्या ह्या ठरावाच्या प्रती २४ फेब्रुवारी १९८१ रोजीच पंतप्रधान इंदिरा गांधी, अन्नमंत्री राम बीरेंद्रसिंग, व्यापारमंत्री प्रणवकुमार मुखर्जी, कर्नाटकचे मुख्यमंत्री गुंडुराव आणि महाराष्ट्राचे अंतुलेसाहेब ह्यांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आल्या. १४ मार्च १९८१ च्या दुपारी तीनपर्यंत ह्यांपैकी एकानेही कृतिसमितीला साधं उत्तर पाठविण्याची देखील 'क्षमता' दाखविली नाही. कृतिसमितीनं मांडलेल्या ठरावातील मागण्यांचा अभ्यास केल्यास त्यात अवास्तव असं काही आहे हे म्हणणं धाडसाचं ठरेल. तंबाखूचा प्रति-किलोभाव काय असावा, उत्पादनखर्च कसा काढावा ह्याबद्दल थोडेफार मतभेद असण्याची शक्यता आहे; पण हे मतभेद चर्चा करून सहजच सोडवणं शक्य होतं; पण शासनानं, नाशिक आंदोलनाच्या सुरुवातीला घेतली तशीच, आडमुठेपणाची भूमिका स्वीकारलेली. मग शेतकऱ्यानं काय करावं? त्याला काय हौस आहे आंदोलन करायची आणि रस्ते अडविण्याची? पण दुसरा इलाज काय? दिल्लीकर, बंगलूकर, मुंबईकर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मौनच स्वीकारणार असतील तर शेतकऱ्यासमोर सविनय कायदेभंग करून ह्या मायबाप सरकारचं प्रश्नाकडे लक्ष वेधणं ह्याखेरीज दुसरा पर्याय तरी कुठला उरतो? २४ फेब्रुवारीला पाठविलेल्या निवेदनाला १४ मार्चपर्यंत म्हणजे आंदोलन सुरू होण्याच्या तारखेपर्यंत शासनकर्त्यांकडून कसलाही प्रतिसाद येत नाही ह्याचा अर्थ काय? शासनकर्त्यांच्या दृष्टीनं ह्याचा अर्थ काहीही असो. एक अर्थ मात्र निश्चितच काढता येत नाही—तो म्हणजे शरद जोशीला आंदोलनाची रस्ते अडविण्याची अजिबात हौस नाही; पण शासनालाच शेतकऱ्याला आंदोलनाच्या भरीस पाडण्याची आणि नंतर लाठ्यांनी बडवून, गोळ्या घालून मारण्याची 'खाज' आहे, असाच निष्कर्ष ह्यातून निघतो. शासनकर्ते व्यापारी—दलालांचे मिंधे आहेत असाच एकमेव अर्थ ह्यातून काढणं शक्य आहे.

अर्थ काहीही असो २४ फेब्रुवारीला पाठविलेल्या निवेदनाला शासनाकडून १४ मार्चच्या दुपारपर्यंत काहीही प्रतिसाद मिळाला नाही हे सत्य!

आणि १४ मार्च १९८१ च्या दुपारी तीन वाजता पुणे—बंगलूर राष्ट्रीय हमरस्ता नंबर चार ह्या मार्गावर निपाणीला वळसा घालून जाणारा 'बायपास' आणि गावात जाणारा रस्ता ह्यांच्या नाक्यापासून 'रस्ता रोको' आंदोलन सुरू झालं!

रस्त्यावर सर्वप्रथम तंबाखू आणि विडीकामगार—स्त्रियांचा गट येऊन बसला आणि सविनय कायदेभंगाला सुरुवात झाली. पाच-सहा हजार कामगार—स्त्रियांच्या गटाच्या मागं प्रत्येक खेड्याचे लोक गटागटानं रस्त्यावर येऊन बसू लागले. बघता बघता तीस-पस्तीस हजार आंदोलकांनी निपाणीपासून यमगर्णीपर्यंतचा रस्ता अडवला.

सर्व सत्याग्रही लाठीहल्ला, अश्रुधूर, गोळीबार, अटक ह्या सर्वाला तोंड द्यायच्या तयारीनच आले होते.

पोलीसदेखील जय्यत तयारीत होते. दहाबारा जीप्स, आठ—दहा पोलीसव्हॅन्स् जाळी लावलेल्या आणि बंदुका झाडण्यासाठी 'खिडक्या' असलेल्या पंधरावीस एस्. टी.च्या गाड्या, अटक केलेल्या सत्याग्रहींना तुरुंगात नेण्यासाठी सज्ज असलेले, कमरेला पिस्तुल लटकावलेले, कडक इस्त्रीमधले फौजदार, पोट सुटलेले वरिष्ठ अधिकारी, डोक्यावर हेल्मेट परिधान केलेले दंडुकधारी एस्आरपी सर्व-तयारी जय्यत!

पण हालचाल काहीच नाही. कसोशीनं शिस्त राखून असलेले पोलीस सहजपणे शिस्त पाळणाऱ्या किसानाला पाहून काहीसे अवाक् झालेले स्त्री—कामगार सत्याग्रही, शेतकरी आंदोलक आणि कार्यकर्ते 'तंबाखूला भाव मिळालाच पाहिजे!' ह्याव्यतिरिक्त दुसरी कुठलीही 'प्रक्षोभक' घोषणा देत नव्हते. शिवीगाळ, आरडाओरडा हे तर दूरच मग दगडफेक वगैरे 'हिंसक' प्रकार अशक्यच! सगळे आंदोलक हाताची घडी घालून रस्त्यावर शांतपणे बसून राहिलेले! 'स्वसंरक्षणार्थ' म्हणून कुठलं निमित्त सांगून ह्यांच्यावर लाठीहल्ला करायचा? काय कारणास्तव अश्रुधूर सोडायचा आणि लाठीहल्ला किंवा अश्रुधूर ह्यांची देखील गरज नसताना गोळीबार तरी कुठल्या तोंडानं करायचा?

आंदोलक शेतकऱ्यांची शांतता आणि शिस्त पाहून पोलीस अवाक् आणि पोलिसांची 'स्थितप्रज्ञता' पाहून आंदोलक शेतकरीदेखील अवाक्! कार्यकर्ते काहीसे गोंधळलेले. खाकी गणवेषधारी आपल्याला लगेच अटक का करत नाहीत असा शेतकरी सत्याग्रहींच्या चेहऱ्यावर प्रश्न आणि त्यापेक्षा भलं मोठं प्रश्न चिन्ह पोलीसअधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर! तीस—पस्तीस हजार आंदोलकांना अटक कसं काय करायचं?

प्रश्नचिन्ह नव्हतं फक्त शरद जोशींच्या चेहऱ्यावर आणि सुभाष जोशींचा चेहरा तर निर्विकार होता—थंड! शरद जोशीला सरकारची चाल माहिती होती आणि सुभाष जोशीला आंदोलनांचा अनुभव होता; पण इतक्या मोठ्या संख्येनं सत्याग्रहात प्रथमच उतरणाऱ्या शेतकऱ्याला पोलीस आमच्यावर अश्रुधूर सोडीत नाहीत, लाठीहल्ला करत नाहीत, गोळीबार करत नाहीत, अटकेचं नाव सुद्धा काढत नाहीत हा पहिला अनुभव काहीसा अपेक्षाभंग करणारा होता!

आणि त्यामुळंच रस्त्यावर सविनय कायदेभंग करण्यासाठी बसलेला आंदोलक शेतकरी वरकरणी शांत दिसला तरी मनोमन प्रचंड

गोंधळलेला होता. लाठी खायच्या तयारीनं आलो ! अश्रुधूर, गोळी-बार सहन करण्याच्या तयारीनं आलो ! तुरुंगात जायचं म्हणून एका पिशवीत दोन कपडे आणि चादर घेऊन आलो ! पण ह्यातलं काहीच घडत नाही. मग करायचं तरी काय ?

नेत्याला देखील, हे अनपेक्षित नसलं तरी, प्रश्न पडला असावा; शासनकर्त्यांनं अटक करायचं नाही, दंडुकेशाही करायची नाही, बळाचा वापर करायचा नाही, असं धोरण स्वीकारलं तर पुढं काय करायचं ? दोन बलदंड पैलवानांनी गर्जना ठोकत आखाड्यात उतरावं आणि आता भयंकर झटापटीची निकाली कुस्ती पहायला मिळणार अशी अपेक्षा असताना दोघांनी फक्त एकमेकांचे लंगोट धरून नुसतीच खडाखडी करावी असा काहीसा प्रकार !

पोलीसखातं काहीच हालचाल करत नाही, करण्याच्या 'मूड'-मध्ये नाही ह्याचा अंदाज येताच नेत्यानं कार्यकर्त्यांमार्फत भराभर सूचना दिल्या आणि प्रत्येक खेडेगावच्या शेतकरी सत्याग्रह्यांच्या गटानं आपआपल्या जागी बसून राहावं आणि तंबाखूला भाव मिळेपर्यंत हा हमरस्ता 'रात्रंदिवस अडवून धरावा' असा आदेश दिला.

सत्याग्रही तर अटक होऊन तुरुंगात जाण्याच्या तयारीनं आलेले ! रस्त्यावर मुक्काम करण्याच्या तयारीनं नव्हे. रात्री झोपायचं कुठं ? पांघरायचं काय ? रात्रीच्या भाकरीची सोय काय ?

रणरणत्या उन्हात तापलेल्या डांबरी सडकेवर बसून पोळलेल्या शेतकरी सत्याग्रह्यांच्या मनात विचारांचा हा कल्लोळ माजला असतानाच पश्चिम क्षितिजानं एकाएकी उग्र स्वरूप धारण केलं. मावळत्या सूर्याच्या भोवती काळ्याभोर मेघांनी एकाएकी दाटी केली. अशुभसूचक अंधारून आलं. एकाएकी सुसाट वारं सुटलं. अक्राळ-विक्राळ ढग वेगानं सत्याग्रही शेतकऱ्यांच्या दिशेनं येऊ लागले. शेतकरी हवालदिल झाला. त्याला पावसात भिजण्याची भीती नव्हती. तो भिजण्याच्या तयारीनं आला नव्हता,' तो आला होता अटक करून घेण्यासाठी आणि पोलिसांच्या लाठीच्या तडाख्याऐवजी अचानक निसर्गाचा तडाखा बसणार म्हणून तो बावचळला होता !

– आणि अचानक वाऱ्यानं दिशा बदलली.सत्याग्रह्यांच्या माथ्यावर थैमान घालणारे मेघ दीड-दोन किलोमीटर दक्षिणेच्या दिशेनं सरकले. सूर्यावरचा झाकोळ दूर झाला. आंदोलकावरती गर्भरेशमी सोनेरी प्रकाश पसरला आणि निपाणीत कडाक्याची वीज पडली ! पावसानं निपाणीला झोडपून काढलं, कानठळ्या बसणारा गडगडाट करून विद्युल्लतेनं थैमान घातलं ! निसर्गाला काही तरी सांगायचं असावं–

– कारण रात्र पडली तेव्हा निपाणी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अंधारात बुडाली होती. सर्वत्र गटारं दुथडी भरून वाहात होती. –चिखलच चिखल !

आणि फक्त दीड किलोमीटर अंतरावर, पुणे-बंगलोर राष्ट्रीय हमरस्ता नंबर चार ह्या महामार्गावर - निपाणीचा टोलनाका ते यमगर्णी ह्या सडकेवर तीस-पस्तीस हजार आंदोलक शेतकरी, 'कुठं-तरी' कोसळलेल्या पावसामुळं वातावरणातील जीवघेणी उष्णता पळवून लावणाऱ्या, मुलायम गारव्याचा आनंद लुटत, एकमेकांची सुखदु:खं ऐकत भविष्याची स्वप्नं रंगवू लागले. निपाणीत मात्र गडद अंधार होता !

¤

'तंबाखूला योग्य दर मिळालाच पाहिजे !' ह्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी रात्रन्‌दिवस ठाण मांडून निपाणीजवळ रस्ता अडवला. तीस-पस्तीस हजार शेतकऱ्यांनी रस्त्यावर राहुट्या उभ्या करून वस्ती थाटली. त्या वस्तीला नाव पडलं 'आंदोलननगरी' ह्या आंदोलननगरीतील दैनंदिन घटनांची नोंद करून मनोहर बन्ने ह्या तरुण शेतकरी आंदोलकानं एक 'डायरी' लिहिली आहे. ही डायरी लवकरच प्रकाशित होत आहे- आंदोलननगरीतील बारीकसारीक घडामोडी ह्या डायरीत तपशीलवार वाचावयाला मिळतील. आंदोलननगरीतील शरद जोशींच्या सभा, भाई धारियांची अविश्रांत धडपड इत्यादीविषयी मनोहर बन्नेंनी खुलासेवार लिहिलं आहे. ह्या तरुण आंदोलक शेतकऱ्याचं हे पहिलंच पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे हे ध्यानात घेऊन मी आंदोलननगरीबद्दल थोडक्यात लिहिणार आहे.

–तर रस्ता अडवून दहा-बारा दिवस झाले तरी शासनाकडून कसलीच हालचाल होईना, तेव्हा शेतकरी काहीसे गोंधळले. १४ मार्च रोजी 'रस्ता रोको' आंदोलनाला सुरुवात झाली त्या दिवशी श्री. अण्णु गुरुजींच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांबरोबर वाटाघाटी करण्यासाठी रवाना झाले. गुंडुरावांनी ह्या शिष्टमंडळाची भेट घेऊन शेतकऱ्यांनी शांततापूर्ण आंदोलन केल्याबद्दल गौरवोद्‌गार काढले आणि केन्द्र सरकारशी संपर्क साधून लवकरच निर्णय घेऊ असे आश्वासन दिलं; पण प्रत्यक्षात केलं मात्र काहीच नाही. आंदोलक शेतकरी सरकार काही तरी हालचाल करेल म्हणून वाट पहात राहिलं.

मी आणि सरोजा रोज सकाळी दहाच्या सुमारास आंदोलननगरीत येऊन रात्री उशीरापर्यंत शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांशी गप्पा गोष्टी करत भजनं-कीर्तनं ऐकत त्या अनोख्या वातावरणात सामावून जात असू. एके दिवशी सातप्पा शेटकेबरोबर गप्पा मारत असताना मी त्यांना विचारलं, 'तुम्ही तरुण होता तेव्हा चळवळीत भाग घेतला होता का ?' सातप्पा सांगू लागले–

'घेतला हो, तरुण होतो तेव्हापासूनच चळवळीत भाग घेतला ! सुरुवातीला मी समाजवादी पक्षाचं काम केलं. ना. ग. गोरे, साने गुरुजी वगैरे मंडळी आमच्या भागात येऊन गेलीत; पण नंतर हळूहळू माझ्या लक्षात आलं की, हे समाजवादी बोगस आणि हवेत तरंगणारे लोक आहेत. ह्या भागातील सगळे समाजवादी जेव्हा कांग्रेसमध्ये मिसळले तेव्हा वैतागून मी त्या पक्षाचं काम सोडलं आणि कम्युनिस्टांचं काम करायला लागलो. मी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद नाही; पण जरूर पडल्यास त्याचं मार्गदर्शन घेतो. आमच्या अकोळ गावात शेतमजूर संघटना आहे. इतर गावात शेतमजुराला तीन रुपये

## हे समाजवादी हवेत तरंगणारे लोक आहेत....

रोज मिळतो; पण अकोळमध्ये पाच रुपये. आम्हाला खरं म्हटलं तर कुठल्याच पक्षाचं सभासद होण्याची गरज नाही. कुणीकडून शेवटी शेतकऱ्याचा आणि शेतमजुराचा फायदा झाल्याशी कारण! आम्हाला पक्षाच्या राजकारणाची जरूरच नाही. लोकाना खायला पोटभर मिळालं, अंगभर वस्त्र मिळालं म्हणजे झालं—पक्ष घेऊन काय चाटायचा आहे ?'

'पण सातप्पा, हे अन्न, वस्त्र, निवारा मिळवण्यासाठी एखाद्या राजकीय पक्षाच्या झेंड्याची गरज भासणारच ना ?'

'काही जरूर नाही. मी तुम्हाला सांगतो ह्या शेतकरी आदोलनामुळ राजकीय पक्षाचे झेंडे मोडतील ! ह्या भागातील सगळ्या पक्षाचे पुढारी आज मेल्यात जमा आहेत!'

'तुमचे ह्या भागातील आमदार—त्यांनी ह्या आंदोलनात सहभागी होण आवश्यक नव्हतं का ?'

'तुम्ही म्हणता ते खरं आहे; पण ते कुठल्या तोडानं सहभागी होणार ? लोकं जोड्यानं मारतील ! अहो, आमदाराला शेतकऱ्यांनी तारा पाठवल्यात; पण तो कुठला यायला !'

'ह्यापूर्वी जे पुढारी वेगवेगळ्या कारणासाठी ह्या परिसरात फिरून भाषणं ठोकून गेले त्याचं काय ? ह्या आदोलनाच्या वेळी त्यानी यायला नको ?'

'अहो, ते कसे येणार ?— व्यापाऱ्यांच्याकडून पैसे घेऊन हे पुढारी निवडून आले. आम्हीदेखील चार पैसे खाऊनच ह्याना मतं टाकून निवडून आणलं. चार दमडीची किंमत नसलेले हे पुढारी आता कसे येणार ? आले तर बोलणार काय ?'

'तुम्ही स्वतः ह्या तंबाखू आदोलनात कधीपासून उतरलात ?'

'हू व्यापारी लोक मार्केट कमिटीच्या कायद्याप्रमाणे व्यवहार करत नव्हते. रिवाजाच्या नावाखाली वजनामध्ये वाटेल तशी कपात, दर नोट द्यायचा नाही, पैसे वेळवर द्यायचे नाहीत, सारखी अडवणूक करायची. ह्या सगळ्याला कंटाळून मी आदोलनात सहभागी झालो. अकोळच्या तरुण पोरानी १९७२-७३ साली व्यापाऱ्याविरुद्ध लढायचं ठरवलं. सुभाष जोशींचं सहकार्य होतंच—मी पण तेव्हाच चळवळीत सामील झालो. त्या वेळी अकोळमधील बेग, रवी मुतालिक, निरजन कामते ह्या तरुणांनी यशस्वी लढा देऊन काटासूट, कलमसूट, काडीमातीसूट हू वजनात मारायचे रिवाज आमच्या इथ बद पाडले; पण आम्ही हे 'प्रेशर' टिकवू शकलो नाही. आमच्यात दोनतीन वर्षात ढिलाई पडली आणि व्यापाऱ्यांनी हळूहळू पुन्हा रिवाज अमलात आणले !'

'काटासूट, हवासूट वगैरे रिवाज बंद करावेत ह्याव्यतिरिक्त तुमच्या आणखी काही मागण्या तेव्हा होत्या काय ?'

'होत्या की ! आमची मुख्य मागणी होती तंबाखूची खरेदी मणावर न करता किलोवर करावी—त्या वेळी आम्ही गावात सभा घेतली तेव्हा शेतकऱ्यानी मणावर तबाखू द्यायचा नाही असा ठराव एकमुखान समत केला. ठरावावर सगळ्यानी सह्या केल्या; पण प्रत्यक्ष विक्रीच्या वेळस मात्र आमच्यातले बरेचसे शेतकरी फुटू लागले. त्याचं म्हणणं, 'इतकी वर्षे व्यवहार मणावर चाललाय, आता थोडाच त्यात बदल होणार ! कशाला उगाच भाडण काढून देवचंदशेठजीबरोबर वाकडं घ्या ?' आमची चळवळ चालू असताना, मणावर तंबाखू द्यायचा नाही हा ठराव पास झाला असताना रामपूरचा एक व्यापारी यलगोंडा पाटील कलकत्त्याच्या 'बिछायती' साठी अकोळात आला. तो म्हणाला—'मी मणावर खरेदी करणार !' यलगोंडा पाटलाला तंबाखू द्यायला गावातील पाचपंचवीस शेतकरी तयार झाले. ज्या दिवशी 'बिछायत' होणार होती त्या पहाटे आम्ही शंभर-दोनशे माणसं तंबाखू विकायला तयार झालेल्या शेतकऱ्यांकडे गेलो. त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; पण त्याना बहुतेक देवचंदशेठजीच्या माणसांनी फितवलं असावं. ते शेतकरी आमचं म्हणणं ऐकूनच घेईनात! तंबाखू देणारच म्हणून हटून बसले. तिथं बरीच बाचाबाची करून आम्ही शेवटी अकोळच्या वेशीपाशी आलो आणि यलगोंडा पाटलाची 'टूरिंग' अडवली ! त्याला म्हटलं तू मणावर तंबाखू खरेदी करणार असलास तर आमच्या अंगावरून गाडी घालूनच तुला गावात जायला पाहिजे !' तो म्हणाला, 'मणावरच तंबाखू खरेदी करायची असा माझा मुळीच आग्रह नाही. तुमचे शेतकरीच मणावर देतो म्हणाले म्हणून मी बिछायत करायची ठरवलं.' ह्याचा अर्थ इतकाच की, आमची चळवळ मोडण्यासाठी व्यापारी दलालांनीच आमच्यातील शेतकरी फोडण्याचा प्रयत्न केला आणि आमच्यातील काही स्वार्थी शेतकरी त्या प्रयत्नाला बळी पडले !

'हे दलाल विडीकारखानदारांसाठी आमच्याकडून तंबाखू घ्यायचे, वेगवेगळ्या सुटीच्या नावाखाली आम्हाला वजनात कापायचे, दर कमी द्यायचे. तबाखू खरेदीबद्दल आमच्याकडून कोऱ्या कागदावर अंगठा घ्यायचे आणि ज्या विडीकारखानदाराच्या नावानं 'बिछायत' असायची त्याला मात्र वेगळाच चढ दर आणि काटेकोर वजन दाखवून मधल्यामध्ये भरमसाठ फायदा उपटायचे ! आम्हाला सहा रुपये दर दिला असेल तर विडीकारखानदाराला ते दहा रुपये खरेदी दाखवायचे. शिवाय दर पन्नास किलोच्या पोत्यामागं पधरा किलोची 'सूट' !— विडीकारखानदाराला चागला तंबाखू मिळाल्याशी कारण. शेतकऱ्याच्या अडचणीकडे लक्ष देण्याची त्याना जरूर वाटायची नाही. विडीमध्ये त्याना अफाट नफा ! ते शेतकऱ्याकडे कशाला लक्ष देतील ?'

¤

सातप्पा शेटके जे सांगत होते त्यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसत होती की, शेतकऱ्याच्यात तात्पुरती एकी करण सोपं असल तरी ही एकी टिकवून धरण महाकठीण आहे. हितसंबंध गुतलेले शेतकरी ऐनवेळी चळवळीशी बेइमानी करणारच. व्यापारी दलालाचे हस्तक म्हणून सामान्य शेतकऱ्यांच्यात फूट पाडणारच ! निदान आतापर्यंत तरी असं घडत आलय. इथून पुढ शरद जोशींच्या विचाराचा परिणाम म्हणून ह्यात काही लक्षणीय बदल घडून येतोय का ह्याचा शोध घेण महत्त्वाचं. मी सातप्पाना प्रश्न केला—'१९७२-७३ साली तुम्ही पहिली चळवळ केलीत, सभा घेतल्यात, मोर्चे काढलेत, त्या वेळी तुम्ही ज्या पद्धतीनं प्रचार करत होता, भाषण देत होता त्याच्यात आणि आता ह्या आदोलनासाठी तुम्ही स्वतः ज्या शंभर-एक सभा घेतल्यात त्यात फरक आहे का ?'

सातप्पा सांगू लागले, 'खूप मोठा फरक आहे. तेव्हा आम्हाला घोषणा कशा द्यायच्या, मोर्चा काढायचा म्हणजे काय करायचं हे

देखील माहीत नव्हतं. एका डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यानं आम्हाला तेव्हा मार्गदर्शन केलं आणि आम्ही जोरदार घोषणा देऊन जहाल भाषणं करू लागलो. शरद जोशी इथं आल्यापासून त्याची दोन-तीन भाषणं ऐकल्यापासून आमच्या एकूण विचारसणीत, चळवळीच्या धोरणाच्या बाबतीत संपूर्ण फरक पडला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरद जोशीचा शांतपणा. सभेमध्ये ज्या शांतपणे ते एकएक मुद्दा खुलासेवार समजावून सांगतात त्यानं शेतकरी भारावून जातो. शेतकऱ्याला हा अनुभव एकदम नवीन ! इतकी वर्षं त्याला पुढाऱ्यांची राणा भीमदेवछाप भाषणं ऐकण्याची सवय—शरद जोशीची पद्धत एकदम वेगळी !

'नासिकच्या शेतकरी आंदोलनावर तुम्ही 'माणूस' मधून जे लिहिलंत त्यांची आम्ही पारायणं केली होती. सुभाष जोशी आम्हाला नेहमी म्हणायचे की कसंही करून शरद जोशींना इथं आणलच पाहिजे तरच तंबाखू शेतकऱ्याला काही तरी मार्ग सापडेल. आमच्या सुदैवानं शरद जोशी इथं आले. सुभाष जोशीच्या घरी आमची त्यांची गाठ पडली. त्यांच्याबरोबर सविस्तर चर्चा करण्याची संधी आम्हाला मिळाली आणि त्यातून ह्या आंदोलनाची दिशा निश्चित झाली. निपाणीमधील व्यापारी दलालांचं राज्य ह्या वर्षी नाही तरी पुढील वर्षात निश्चित संपणार ! ह्या भागात शेतकरी, शेतमजूर आणि तंबाखू विडी-कामगार ह्यांचं राज्य सुरू होणार हे निश्चित ! दिल्ली सरकारच्या मनात काही असो—हे घडणारच !—आमच्यातील एकी मात्र टिकली पाहिजे !'

'आज बारा दिवस तुम्ही रस्त्यावर बसून आहात तरी दिल्ली सरकार तोंड उघडायला तयार नाही, ह्या आंदोलनातून काय निष्पन्न होईल असं तुम्हाला वाटतं ?'

'अहो, सरकारच्या एसट्या बंद आहेत. इतर वाहतूक खोळंबली आहे. बेंगलूरला लांबून जावं लागतं. ह्या बारा दिवसांत सरकारचे कोटयवधी रुपये बुडाले असणार. त्याऐवजी शेतकऱ्यांच्या तंबाखूला भाव दिला असता तर सरकारचं काहीच नुकसान झालं नसतं. शेतकऱ्याचा थोडा फायदा झाला असता आणि त्यानं सरकारला दुवा दिला असता; पण सरकारनं सध्या तरी आडमुठी भूमिका घेतल्यासारखं दिसतंय. बघू किती दिवस सरकार गप्प बसतंय— आम्ही काय आता मागं हटणार नाही बघा ! आमची सगळी मागणी पंधरा-वीस कोटी रुपयांची आहे. दिल्लीला बाईंनी किसानमेळावा भरवून पंचेचाळीस मिनिटांचं भाषण ऐकवलं त्याला शंभर-दोनशे कोटी रुपये खर्च आला म्हणतात ! मग आमचं खरोखर कल्याण करायचं असेल तर वीस कोटी रुपये खर्च करणं सरकारला अवघड नाही ! आमचा तंबाखू विडीकारखानदारांना विकून सरकारला त्याचे पैसे लगेच परत मिळतील. आम्हाला हे पैसे दिले तर सहकारी सोसायटी काढून आम्ही सगळा तंबाखू खरेदी करू आणि ह्या दलालांना निपाणीतून हाकलून लावू !'

सातप्पा शेटके तळमळीनं बोलत होते. तंबाखूचा निर्णय लागेपर्यंत शेतकरी रस्त्यावरून हलणार नाही अशी चिन्हं सुस्पष्ट दिसत होती. आतापर्यंत बारा दिवस हे आंदोलन अतिशय शांतपणे चाललंय. इथून पुढंही ते शांततामय मार्गानंच चालावं असा नेत्यांचा प्रयत्न असणार; पण सरकारनं मात्र शेतकऱ्याचा फार अंत पहाणं योग्य होणार नाही. निरपराध माणसाचं रक्त सांडल्याखेरीज सरकार जागं होत नाही असा आतापर्यंतचा अनुभव. ह्या आंदोलनातही तसाच काही प्रकार घडला तर ती गोष्ट सरकारला लांच्छनास्पद ठरेल !

शरद जोशींचा आदेश मिळेपर्यंत आता एकही शेतकरी रस्त्यावरून उठणार नव्हता. अनेक जण घराला कुलुपं लावूनच बाहेर पडले होते. सातप्पा शेटकेंच्या घरी दुभती गाय; पण घरची सगळी माणसं आंदोलनात ! दूध काढायला घरी कुणी नाही. सातप्पाचं म्हणणं, 'गाय आटली तर आटली; पण आता इथून हालायचं नाही !' सातप्पाप्रमाणेच हजारो शेतकरी दृढनिश्चयानं रस्त्यावर बसून राहिलेले.

निपाणी परिसरातील शेतकऱ्यांनी शरद जोशींच्या आदेशाबरहुकूम आपलं सर्वस्व इथं रस्त्यावर आणून मांडलं होतं. शरद जोशींनी मागितलं त्याच्या किती तरी पटींनी शेतकऱ्यांनी दिलं. 'तुम्ही तीस हजार सत्याग्रही द्या, तंबाखूला भाव मिळवून देण्याची जबाबदारी माझी !' असं जाहीर आश्वासन शरद जोशींनी दिलं होतं; पण शरद जोशी कसा काय भाव मिळवून देणार ? चळवळ यशस्वी झाली तरच भाव मिळणार ! आणि तंबाखूचा लढा तर अत्यंत कठीण ! नासिकचा शेतकरी ह्या बारा दिवसांत निपाणीच्या शेतकऱ्याच्या पाठीमागं उभा राहिला असता तर ?

एकसंख्याचा एक तरुण तंबाखू शेतकरी काहीशा उद्वेगानं म्हणाला होता, 'तुम्ही एक माणूस उभा करा मी पाच उभी करतो' असं शेतकरी संघटनेच्या नेत्यानं अनेक वेळा सांगितलं; पण ऊस पिकविणारी नासिककर मंडळी, उसाला भाव मिळाल्यानंतर सोसायटीची कर्जं फेडण्यात, बायकांना नवीन लुगडी घेण्यात आणि उरलेल्या नोटा मोजण्यातच गर्क झालेली दिसताहेत ! पहिला विजय मिळताच नासिककर आत्मरत झाले, 'शेतकरी तितका एक एक' ह्या घोषवाक्याचा त्यांना विसर पडला.

एकसंख्याच्या तरुण शेतकऱ्याच्या मनातील हा उद्वेग कुठल्याही समर्थनानं कमी होण्यासारखा नव्हता. तो त्याच्या दृष्टीनं एक सत्य मांडत होता. मी मनात म्हणत होतो—' नासिककरांवर फार टीका करणं योग्य होईल का ? त्यांचं पिढयान्‌पिढयांचं दारिद्र्य आणि कर्ज एका फटक्यात संपल्यासारखं त्यांना वाटत असल्यामुळं काही काळ त्यांनी आत्मरत राहून आनंदोत्सव साजरा केला तर चुकलं कुठं ? हा ऊसकरी शेतकरी शेतकऱ्याचं इमान विसरणार नाही. आज ना उद्या तो सर्व शेतकऱ्यांच्या आंदोलनापाठी उभा राहील. सर्व शेतकरी एकमेकांच्या पाठी उभे रहातील. शरद जोशींचा विचार खरोखरीच जर शेतकऱ्याच्या अंतःकरणापर्यंत भिडला असेल तर हे असंच घडलं पाहिजे; पण हे असं घडणार का ?

सातप्पा शेटके सांगत होते— 'ह्या तंबाखू आंदोलनाचं एक

**गाय आटली तर आटली, आता इथून हालायचं नाही....**

वैशिष्टय ध्यानात घेण्यासारखं आहे. जे शेतकरी आतापर्यंत व्यापाऱ्यांच्या बाजूचे होते तेदेखील ह्या आंदोलनात वाजत-गाजत सहभागी झाले. काही जण नुसते वाजत-गाजतच नाही तर मिरवणुकीपुढे हत्ती झुलवत आले ! शेतकरी आंदोलनात हत्तीनं मिरवणूक काढून सहभागी झाल्याचं हे पहिलंच उदाहरण असावं. ही माणसं पहिल्या दिवशी आली नाहीत; पण दोन दिवस ह्या रस्त्यावरचं दृश्य बघितल्यावर त्याची त्यांनाच लाज वाटली असणार. आजपर्यंत कधीही आमच्यात सामील न झालेले हे शेतकरी अखेर हत्ती घेऊन मिरवणूक काढून आले एवढंच नाही तर रस्त्यावर आमच्या शेजारी माडीला माडी लावून बसले !

'अनेक बारीक सारीक व्यापारी आणि दलाल आता आम्हाला येऊन सांगायला लागलेत, 'तुम्ही करताय ते बरोबर आहे. आमचादेखील तुम्हाला पाठिंबाच आहे !' अर्थात आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही कारण हे नुसतंच तोंडदेखलं गोड बोलणारे लोक आहेत ह्याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे.

'ह्यापूर्वी आमचा तंबाखूचा लढा यशस्वी होत नव्हता ह्याचं मुख्य कारण म्हणजे आम्ही फक्त आमच्याजवळच्या दोन-तीन गावांचाच विचार करत होतो. त्यापलीकडे बघण्याची दृष्टीच आमच्याकडे नव्हती. आम्ही जेव्हा १९७३ साली रस्ता अडवला तेव्हा फक्त अकोळच्या परिसरातच सभा घेतल्या होत्या. अकोळच्या पलीकडे ही व्यथा पोहचली पाहिजे हे आम्हाला माहीत होतं; पण कशी पोहचवायची ते कळत नव्हतं.'

विषय बदलण्याच्या हेतूनं मी सातप्पांना विचारलं, 'तुम्ही गेले बारा दिवस इथं उन्हात रस्त्यावर बसले असताना देवचंदशेठजीनं निपाणीत रहाणं जरुरीचं होतं असं तुम्हाला वाटत नाही ? कारण समजा तडजोड करण्याची वेळ आली तर वाटाघाटीसाठी शेठजी असणं महत्त्वाचं नाही का ? तशात तुमच्या अकोळचे ते सुपुत्र !'

काहीसं खिन्नपणे हसत सातप्पा म्हणाले, 'अहो, देवचंदशेठजी आमच्या अकोळचे सुपुत्र जरी असले तरी ह्या अशा आंदोलनाच्या वेळी ते निपाणीत कसे काय रहातील ? इथं रस्त्यावर शेतकऱ्यांचा महासागर लोटलाय. शेठजीचं धाबं दणाणलं असणार ! ते गेले मुंबईला पळून ! अहो, ह्यांचा आजा किंवा पणजा लोटा घेऊन इथं आला आणि नुसती दलाली करून त्यांनी अब्जावधी रुपये कमावले ! शेतकऱ्यांना हे आता पक्कं उमजलंय. पूर्वी शेठजी गावात आले की त्यांचे पाय धुऊन, वाजतगाजत मिरवणुकीनं त्यांना वेशीपासून गावात आणलं जायचं. घरोघरी त्यांच्या फोटोची पूजा केली जायची. आता सगळ्या शेतकऱ्यांनी देव्हाऱ्यात ठेवलेला शेठजीचा फोटो काढून फेकून दिलाय !'

सातप्पा हे सांगत असतानाच सुभाष जोशी, महंमद नाईक, बेग, जक्काप्पा, रवी मुतालिक वगैरे मंडळी आमच्या बाजूला जमली. कुणी तरी सांगू लागलं--

'आता शेठजीचं साम्राज्य खलास होत आलंय. लवकरच ते धुळीला मिळेल अशी आमची अपेक्षा आहे. पूर्वी मात्र ह्या परिसरात शेठजीचा दरारा फार मोठा ! प्रत्येक घरामध्ये, दुकानामध्ये शेठजीचा फोटो असायचा एखाद्या शहनुरुहाप्रमाणे ! लोक रोज सकाळी उठल्यानंतर देवाला नमस्कार करून शेठजीच्या फोटोला गंध, उदबत्ती, फुलं वाहून पाया पडायचे. अनेकांच्या तर देव्हाऱ्यातच शेठजीचा फोटो असायचा ! ह्या भागातील चिल्लर व्यापारी आणि दलाल तर रोज शेठजीच्या फोटोला हार घालून उदबत्ती दाखवून मगच पेढीवर बसायचे, इतका दरारा ! आता हे सगळं संपत आलंय. अकोळ शेठजीची जन्मभूमी. तिकडच्या शेतकऱ्यानीच त्यांना पहिला हिसका दाखवला आणि त्यांच्या कर्मभूमीत, निपाणीत, सुभाष जोशीनं दुसरा जबरदस्त तडाखा दिला ! आता शरद जोशींच्या आंदोलनानं ते संपूर्ण नेस्तनाबूद होणार ! आज हजारो घरांतून त्यांचे फोटो फेकून देण्यात आलेत !

'देवचंदशेठच्या विरुद्ध पूर्वी कुणी ब्र जरी काढला तरी तो आयुष्यातून उठत होता; पण सुभाष जोशीनं त्यांच्याबरोबर टक्कर देऊन दाखवली आणि मग लोक विचार करू लागले.

'आता आमचं एकच म्हणणं आहे की, देवचंदशेठला अतिशय दीर्घ आयुष्य लाभावं. जितकी वर्षं त्यांनी लोकांचं रक्त पिळून घेतलं तितकीच वर्षं ते आणखी जगोत आणि सतत आपल्या बेअब्रूचा अनुभव घेवोत !'

मी थक्क होऊन हे ऐकत होतो. तंबाखू शेतकऱ्यांचं देवचंदशेठजीवर असलेले हे जबरदस्त 'प्रेम' पाहून माझी मती कुंठित झाली होती. हा माणूस खरंच ग्रेट असला पाहिजे !

रवी मुतालिकला शेठजीच्या विषयात विशेष रस नसावा. काहीशा कडवट चेहऱ्यानं तो म्हणत होता-- 'शेठजीचं सोडा हो, ते आता आपल्या करणीनं भोगायचं ते भोगणारच आहेत. आपल्याला त्यांच्याशी काय करायचं आहे ? शेठजीना शिव्या घालत बसण्यापेक्षा आपण जरा आपल्या आजुबाजूच्या शेतकऱ्यांच्याकडेच पाहिलं पाहिजे. वास्तविक आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी तीस हजारापेक्षा खूप जास्त लोक येणं आवश्यक होतं; पण आंदोलन म्हणजे लाठीमार, दंगा, अटक ह्या भीतीनं अनेकजण आले नाहीत. लांबूनच अंदाज घेत राहिले. दोन दिवस सगळं व्यवस्थित चाललय असं पाहून मग हे कातडीबचावू लोक स्वतःची अब्रू राखण्यासाठी रस्त्यावर आले. हे सगळेच खरे आंदोलक आहेत असं समजणं चूक ठरेल. गावात बसून राहिलं तर अब्रू जाते म्हणून ही मंडळी आंदोलनात आली आहेत !'

रवी मुतालिकच्या म्हणण्याला दुजोरा देत सातप्पा म्हणाले, 'अहो, नुसती अब्रूच नव्हे तर पुढच्या वर्षी त्यांना तंबाखू पिकविण्याचीदेखील अडचण होणार ह्याची खात्री असल्यामुळं ते आले आहेत. नंतर आलेली ही सगळीच मंडळी मतलबी आहेत. हीच माणसं उद्या आंदोलनात फूट पाडणार ! बहुतेक शेतकरी तंबाखूची शेती चौथाईनं करतात; आम्ही गावोगाव सभांमधून सांगितलंय की जे शेतकरी आंदोलनात सहभागी होणार नाहीत त्यांचा तंबाखू कुणीही चौथाईनं करायचा नाही. त्यांची जमीन ओस पाडायची, म्हणून हे लोक आंदोलनात उतरलेत. अकोळमध्ये आमची पाचशे शेतमजुरांची संघटना आहे, त्यापैकी एकाकडेही गुंठाभरदेखील जमीन नाही. हे सगळे शेतमजूर रोजची पाच रुपयांची मजुरी बुडवून इथं रस्त्यावर येऊन स्वतःची भाकरी खात सत्याग्रहाला बसलेत. मोठा शेतकरी त्या लाजेनं आणि भीतीनं आता उशीरा का होईना आंदोल-

नोत सहभागी झाला आहे.

'तंबाखूला भाव मिळो न मिळो, शेतकरी संघटित झाला, त्याची आंदोलनाबद्दलची भीती नाहीशी झाली, व्यापाऱ्यांचं दडपण त्यानं झुगारून टाकालं हा फार मोठा फायदा झाला.

'त्यामुळं लवकरच एक वेळ अशी येणार की, शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळणारच.काल इकडचे एक मोठे तंबाखू व्यापारी वसंतराव कावळे म्हणत होते 'आम्ही भाव देण्यास तयार आहोत!' —पण ते देखील चोर हे आम्हाला पुरेपूर माहीत आहे. १९७३ च्या आंदोलनानंतर निपाणीतील बडे व्यापारी जेव्हा आमचा तंबाखू घेईनात तेव्हा आम्ही सहकारी संघ काढायचं ठरवलं. संघामार्फत खरेदी केली. अकोळच्या शेतकऱ्याची तीन लाख रुपयाची 'सूट' वाचली आणि भाव पण चागला मिळाला. आम्हाला वाटलं, अकोळचे शेतकरी आता कमीत कमी एक लाख रुपयाचे शेअर्स घेऊन सहकारी संघाला भांडवल पुरवतील; पण आमचे शेतकरी हरामखोर आणि बनावट निघाले. ज्याचे पाच हजार रुपये वाचले त्यानं फक्त शंभर रुपयांचा शेअर घेतला. आजुबाजूच्या पाच गावांतून दोन-तीन हजार रुपयांचे शेअर्स घेणारे शेतकरी आम्हाला भेटले; पण अकोळच्या शेतकऱ्यानं मात्र दगा दिला! आमच्या भागातील मोठा शेतकरी दलालांइतकाच चोर आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीशी त्याला काहीही देणंघेणं असत नाही. एक वेळ सामान्य शेतकरी आणि शेतमजूर चळवळीशी एकनिष्ठ रहातील; पण मोठा शेतकरी पैसा मिळाला की लगेच रंग बदलणार! ह्या आंदोलनातदेखील शेवटपर्यंत टिकून रहाणार सामान्य शेतकरीच. मोठा शेतकरी सोय दिसताच पळ काढणार!

सातप्पा शेटकेंचं मोठा शेतकरी, सामान्य शेतकरी, शेतमजूर हे 'वर्गी'करण शेतकरी संघटनेच्या विचाराशी काही प्रमाणात विसंगत वाटत असलं तरी त्यात फार मोठं तथ्य आहे हे मान्य करायलाच पाहिजे! सातप्पा शेटके पुढे सांगत होते—

आता वसतराव कावळे चागला दर देतात असा उगाचच सर्वांचा गैरसमज आहे. इतरांच्यापेक्षा कावळे आठ आणे, रुपया कमी देतात! पण पैसे मात्र व्यवस्थित आणि वेळेवर देतात हा त्याच्यात आणि इतराच्यात मोठा फरक आहे. कावळे आणि देवचंद शेठमध्ये बाहेर तरी कट्टर वैर असल्यासारखं दिसतं; पण आम्हाला लुटायला मात्र दोघेही सारखेच! मागं एकदा तंबाखूचा भाव अचानक घसरला तेव्हा आम्ही अकोळमध्ये बोर्ड लावला 'दहा रुपये भाव मिळालाच पाहिजे!' त्या वेळी आमच्या गावातील मगदूम नावाच्या व्यापाऱ्यानं सात-आठ रुपयांनी काही शेतकऱ्याच्या तंबाखूची खरेदी केली. तेव्हा पाच-सहाशे शेतकऱ्यानी एकत्र येऊन कमी दरात तंबाखू देणाऱ्या शेतकऱ्याना जरा दाटलं. व्यापाऱ्यांनी ह्या संधीचा फायदा घेऊन प्रचंड बोंबाबोंब केली—'अकोळच्या शेतकऱ्यानी दमदाटी केली, दगडफेक केली. वास्तविक आम्ही चागल्या दरानं तंबाखू घेणार होतो; पण आता असली दमदाटी आम्ही सहन करणार नाही!' वगैरे वगैरे काय वाटेल ते रान उठवलं. बाकीच्या गावात ह्या अफवा वणव्यासारख्या पसरल्या. व्यापारी दर द्यायला तयार असताना अकोळच्या शेतकऱ्यांनी दंगा केल्यामुळे आता सर्वच शेतकऱ्याना नुकसान सहन करावं लागणार अशी हवा सगळीकडे पसरविण्यात आली. ह्या प्रकरणात कावळेंनी फार मोठा उदारपणाचा आव आणून सहा रुपये दरानं तंबाखू घेतला आणि उरलेला तंबाखू देवचंदशेठनं आरामात चार रुपयानं खरेदी केला. तंबाखूच्या व्यवहारात ह्या असल्या सगळ्या भानगडी आहेत.

'आमच्या भागातील शेतकरी जरा विचित्र आणि फार स्वार्थी. ह्या खेपेला देखील अनेकजण म्हणत होते, आदोलन करू नका, उगाचच दर पडतील; पण आता आंदोलन बघितल्यावर त्यांचे डोळे उघडलेत आणि वाजतगाजत ते रस्त्यावर येऊन बसायला लागलेत.

(क्रमशः)

---

श्यामचा संसार (कथा पंधरावी)

फिरोज रानडे

# टी. व्ही. आणि राधा

'राधावहिनी, तुम्ही अगदी काहीही विचार न करता ECG चा टी. व्ही. घेऊन टाका बघू'! अेका संध्याकाळी शेजारचे कर्वे शामच्या घरी चहा घेता घता कोणता टी. व्ही. घ्यावा हा विषय चर्चेला निघाला असता राधाला ठामपणे म्हणते झाले.

कर्वे ह्यांनी हे वाक्य ठामपणे राधाला म्हणण्याचं कारण स्पष्ट होतं. अेक तर कर्वे हे मराठी होते. मराठी बाणा हा नेहमी कोणतीही गोष्ट ठामपणे सांगणं हा असतो. मग तो विषय वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय कोणताही असो. त्यातून कर्वे हे वृत्तपत्रकार होते. मराठी वृत्तपत्रकाराच्या ठामपणाला काय बाध? अगदी यशवंतरावांच्या 'मोरू परतुनी आला' ह्या घरगुती विषयापासून तो शेजारच्या अफगाणिस्तानातून रशियन लोकांनी निघून जावं ह्या विषयापर्यंत आपली मतं हे ठामपणे माडत असत.

आता यशवतरावाना आतापर्यंत विशेष 'विधायक' काम नसल्यामुळं कर्व्यांची ठाम मतं त्यानी कदाचित वाचली असतील, कदाचित नसतील; पण बहुधा असतीलच. कारण यशवंतरावानी आतापर्यंत कोणतीही गोष्ट ठामपणे केली नाही त्यारून वाचली नसतील असंच वाटतं.

पण ब्रेझनेव वगैरे रशियन पुढाऱ्यांनी कर्वे ह्यांची ठाम मतं नक्कीच वाचली नसणार! कारण बोलून-चालून ब्रेझनेव वगैरे लोक अ मराठी. त्याना कर्वे ह्याची ठाम मतं वाचण्याची सधी कोठून मिळणार? नाहीपेक्षा त्यांनी अफगाणिस्तानातून आपले पाऊल लगेच काढून घेतलं नसतं का?

रशियन लोकांना मराठी येत नसल्यामुळं अफगाणी लोकाचं व पर्यायानं जगाचं केव्हढं मोठं नुकसान झालं आहे बघा ! असो. विषय राधा-श्यामने टी. व्ही. कोणता घ्यावा हा होता–

आता हे राधाला सांगावयाचं कारण स्पष्ट होतं. कारण श्याम कुटुंबप्रमुख, मिळवता पुरुष वगैरे वगैरे असला तरी घरात कोणतीही गोष्ट यावयाची असली की राधा कुटुंबप्रमुख होत असे व श्याम आपला इत्यादी इत्यादी होत असे. कर्वेच असं वागत असत असे नव्हे–दुकानात खरेदीला जावं तेथेही दुकानदार सगळं राधालाच उद्देशून बोलत असत. श्यामला लोकांच्या ह्या वृत्तीचा फार राग येत असे; पण नवरे जातीच्या रागाची कोण पर्वा करतं ?

तेव्हा प्रथम आलेल्या गुरुवारी श्याम आणि राधानं कर्वे ह्यांचेकडे 'छायागीत' हा कार्यक्रम पहावा व तडक ECG च्या टी. व्ही. ची ऑर्डर द्यावी असं ठरलं. श्यामला कर्वे यांचेकडे जाण्यात खूपच रस होता. कारण बाकी सर्व लोक टी. व्ही. बघत असता त्याला कर्वेबाईंकडे मोकळेपणे बघता आलं असतं.

ठरल्याप्रमाणं त्या गुरुवारी राधा व श्याम कर्वे ह्यांच्याकडे गेले. T. V. लावला गेला. हिंदी बातम्या नुकत्याच संपल्या होत्या व २०–२५ जाहिरातीची माळ सुरू झाली होती. कर्वे ह्यांच्या T. V. मधून बाकी आवाजाबरोबर घरघर आवाज संथपणे पण सातत्यानं येत होता. ही कसली घरघर ? म्हणून चौकशी करता कर्वे सांगते झाले की, 'अहो, जाहिरातीच्या वेळी नेहमी अशी घरघर होते बघा !

नेहमीच्या वेळी 'छायागीत' सुरू झालं व नेहमीप्रमाणे त्यात रटाळ गाणी सुरू झाली; पण लता मंगेशकरचं गाणं असो वा महंमद रफीचं असो कर्वे यांच्या T. V. ला आपली घरघर लागलेली ! राधानं कर्वेबाईंकडे चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आणून पाहिलं. त्यावर कर्वे म्हणाल्या, 'अहो छायागीताला नेमकं असं होतं बघा !'

'मग अशा T. V. चा काय उपयोग ?' राधा अत्यंत कडकपणे म्हणाली, 'हा काय फक्त 'आमची माती, आमचे दगड' ह्या कार्यक्रमाला वा फिल्म–डिव्हिजनच्या डॉक्युमेन्टरीलाच फक्त चांगला चालतो की काय ?'

श्यामला राधाच्या कडवट व स्पष्ट बोलण्याचा खूप राग आला; पण आजकाल चार लोकात बायकोवर राग काढण्याची पद्धत नसल्यामुळं तो चूप बसला.

थोड्या वेळानं राधा व श्याम उठले. कर्वे व कर्वेबाई त्यांना दारापर्यंत पोहोचवायला आले होते. ते दोघे हा T. V. नेहमी किती छान चालतो, आजच नेमकं मेल्याला काय झालं आहे कळत नाही वगैरे म्हणत होते. राधा एकदम घुम्मासारखी चुप झाल्यामुळं वातावरण अगदी तंग झालं होत. ते थोडं अतंग करण्याच्या दृष्टीनं श्याम म्हणाला, 'हे T. V. वगैरे आपल्या मुलासारखे असतात बघा. मुलं नाही का नेहमी छान छान नकला करत वा मुली अगदी डिट्टो लता मंगेशकरसारखी गाणी म्हणत ? पण कोणा पाहुण्यासमोर त्याना सांगा नकला करायला वा गाणं म्हणायला–लगेच त्यांचा मुड जातो !'

श्यामचाच विनोद असल्यामुळं तो खूप जोरात हसला. कर्वे–कुटुंब त्यांच्या T. V. ची भलावण होत होती म्हणून थोडं कमी जोरात हसले; पण राधा जाम हसली नाही. मॅनर्संकरतासुद्धा हसायचं नाही हे फक्त बायकांनाच जमतं !

कर्वे दार बंद करतात न करतात तोच राधा म्हणाली, 'काय भिक्कार T. V. आहे ह्यांचा. काही झालं तरी आपण असला ECG चा T. V. घ्यायचा नाही !'

'अग, पण त्यांचे दार लावणं तर होऊ दे. त्यांना ऐकू जाईल.'

'ऐकल तर ऐकलं. मी काही खोटं बोलते आहे का ? सारखा घरघर करत होता पण बया म्हणते कशी की, 'छायागीत' ह्या कार्यक्रमालाच फक्त घरघर करतो म्हणून ! खोटरडी मेली!'

'अग, पण हे सगळे बोलायला का पाहिजे. आपण तसला T. V. घेतला नाही की, संपलं!'

'तुमच्या दृष्टीनं संपलं असेल पण माझ्या नाही. फक्त T. V. च्या बाबतीतच नाही, ह्या कर्वेबाईचं सगळ्या बाबतीत असं असतं. त्याचा फ्रिज चांगला चालत नही. व प्रेशर कुकर चांगला चालत नाही. पण सगळ्यांना त्याच कंपनीचा घ्या म्हणून सांगते. तुमच्याकडे बघून त्यांना वाटेल हे भोळसर काम आहे. आपलं म्हणणं खपून जाईल. बघा ना कशी गुलुगुलु बोलत होती– हसत होती तुमच्याकडे बघून !'

श्यामनं मनातल्या मनात कपाळाला हात लावला. त्याला वाटावयाचं की आपण थोडं थोडं पुलंसारखं विनोदी बोलतो, कर्व्यांपेक्षा थोडे जास्त स्मार्ट आहोत म्हणून कर्वेबाई आपल्याशी अेवढे गुलुगुलु बोलतात, बघून गोडसर हसतात वगैरे. आपण भोळभर दिसतो म्हणून हे सगळं होत असतं हे राधाचं निष्कर्षमय वाक्य ऐकून त्याला खूप नर्व्हस व्हायला झालं.

असेच काही दिवस गेले. अजुनी श्यामराधाचा T. V. घेण्याचा प्रश्न सुटला नव्हता. त्याच्याबद्दल खूप खल चालू होता. श्यामच्या मोठ्या भावाकडे असाच कोणत्या तरी कंपनीचा T. V. होता श्यामचा भाऊ तो टी. व्ही. अगदी अे वन्न आहे असे म्हणावयाचा. तसला टी. व्ही. घ्यावा असा विषय निघताच राधानं अगदी ठामपणे, 'काही झालं तरी भाऊजीसारखा टी व्ही घ्यावयाचा नाही!' असा आपला पण जाहीर केला. श्यामला ह्या पणामागची मनोवृत्ती कळेना. तो म्हणाला, 'सासरचे सगळं वाईट असते कबूल. हा टीव्ही त्याचे भावाकडे आहे कबूल पण तो काही त्यानं स्वतः बनवला नाही आहे. तो बरा चांगला चालत असला तर घ्यायला काय हरकत आहे ?'

'घ्यायला हरकत ? माझी तर त्या टीव्हीबद्दल विचार करायला सुद्धा हरकत आहे. तुमच्या सासरच्या माणसासारखं माझ्या घरात काहीही नको ! मोठ्या वहिनी सगळ्याना सांगत फिरतील आपण त्यांची सगळ्या गोष्टीत बरोबरी करत असतो म्हणून व आपल्यावर कडी करण्याकरता राधानं आपल्यासारखा टीव्ही घेतला आहे म्हणून!'

आता त्या टीव्ही कंपनीनं फक्त एकच टीव्ही श्यामच्या भावाकरता म्हणून का तयार केला होता ? हजारो टीव्ही एकासारखे असणार त्यात कोणावर कडी वा कोयंडा करण्याचा प्रश्न कुठे आला हे श्यामला कळत नसे; पण श्यामला कळलं न कळलं तरी त्याचा राधावर काही परिणाम झाला नाही. तात्पर्य. श्यामच्या भावासारखा T. V

घेणं बाद झालं.

त्याच काळात कर्मधर्मसंयोगानं राधाचा पुण्याचा भाऊ काही कामाकरता मुंबईला आला होता. राह्यला अर्थातच श्यामकडे. एक दिवस श्याम घरी येऊन पहातो तो प्रकाश-मामा आपला चहा पीत बसला होता. त्याचे पोहे वगैरे खाऊन झाल्याचं दिसत होतं. भाऊ-राया आल्यामुळं राधा अर्थातच खूष होती त्यामुळं श्यामला पण चहा-पोहे मिळाले, बोलता बोलता प्रकाशमामा म्हणाला, 'काय भाई, टीव्ही घेताय म्हणे ?' टीव्ही घेण्याच्या विषयावर त्या बहीण-भावांचं खूप बोलणं झाल्यासारखं दिसत होतं.

: हो, राधा हट्ट धरून बसलीय, म्हटल घेऊन टाकू या टीव्ही!' श्याम मोठ्या कौतुकानं म्हणाला. माहेरच्या माणसासमोर नवरा कौतुकानं बोलला म्हणजे जो एक तन्हेचा आनंद बायकाना होतो तसा राधाला झाला व ती आणखी खूष झाली.

'मी सांगतो भाई, तुम्ही अगदी डोळे मिटून ECG चा टीव्ही घ्या.' प्रकाशमामा ECG च्या टीव्हीची भलावण करत म्हणाला. कारण स्पष्ट होते त्याचेकडे ECG चा टीव्ही होता.

'डोळे मिटून घेईन हो पण बघताना तर डोळे उघडे ठेवायला लागतील ना ?' श्याम जुजबी विनोद करता झाला. स्वत चा विनोद म्हणून श्याम व मेव्हण्याचा आहे म्हणून मामा दोघे वाजवीपेक्षा जोरात हसले; पण राधा आपली गंभीर !

'पण ECG चा टीव्ही म्हणजे कर्व्यां-सारखा ना ? नको ग बाई, सगळ्या चांगल्या कार्यक्रमाच्या वेळी तो आपला घरघर करत असतो तुमचा कसा चालतो रे टीव्ही ?' राधा.

'फर्स्ट क्लास !' भाऊराया म्हणाले.

मग राधानं कर्व्यांचा टी. व्ही. ECG चा असूनही कसा चांगला चालत नाही ह्याची लांबण लावली ते सर्व ऐकून प्रकाशमामा अंतर्मुख झाला होता. खरं म्हणजे कर्व्यांच्या टीव्हीतले दोष त्याच्याही टीव्हीत होते. त्याचाही टीव्ही सारखा घरघर करत असे; पण आपल्याच टीव्हीची आपणच नालस्ती चार लोकात कशी करणार ? टीव्ही हा नवऱ्यांना आपल्या बायकोसमान व बायकांना आपल्या नवऱ्यासमान वाटतो. सगळे नवरे सगळ्या चागल्या कार्यक्रमाचे वेळी घरघर करत असतात व बायका 'व्यत्यय'चा बोर्ड न लावताही सारखा व्यत्यय आणत असतात; पण कोणालाही आपल्या नवऱ्याबद्दल वा बायकोबद्दल विचारा सगळ्याचे एकमत 'फर्स्ट क्लास !'

आता प्रकाशमामाला आपला ECG चा टीव्ही असूनही छानपणे चालतो ह्याची सयुक्तिक कारणं देण्याची जरुरी भासू लागली. 'त्याचं काय आहे राधा, टीव्ही एकाच कंपनीचे असले तरी वेगळ्या वेगळ्या गावी असल्यामुळं त्याच्या Performance वर परिणाम होत असतो. पुण्याचं हवामान वेगळं, समुद्रसपाटीपासूनची उंची वेगळी, तापमान वेगळं व मुंबईचं वेगळं म्हणून कर्व्यांचा व आमचा एकाच कपनीचा टीव्ही असून आमचा पुण्याला छान चालतो !'

'आणि टीव्ही बघणारे ? पुण्याचे लोक वेगळे, मुंबईचे वेगळे ! त्याचाही टीव्हीवर परिणाम होत असेलच की !' श्यामनं जुजबी विनोदाच्या नावाखाली पुण्याच्या लोकाना चिमटा काढला. श्याम हसला. प्रकाशमामा बिलकूल हसला नाही. राधा तर मोठ्या फणकाऱ्यानं म्हणाली, 'राहू दे तुमचं, सारखं पुणं सलत असतं पुण्याबाहेरच्या लोकाना !'

पण असं पुण्याच्या लोकांना नावं ठवून हा प्रश्न सुटणार नव्हता. लवकरात लवकर टीव्ही घेणं आवश्यक झालं होतं. पूर्वी फक्त एकदोघाकडेच टीव्ही होते तोपर्यंत त्याचेकडे टीव्ही पहायला जायची लाज वाटत नसे; पण आता बहुसंख्य लोकाकडे टीव्ही झाल्या-पासून त्याचीही लाज वाटू लागली होती. आता फक्त गडी-माणसं व स्वैपाकिणी व मोलकरणीच फक्त अशा लोकाकडे टीव्हीवर सिनेमा व छायागीत पहातात.

पण त्याच्यापेक्षाही जास्त निकड सामा-जिक स्तरावरची होती. राधाला टीव्ही असण्याचे सामाजिक फायदे-तोटे कळू लागले होते. रविवारच्या सिनेमाबद्दल वा गजरा वा प्रतिमा व प्रतिभा वगैरे कार्य-क्रमाबद्दल बोलताना टीव्हीवाल्या बायका राधाला त्या चर्चेतून वगळू लागल्या होत्या. म्हणजे टीव्ही असणाऱ्या सगळ्या बायका प्रतिभा व प्रतिभा हा कार्यक्रम पहात असतच असं नाही; पण स्वतःचा टीव्ही असल्यामुळं त्यांना कोणत्याही कार्यक्रमाबद्दल बोलण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. अशा बोलण्या-तून राधा व नॉन्-टीव्ही जातीचे लोक वग-ळले जात असत.

हिंदुस्थानात जाती किती फालतू गोष्टीवर व किती थोड्या काळात पडतात नाही ? राधाच्या सोसायटीत अशाच टीव्हीवाले व बिगरटीव्हीवाले अशा दोन जाती पडल्या व दोन्ही जाती स्वत.ला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजत. टीव्हीवाले स्वत.ला श्रेष्ठ समजत त्याचं कारण स्पष्ट आहे. बिगरटीव्हीवाले म्हणत की आम्ही करमणूकीकरता, मनो-रंजनाकरता टीव्ही नाही पहात बसत. आम्ही चांगल्या चागल्या लेखकांची पुस्तक वाचतो म्हणून आम्ही श्रेष्ठ !

पण शेवटी होणारं ते घडलं व श्याम राधान कोणत्या तरी कंपनीचा टीव्ही आणला. तो काही दिवस चालला, मग नादुरुस्त झाला. परत चालला, परत बिघडला वगैरे नेहमी-प्रमाणे होऊन आता तो टीव्ही आपल्या मर्जी-प्रमाणे चालतो. केव्हा गुर्-गुर् करतो, केव्हा घरघर करतो, केव्हा पडदा पाढरा स्वच्छ असतो तर कधी वेगळी वेगळी डिझाइनस् दाखवतो. थोडक्यात म्हणजे हिंदुस्थानात सगळ्याकडे टीव्ही असतात तसाच टीव्ही त्याच्याकडेही होता !

आज संध्याकाळी कामत व सौ. कामत राधा-श्यामचा टीव्ही पाहायला यायची होती. कारण कामत नवीन टीव्ही घेणार होते. राधानं त्याना छायागीत पाहायला बोलावलं होतं. बातम्या संपल्या होत्या. जाहिरातीची माळ सुरू झाली होती व टीव्हीवर बाकी आवाजाच्या जोडीला घरघर सुरू झाली. श्याम कामत काही विचारण्याआधीच म्हणाला, "अहो, जाहिरातीच्या वेळीच नेमकी अशी घरघर होते बघा ! पण आम्ही म्हणतो जाहिरातीच्या वेळी थोडी घरघर झाली तर काय बिघडलं ?' कामतला श्यामचं म्हणणं पटलं.

नेहमीच्या वेळी छाया गीताचा कार्यक्रम सुरू झाला व नेहमीप्रमाणे त्यात रटाळ गाणी सुरू झाली तरी टीव्हीची आपली घरघर सुरूच ! राधा कामतकडे बघत हसत हसत म्हणाली, 'अहो, छायागीताच्या वेळी नेमकं असं होतं बघा !'

'मग अश्या टीव्हीचा काय उपयोग ?'

सौ. कामत, राधा कामतांशी गुलुगुलु आवाजात बोलत होती म्हणून आधीच भड-कली होती. 'हा काय फक्त आमची माती, आमचे दगड ह्या कार्यक्रमाला वा फिल्म डॉक्युमेंटरीला छान चालतो ?'

राधाला आपण असच काहीसं कर्वेबाईंना बोलल्याचं प्रखरतेनं आठवलं ! □

पुस्तके

# टिकलीएवढं तळं

## एका तळचाचीच कहाणी

आपल्या मनाचं एक टिकलीएवढं तळं असतं. एखादी कलाकृती त्यात बिंबते. अगदी तळापर्यंत ते बिंब हेलावत आहेसं वाटतं. काही वेळानं तर त्या पाण्याशी त्या बिंबाची अशी ओळख होते की, बिंब आणि उरलेलं पाणी वेगळं अनुभवताच येत नाही. मनाचं तळं त्या बिंबाविना कधी नव्हतंच जणू !

आता आस्वादाच्या या पातळीतून वर येऊन काही स्वतःला समजावून देणं अवघडच. तरी सुद्धा आपल्याला ते आवश्यक असतं. कारण एका परीनं हा बिंब समजावून घेण्याचा शोध म्हणजे पाण्यानं स्वतःच्याच एका शक्यतेला उलगडण्याचा केलेला प्रयत्न असतो तो अनेकदा, सुखद भानाच्या एका अटळ मर्यादेत स्वत.ला सावरण्यासाठी,करावाच लागतो.

'टिकलीएवढं तळं' ही निर्मला देशपांडे यांची कादंबरी पुढं ठेवून आपण हे सागू बघतो. या कादंबरीची गोष्ट म्हटलं तर आपली आहे, म्हटलं तर आपली नाहीही. आपली अशासाठी की, यातल्या कुणा एकीचं आयुष्य, त्यातली नाती, घटना, त्यातले प्रवास, त्यातल्या क्रिया-प्रतिक्रिया याचे आपल्या सर्वसामान्य आयुष्याशी फार जुळते बंध आहेत. किंबहुना लौकिक स्तरावर त्या घटना-प्रसंगांची नुसती नोद करीत गेलो, तर ते तुमचं-माझं आपलं कुणाचंही आयुष्य होऊ शकेल, इतकी सामान्यता यात आहे.

पण तरीही ते आपलं नाही. कारण प्रत्येक क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात एकीकडे लौकिक पातळीवर येत असतो-जात असतो आणि सर्वसामान्य अर्थाचे आपल्या वाट्याला आलेले दुवे जोडून पुरे करत असतो,पण त्याच वेळी तो दुसरीकडे,प्रत्येक जगणाऱ्याच्या मनातही जन्म घेत असतो आणि काही अटळ मानसिक क्रिया-प्रतिक्रियाचे आपल्या वाट्याचे बंध निर्माण करून- जोडून अथवा तोडून-जात असतो. हे मानसिक पातळीवरचे जगणे, प्रत्येकाचे वेगळे-अगदी वेगळे असते. आणि संवेदनाक्षम व्यक्तीचे जगणे फारच कोवळे ! इथल्या 'आपली' ची संवेदना तर घटना-प्रसंगांच्या सर्वसामान्यपणाची कक्षा अशा सहजपणे ओलांडते की ते ओलंडणे जाणवूही नये आणि तरीसुद्धा त्यापेक्षा नवलाईचे असलेले त्याचे वेगळेपण लपूही नये. हे जाणवतं तेव्हा, ही कादंबरी म्हणजे त्या नवलाईचाच एक दृश्य आकार आहे हे आपण कबूल करून टाकतो.

स्त्रीनं सर्वसामान्यपणे संसार करीत राहणं. नात्यानं चालत आलेलं ज्याचं-त्याचं देणं आनंदानं देत राहणं, नवऱ्याच्या बाबतीत (एखाद्या चुकार सुराव्यतिरिक्त) अजिबात असमाधानी नसणं—हे एवढं सगळं (म्हणजे सौभाग्यच की !) असतानासुद्धा, सुखाची खरी व्याख्या विचारू पाहणारं आणखी काही तरी अनाम असं मनाला मिळत राहतं. ते जिथून मिळतं तिथे जाणारी वाट लौकिकात रेखली, तर उद्ध्वस्ततेपलीकडे हाती काही उरायचंच नाही; पण ती मनात रेखली जाते. त्यानं मनाची काही कमी तगमग होत नाही. खूप होते. वैचारिक आणि भावनिक जगाची समजूतदार मिळणी होईपर्यंत तर कडेलोटाचीही वेळ येऊन जाते. मूल्याच्या भिंती ढासळताहेत, आधाराचं छत कोसळतं आहेसं वाटतं. पण एकदा या मानस नात्यांनी वाढत जाणारी व्यक्तित्वं, त्यांची समृद्धी, त्यांचा जिव्हाळा-लळा लक्षात आला की पुन्हा सारं सावरलं जातं.

मात्र हे कोसळणं.. सावरणं..फुलणं.. सऽगळं मनातल्या मनातच! मनाच्या टिकलीएवढ्या तळ्यातली ही लाटांची घुसमट, हे तांडव, हा निवळपणा आणि इतर सगळी बिंबं सामावून घेण्याची तयारीही. म्हणून ही कहाणी कुणा एका 'आपली' ची नाही. श्रीची नाही. निशिकांताचीही नाही ; ती एका तळ्याचीच आहे असं आपण निःसंकोच म्हणतो.

कुणाचंही व्यक्तिमत्त्व त्या त्या कारणानं प्रकाशित होईल. तेवढंच करण्याचं इथलं धोरण आपल्याला आवडतं एकेका शब्दावर रेंगाळून, एखाद्या नजरेवर, स्मितावर, वाक्यावर रेंगाळून त्याचे अर्थ शोधण्याची सवय आपल्याला भावते. लौकिक घटनाप्रसंग लोलकासारखे करून त्यातले मनाचे रंगच महत्त्वाचे करणाऱ्या रेषांच्या शैलीची आठवण देणारी रचनेची लकब लक्षात राहते. रिंगणात राहूनही रिंगणापलीकडचे शोषून घेणारा वृत्तीचा स्पंज आपल्याला ओला स्पर्श करतो. अगदी सरळ साध्या निवेदनातली अकृत्रिम कळा आपल्याला हवीशी वाटते. कविता इथे अधून मधून भेटते, तीही सगळ्या अनुभवाच्या रचनेत सावरून घेऊन आस्वादली जाते मुखपृष्ठावरच्या रेखाटनाकडे कादंबरी वाचल्यानंतर पाहिलं तर कोणतीही रेषा धरून सरळ पुन्हा तळ्यात उतरता येते.

यातून आपल्या हाती काय येतं असा प्रश्न आपण आपल्याला करायचीही गरज मग/उरलेली नसते. रेषांची अवलोकिता किंवा मन आपल्याला काय देत असते ? बापटांची मानसी काय देऊन जाते ?–असे प्रश्न आपण स्वत.ला करतच नसतो. कारण इथं विश्लेषणाला एखादी कथा उरलेली नसतेच. ती एक 'होण्याची' प्रक्रिया असते. ती तर नेहमीच घडत असते म्हणून त्या अर्थानं सामान्यच असते. त्यातून आपण काही अधिक होत असतो. तेवढं ते होणं मात्र (जर जाणवलं तर) नवं असतं. आपण वाढतो कसे ? जगण्यातले काय आणि कसे स्वत साठी वेचून घेतो ? काय गाळतो आणि कशाला नवं रूप देतो ? स्वत.चा स्वतःला कसा उलगडा करून देतो आणि दुसऱ्याला स्वत.मध्ये कसं सामावून घेतो ?या सर्वांचे असंख्य संभाव्य रूपाकार आपल्याला त्या त्या वेळीच मिळून गेलेले असतात. त्यानंतर प्रश्न उरत नसतात. उरतात ती त्या लेखनकृतीची प्रतिबिंबं—मनाच्या—टिकलीएवढ्या तळातली.

—अरुणा ढेरे

टिकलीएवढं तळं
निर्मला देशपांडे
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
पृष्ठे १८४, मूल्य—२५ रु.

फिनिक्स निवड

# Music for the Chameleons

By Truman Capote
(Random House)

काही काही पुस्तके अशी होऊन जातात की त्या त्या क्षेत्रात ती नेहमीसाठी झळकतात. उदाहरणार्थ क्लॉकवर्क ऑरेंज (एन्थनी बर्जेस)– हिंसेवरचं एक भेदक, विदारक चित्रण; वेटिंग फॉर गोदो (सॅम्युएल बेके) –निराशावाद्याची गीता; परफ्युम्ड गार्डन (शेख नेफ्जवी)– भोगवाद्यांचा ग्रंथ; विंडस् ऑफ वॉर (हरमन वोक)– एक दुसऱ्या महायुद्धाचा दस्तऐवज; बिलव्हेड इन्फायडेल (शैला ग्रॅहॅम)– मद्यपीची कथा; सेपरेट रिॲलिटी, जर्नी टू इक्स्टलान, टीचिंग्ज ऑफ डॉन जुआन (कार्लोस कास्टानेडा)– मादक व गुंगी आणणाऱ्या औषधांच्या सेवनाकडून एका वेगळ्याच वास्तवतेकडे; मॅन इटर्सवरील जीम कॉर्बेटची पुस्तके; माफियावरील मारियो पुझो व व्हिन्सेंट टेरेसाची पुस्तके; लग्नजीवनातील व स्त्री-पुरुषांच्या विचारातील संघर्ष (Who is Afraid of Virginia Woolfe ? Edward Albee); वैद्यकीय व्यवसायावरील कादंबऱ्यात दि सिटॅडेल (क्रॉनिन); फिजिशियन्स (हेन्री डेन्कर); सेक्सवरचे एव्हरिबडी वॉंटेड टू नो बट वेअर अफ्रेड टू आस्क; स्पेनमधील बुलफाईटिंगवर लॅरी कॅलिन्स व डॉमिनिक, लापिएचे 'ऑर आय विल ड्रेस यू इन मोर्निंग' (mourning) : सिनेसृष्टीतील एरॉल फ्लिनचे आत्मचरित्र; कॉस्मॉलॉजीवर कार्ल सागन; आर्थर क्लार्क आणि डॅनिकेन (हो, एरिक व्हॉन डॅनिकेन) ची पुस्तके, पामिस्ट्रीमधील विल्यम बेनहॅमचे पुस्तक. हेरकथांमध्ये जॉन ल कॅरे.

अशाच एका लेखकाने बऱ्याच वर्षांपूर्वी अमेरिकन जीवनाच्या पार्श्वभूमीवरील गुन्हेगाराविषयी एक दस्तऐवज लिहिला आहे. त्याचे नाव आहे 'इन कोल्ड ब्लड'. लेखक आहे ट्रूमन कॅपोट. तसे हे पुस्तक बरेच जुने आहे; पण त्याच्या क्षेत्रात क्लासिक असल्यामुळे नेहमीच वाचले जाते. ग्रंथालय जेव्हा उघडले तेव्हा या पुस्तकाचा आणि 'द स्पाय हू केम इन फ्रॉम द कोल्ड' या दोन पुस्तकात फार गोंधळ व्हायचा. नंतर एकदा श्री. रत्नाकर मतकरी (हो ! अश्वमेधवाले! फिनिक्समध्ये !) श्री. दिलीप माजगावकर याचेबरोबर आले होते. त्या वेळी हिंसक पुस्तकाविषयी बोलणे झाले होते. मला जर बरोबर स्मरत असेल तर श्री. मतकरीनीच मला 'इन कोल्ड ब्लड'ची थोडीशी पार्श्वभूमी सांगितली होती. त्या वेळी मी त्यांना क्लॉकवर्क ऑरेंज (गोल्ड स्पॉट नव्हे !) दिले होते. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी (अश्वमेधपश्चात !) त्यांचा निरोप आला की, त्याना फिनिक्सचे मेंबर व्हायचे आहे. पण ते मुंबईत आणि दुर्दैवाने फिनिक्स पुण्यात ! नाही तर काय बहार आली असती ! डॉ. सरदेसाईंच्या डिग्रीसारखी फिनिक्सकडे येणाऱ्या साहित्यिक लोकाची यादी मारुतीच्या शेपटासारखी वाढत गेली असती! (आमच्याकडे येणारी लेखक मंडळी अशी)– ना. सी. फडके (ex.); श्री. ज. जोशी (विषय बदलण्याची चक्रावून टाकणारी गती); वि. ग. कानिटकर (रामशास्त्री –पानिपत, tongue in wig, sorry cheek) विद्याधर पुंडलिक (५६ व्या वर्षी टेनीस खेळून खेळून belly पुढे येऊन दिलीच नाही Acquiline, my dear Watson !; डॉ. अनिल अवचट (तोबा ! तोबा ! याना मी पहिले टाकायला हवे होते, पण सालं नावच असं चावट ! पटकन जिभेवर येतच नाही); श्री. वसंत शांताराम देसाई ex. (aristocratic dignity भाड्याच्या घरात राहूनसुद्धा); श्री. ग. वा. बेहेरे (Occasional, डार्क ब्लू शर्टमध्ये अगदी युरोपन !) श्री. ग. ल. ठोकळ (गोल आणि खोल); श्री. ग. मा. (नमस्कार, माताजी ! एक दिवस मी श्री. ग. माताजीना ६–७ ओळीचे थोडे गोल व खोल पत्र लिहिले. त्यानी मला २६ ओळीचे गोल व खोल उत्तर पाठविले. अधिक गोल, खोल गलठोपेक्षाही एखाद्या लेखकाचा मजकूर छापला नसेल तर या श्री. ग. मा. ना त्याच्याकडे 'माणूस' पाठवायची कोण घाई येते ! सौ लता सप्रे (नो कॉमेंटस् !), सौ. नलिनी सहस्रबुद्धे (Ibid as श्री. ज.); वैजयंती काळ (?). सौ. निर्मला कुलकर्णी (ट्राफिक सिग्नल); सौ. वसुधा माने (एकदम आउटस्पोकन, आर्टिक्युलर वगैरे) इत्यादी इत्यादी म्हणजे काही नाही!) पण श्री. मतकरीचं फेदर या फिनिक्सच्या कॅपमध्ये यायचेच नव्हते. असो ! असो ! (Parody) (अनुकरणलेख–ठणठणपाळ.)

टीप :–कोणतीही विनोदी वाक्ये मूड घाणेरडा असल्यास 'व्हल्गर' व अर्थहीन वाटण्याची शक्यता आहे !

एक–दोनदा तर श्री. कोठावळे फिनिक्समध्ये आले होते (बहुतेक प्रकाशकात सर्वात श्रीमंत !) असे कधाकधी कानावर येते की, त्यांच्या प्रकाशनव्यवसायात ते सबसिडी घालतात ! मला जर लॉटरी लागली तर ग्रंथालयात सबसिडी घालीन; पण लागेल तर शपथ ! मॅजेस्टिकची घेऊनही ! अहो, ते पुस्तकाची सुद्धा सोडत काढतात. या साहित्यात लॉटरी घुसडली तरी सर्वच कसे गप्प ? ठणठणपाळ जर ललितमध्ये लिहीत नसते तर त्यांनी त्याची Cudgel (सॉरी वुडन हॅमर) श्री कोठावळयावर निश्चितच हाणली असती; पण काय रात्रंदिन आम्हाला इमर्जन्सीचा प्रसंग ! माता दुर्गे, यू टू टू ? ठणठणपाळ, आमचे परममित्र कुण बी नाय. म्हणून आम्ही असे लिहितो !

अरेच्या, या माणूसचं रूपांतर ललितमध्ये होतेय की काय ? बॅक टू बिझनेस !

सरड्याचा रंग तीन दिवस म्हणतात त्यावरूनच या पुस्तकाचं नाव सरड्यासारखं दिलं आहे. हा कॅपोट या पुस्तकात अनेक विषय हाताळतो. गुन्हेगाराशी मिसळतो. लहानपणीच्या आठवणी काढतो. त्यामुळे त्याचे रंगढंग बदलत जातात. भोवतालच्या परिस्थितीशी, पार्श्वभूमीशी त्याची बेमालूम सरमिसळ होते. तो या पुस्तकात तीन भूमिकांचे रंग उधळतो. निरीक्षण करून मल्लीनाथी करणारा, गोष्ट सांगणारा आणि अक्षरशः पुस्तकाच्या आत शिरून भूमिका वठवणारा कॅपोट ! या शैली व तंत्रामुळे पुस्तक चांगलेच वाचनीय झाले आहे. मला कॅपोट नेहमी स्मरणात राहिला तो त्याच्या कोल्ड ब्लडमुळे. पण नतर नतर तो अमेरिकन टी. व्ही. वर चिकार वेळा यायला लागला. तिथल्या सोशलाइट व हायब्रो समाजातील लोकाविषयी बऱ्यावाईट मल्लीनाथी करणे हा त्याचा एक उद्योग होऊन बसला की काय असे मला वाटले. पुष्कळमा कमर्शियलाईझ् झाला की काय अशी शका आली; पण 'कॅमीलियन'मुळे परत कॅपोटविषयी माझ्या अपेक्षा उचावल्या.

कॅपोटचे अदर रीअल्म, अदर व्हॉईसेस

हे पुस्तक फार तरुणपणी लिहिले. त्याचे काही समीक्षकानी उत्स्फूर्त स्वागत केले. त्यामुळे कॅपोटला एक सुखद धक्का बसला. याच पुस्तकाच्या कव्हरवर कॅपोटनी स्वतःचा असा एक भन्नाट फोटो प्रसिद्ध केला होता. या काळानंतर त्याच्यावर फार टीका झाली होती.

त्यानंतर १९५८ मध्ये त्यानी ब्रेकफास्ट एट टिफेनिज लिहिले. या पुस्तकामुळे त्याला साहित्यक्षेत्रात एक अढळ स्थान मिळाले. या पुस्तकाने समीक्षकाची तोंडे बंद केली.

कॅपोट हा 'नॉन फिक्शन' नॉव्हेल्स लिहितो बर का ? त्याची 'Answered Prayers' –असाच एक कादबरीचा वेगळा प्रकार. ही कादबरी जिवत माणसापासून कॅपोटच्या डायरीतून व मित्राच्या पत्रापासून बनवलेली आहे. या कादबरीची पहिली चार प्रकरणे १९७५–७६ साली 'Esquire' मासिकात झाली होती, परंतु कॅपोटने ज्या लोकाचे चित्रण केले, ते यामुळे फार खवळले. त्यानतर १९७७ मध्ये कॅपोट एका उत्स्फूर्त, विधायक कोडीत सापडला. लेखकाला, सगीतकाराला, चित्रकाराला वेगवेगळे फॉर्म्स हवे असतात, खऱ्या कलावताना नेहमीच परंपरा मोडायची असते. कोणत्याही एका चौकटीत त्याला गुदमरल्यासारखे वाटत असत. कॅपोटचे म्हणणं असे का, खवळलेल्या वाचकामुळे नव्हे पण या कोडीमुळे, आत घुसमटून गेलेल्या कॅपोटमुळेच त्याना ती नॉन–फिक्शन कादबरी अपूर्ण ठेवली. खरं तर त्याचा हाही एक प्रकार नवीनच होता. तरी कॅपोटला त्याहूनही काही नवे हवे होते म्हणुन आणि काही नवीन मार्ग चोखाळण्यासाठी तो 'कॅमलिऑन्स' मध्ये-अक्षरशःमध्ये - शिरला व आधी सागितल्याप्रमाणे बध्या झाला. गोष्ट सागणारा झाला व भूमिका वठवणारा झाला. या त्याच्या प्रयोगाविषयी कॅपोट म्हणतो, This technique provided a framework into which I could assimilate everything I knew about writing.

कॅमलियन्समध्ये सवादातून आकार घेणारा व्यक्तिचित्रे, लघुकथा, आठवणी असे विविध कलायडोस्कोपिक डिझान्इस आहेत, त्यातील नामाकित गुन्हेगाराशी त्यानी केलेले सवाद बरेच उद्बोधक वाटतात. पुस्तक वाचून तुमच्या त नेहमीच लक्षात राहील. तरडयाच्या (Chameleon) तीन दिवसाच्या रगासारखे ते निश्चितच तुमच्या मनातून उडून जाणार नाही!

—जे. एन. पोंडा

रंगभूमी

## चंद्र जिथे उगवत नाही

### अर्थात
### मराठी रंगभूमीवर हिंदी सिनेमा

वि. वा. शिरवाडकर हे साहित्य आणि नाट्यक्षेत्रातील जबरदस्त नाव, धि गोवा हिंदू असोसिएशन ही नामवंत संस्था आणि चंद्र जिथे उगवत नाही, असं काव्यपूर्ण नाव पाहून मोठ्या अपेक्षेने या नाटकास जावे तो घोर निराशा पदरी पडते. अत्यंत जुना विषय सद्न हिंदी सिनेमा 'स्टाइल' ने रंगभूमीवर सादर केल्याने असे घडते आणि वि. वि. शिरवाडकरांकडून असे घडावे या जाणिवेने ते दुःख अधिकच तीव्र बनते.

कथानायक सतीश चिटणीस हा लष्करात बरीच वर्षे नोकरी करून काही वर्षांपूर्वी निवृत्त झाला आहे आणि आता तो एक कादंबरीकार या स्वरूपात चांगलाच स्थिर झालाय. नाव, यश, प्रतिष्ठा मिळवून बसलाय.

एके दिवशी सहजच कोर्टात गेला असता, त्याला एका खूनखटल्यातील आरोपी–वेश्या नजरेस पडते. लीला मनमाडकर ऊर्फ खुर्शीद या वेश्येला बघून सतीश खूपच अस्वस्थ होतो. ही वेश्या म्हणजेच आपली पूर्वीची प्रेयसी रूपा याची त्याला मनोमन खात्रीच पटते. तो कॉलेजात शिकत असताना त्याच्या मावशीच्या गावी तो नेहमी जात असे. तेथे मावशीच्या घरी काम करणारी ही रूपा त्याच्या मनात भरते, तिलाही तो आवडतो. शरीरसंबंध ठेवण्याएवढे त्याचे प्रेम पुढे जाते.

लष्करात नोकरीला असताना आणि दुसऱ्या एका गावी जात असताना सतीशची गाडी त्याच्या मावशीच्या गावावरून जात असते. तेथे त्याला भेटायला रूपा येते; पण ऐनवेळी कच खाऊन सतीश तिला भेटतच नाही. त्या एका क्षणाच्या प्रमादामुळेच रूपाचे जीवन उध्वस्त झाले, ही अपराधी जाणीव सतीशचे मन खाऊ लागते. प्रचंड पैसे वगैरे खर्चून तो तिला खूनखटल्यातून निर्दोष सोडवतो. नव्या घरी, नवा संसार तिच्याबरोबर थाटण्याचे ठरवतो. पण तिचे एक जुने 'गिऱ्हाईक' रूपाचा पत्ता शोधीत येते. रूपा त्याचा खून करते. या प्रकाराने हादरलेला सतीश तिला याही आरोपातून सोडवण्याचे प्रयत्न सुरू करतो.

आता, या कथेमध्ये नवीन काय आहे ? जगातील अतिप्राचीन अशा या वेश्याव्यवसायावर आतापर्यंत अगणित नाटके, सिनेमे निघाले आहेत. कथा–कादंबऱ्या निघाल्या आहेत. (आणि निघत राहतील अशी भीती आता वाटत आहे.) हिंदी चित्रपटानी तर हा विषय चावून चोथा केलाय !

'अल्लड' वयात नायक-नायिकानी प्रेम करणे, एखाद्या नाट्यपूर्ण घटनेने कलाटणी मिळणे, दोघाचे दुरावणे, नायिकेने वेश्या बनणे, खूप वर्षांनी भेट, तिला प्रतिष्ठित जीवन मिळवून देण्यासाठी नायकाची धडपड आणि शोकाचा शेवट (क्वचित सुखात) कथेतल्या तपशिलात थोडाफार फरक.

आणि हा हिंदी सिनेमा जसाच्या तसा येथे घडतो. कथेच्या हाताळणीमध्येही नवेपण किंवा नवा दृष्टिकोण वगैरे नाही. त्यामुळे नाटक फुलण्यासाठी हवा असलेला संघर्षच येथे नाही, त्यामुळे प्रेक्षक या नाटकाशी कोठेही समरस होऊच शकत नाहीत. आपणास परिचित नसलेल्या काही जणाची कथा आपण उगीचच पहात आहोत असे प्रेक्षकास वाटते आणि ते खोटं नाही.

खरे म्हटले तर ही कथा नायकाची व्हायला पाहिजे. कारण या सगळ्या दुर्दैवी प्रकाराला अप्रत्यक्ष म्हणा किंवा प्रत्यक्षपणे म्हणा तोच जबाबदार आहे. खेड्यामधली एक साधी–भोळी निरागस मुलगी नायकावर जीव जडवते, त्याला सर्वस्व देते, त्याच्या चुकीमुळे वेश्याव्यवसायाला लागते. ती चूक कळून आल्यावर प्रायश्चित्तासाठी नायकान आटोकाट प्रयत्न करावा, न केलेल्या खुनातून नायिकेची सुटका होते, पण नियतीच्या दुष्ट चक्रातून तिची पूर्ण सुटका होत नाही आणि ती दुसरा खराखुरा खून पाडते. म्हणजेच मनुष्य विरुद्ध नियती असा हा सघर्ष रंगला असता म्हणजेच नाटक नायकाचे झाले असते पण ते नायिकेचे करण्याच्या प्रयत्नात कोणाचेच न होता नायिकीचे होऊन बसले आहे.

अशा प्रकारच्या कथा असलेल्या नाटक-सिनेमांमधून नायिका कारुण्यरसाची मूर्ती व नायक दुष्ट जरी नसला तरी असहाय, अगतिक दाखवण्याची परंपरा खूपच प्राचीन आहे. नायिकेकडे सहानुभूतीचा ओघ वळवण्याचा तो एक खरा मार्ग आहे. तोच प्रकार येथेही घडतो; परंतु नायक आणि नायिका या दोघांच्याही व्यक्तिरेखा व्यवस्थित उभ्या न राहिल्यामुळे प्रेक्षकांची सहानुभूती कोणाकडेच जात नाही.

## काही शंका नायकाबाबत

सतीशचे रूपावर फार प्रेम असते, परत भेटण्याचे त्याने तिला वचनही दिलेले असते; मग त्या दोघांची भेट होऊ नये म्हणूनच सतीशला लष्करात नोकरी (कमिशन) मिळते का ? बरे, निवृत्तीनंतर सतीश दुसरे काही न करता कादंबरीकार बनतो, ते लंबेचवडे लालित्यपूर्ण संवाद बोलण्यासाठी ? का समाजाशी टक्कर घेण्याइतका बेडर आणि तेवढाच संवेदनाक्षम आणि हळवा आहे हे दाखवण्यासाठी त्याचे हे दोन पेशे ? (तसे असेल तर ते फारच बटबटीत आहे) तसेच नायक अजूनही अविवाहित आहे तो का ? तरुणपणीच अधिकारीपद मिळालेल्या, घरचे बरे असलेल्या सतीशने लग्न करून मोकळे होणे तसे पटण्यासारखे नक्कीच आहे; पण तसे तो करत नाही 'त्याच्या आयुष्यात साबणाच्या फेसाप्रमाणे' स्त्रिया येऊन जातात. तरी पण तो एकीतही का बरे गुंतून पडत नाही ? तर तो रूपाला विसरू शकत नाही हेच त्याच्यामागचे कारण असावे. आपल्यावरून जीव ओवाळून टाकणाऱ्या, आपल्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या रूपाला तो विसरू शकत नाही आणि म्हणूनच रूपाला खून खटल्यामधून वाचवण्यासाठी तो जीवाचे रान करतो. अर्थात हे झाले आपले मत. नाटकात नाटकाराने याचा कोठेही निर्देश केलेला नाही.

## कलाटणीचा क्षण

ज्या एका क्षणामुळे रूपाचे जीवन उद्ध्वस्त होते तो क्षणच मुळी नायकाच्या संभ्रमित मनाच्या दोलायमान अवस्थेतून जन्मला आहे. सतीशच्या पत्रानुसार त्याची मावशी रूपाला स्टेशनवर पाठवते, वादळी वारा व तुफान पावसाची ती रात्र असते त्या स्टेशनवर गाडी काही मिनिटेच थांबणार असते. त्या प्लॅटफॉर्मवर पावसात चिंब भिजलेली रूपा जणू काही बेहोशावस्थेत सतीशबाबू, सतीशबाबू अशा हाका मारत पळत असते ते पाहून खिडकीपाशी आलेला सतीश एकदम मागे सरकतो. का ते त्यालाही समजत नाही. ते वादळवेडं ओलंचिंब पिसाट पाहून त्याच्या मनात येतं की, हे एवढं मी मागितलं नाही, मला ते नकोय. गाडी निघते तेव्हा केवळ अर्धा क्षणच रूपा-सतीश एकमेकाना बघतात आणि रूपा उन्मळून पडते. सतीश मवाली किंवा उच्छृंखल नसूनही मनाच्या एका विशिष्ट अवस्थेमुळे तसा वागतो आणि त्या अप्रत्यक्ष नकारामुळे रूपाच्या जीवनाचा मार्ग बदलतो.

पण हा कलाटणी देणारा महत्त्वपूर्ण क्षण पूर्णपणे सांगितला गेला आहे, कोठेही तो दाखवला गेला नाही आणि त्यामुळे तो पूर्णपणे परिणामहीन ठरला आहे.

तीच गोष्ट रूपाला घरी आणल्यानंतरच्या वागण्याची प्रायश्चित्ताचा पहिला आवेश ओसरल्यानतर, सामाजिक दडपणामुळे वेश्येबरोबर, कितीही एकमेकावर प्रेम असले तरी सतीशने नवऱ्यासारखे न वागणे पटते; पण तसा उल्लेखही नाटकात येत नाही. त्यामुळे त्यातील दिवसाच्या वागण्याचे स्पष्टीकरण मिळण्यासाठी, सतीश मित्राकडून झापून घेण्यासाठी किंवा रूपाने खून करण्याची किंवा टॅक्सीत साक्षात्कार होण्याची वाट बघत असल्याचे. अशा तकलादू कारणावर आपल्याला समाधान मानावे लागते.

## निवेदन

हे नाटक अत्यंत शब्दबंबाळ, बडबडे आहे. प्रत्येक घटना निवेदनातून सांगितली जाते. असे जर का आहे तर पहिल्या खटल्याचा निकाल न्यायाधीश सांगत असतानाच 'थांबा' अशी आरोळी ठोकून नायक का येतो ? (हा परत हिंदी सिनेमातीलच प्रसंग) बरे, त्याने निकालात काहीच फरक पडत नाही' मग हा प्रसंग दाखवण्याचा अट्टाहास का ? वेश्येची व्यथा रूपाने सांगितल्यावरही झुबेदा या कुंटणखान्याच्या मालकिणीच्या तोंडी 'चंद्र जिथे उगवत नाही अशी अंधारी दुनिया !' वगैरे डायलॉग का ? रूपा कुंटणखान्यात पोचली कशी, वगैरे पुन्हा जालंदरदाराच्या तोंडून वदवले आहे. याविषयी आणि आपल्या मुलाचे काय झाले, आपण पहिला खून केला नाही वगैरे रूपा सांगते ते निवेदन वेगळेच. सतीश तर अव्याहत कथाकथनच करत असतो.

तरी पण असे हे नाटक दिग्दर्शक श्री. दामू केंकरे यानी सफाईने बसवले आहे गती कोठेही सैल होणार नाही याची त्यानी काळजी घेतली आहे. हे नाटक कधीही भडक व अतिरंजित होऊ शकेल असे नाजूक आहे; पण त्यानी तेसुद्धा टाळले आहे. (शेवटच्या खूनाच्या प्रसंगी खोलीतून लाल प्रकाशझोत नको होता). तसेच फ्लॅशबॅकमधील 'मी तर होईन चांदणी' हे गाणे छान आहे. त्या वेळच्या नायक-नायिकेच्या हालचाली पण छान आहेत; पण फ्लॅशबॅक नसता तर बरे झाले असते.

नायक सतीश चिटणीस यांची भूमिका विनय आपटे यानी ताकदीने सादर केली आहे. व्यावसायिक रंगभूमीवर त्यांची ही पहिलीच भूमिका असल्याचे कळते. या भूमिकेत त्यांनी खूप संयम दाखवला आहे. शैलीदार, पल्लेदार संवादांच्या आहारी ते गेले नाहीत. मात्र ते वाक्य बोलताना पहिल्या शब्दानंतर थांबतात. त्याचा अतिरेक होऊन त्यातील परिणामकारकता जाते ते टाळायला हवे.

मधू कांबीकरने रूपा छान उभी केली आहे; पण 'पुत्रकामेष्टी'मधील तिच्या भूमिकेपेक्षा ती जरा येथे कमी पडल्यासारखी वाटते. कदाचित संहितेतील कमकुवतपणामुळे असेल. तिला भरपूर रडण्याशिवाय तसे काम नाहीच म्हणा ! खेडवळ मुलीच्या तोंडचे संवाद म्हणताना तिची संवादफेकीची शैली छान वाटली तरी तीच पद्धत पुढे उपयोगी नाही.

जालंदरदादाच्या भूमिकेत श्री. अजय वढावकर 'भाव खाऊन जातात.' अॅड. कामत व जहागीरदार यांच्या भूमिका श्री. शशिकांत शिर्सीकरानी छान पण कृत्रिमपणे सादर केल्या. बाकी विनायक जोशी (इन्स्पे.-दोस्त प्रदीप सुर्वे), सुनील शिंदे (न्यायाधीश), श्रीमती पुष्पमाला सूर्यवंशी (झुबेदा) व चंदू पारखी (बिहारीलाल नोकर) यांच्या भूमिका ठाकठीक झाल्या एवढेच.

सरकता-हलता-फिरता रंगमंच न वापरता सीन्स बदलण्याच्या दृष्टीने उभे केलेले सरकवण्याजोगे उत्तम नेपथ्य रघुवीर तळाशीलकर याचे होते. भडक नसलेली, प्रसंगानुरूप प्रकाशयोजना दिलीप कोल्हटकर याची होती, तर पार्श्वगीतासह पार्श्वसंगीत हेही अती होत नाही, अशोक पत्की यांचे होते.

तात्पर्य, ना धड सामाजिक आशयाची कथा, ना धड प्रेमकथा, या नाटकाच्या तथाकथित वास्तवदर्शी चौकटीला न शोभणारे, क्वचित काव्यपूर्ण व लंबेचवडे संवाद असलेले हे नाटक किंवा या कथेवरून हे नाटक लिहावेसे वि. वा. शिरवाडकराना का वाटले ते न उलगडणारे कोडे आहे आणि चंद्र जिथे उगवत नाही तेथ निराशेचा व अपेक्षाभंगाचा काळामिट्ट अंधार आहे असेच खेदाने म्हणावे लागते

—निखिल गजेंद्रगडकर

चित्रपट

# चश्मेबद्दूर : इडा पिडा टळो

## उत्कृष्ट व्यक्तिचित्रे, निर्मळ विनोद, खुसखुशीत विडंबने

हिंदी चित्रसृष्टीच्या रंगेल्या दुनियेत हिरो-हिरॉइन्स-महिमा खूपच. प्रेक्षक 'अमिताभ'चा, 'हेमामालिनी'चा 'झीनत'चा म्हणून चित्रपट पहाण्यासाठी जातात. या सिताऱ्यांच्या रोशनीने दिपून गेलेल्या सर्वसामान्य प्रेक्षकांचे लेखक, दिग्दर्शक या मंडळीकडे क्वचितच लक्ष जाते. मात्र सिताऱ्याच्या झगमगणाऱ्या या दृष्टीत हृषीकेश मुखर्जी, बासू चटर्जी, बासू भट्टाचार्य, गुलजार, व्ही. शांताराम, सलीम जावेद इ. लेखक, दिग्दर्शक आपल्या स्वयंसिद्ध प्रतिभेने रसिकांचे लक्ष आकर्षून घेत स्थानापन्न झाले आहेत. यांच्या नावाकडे पाहून चित्रपटाला जाणारा मोठा प्रेक्षकवर्ग आहे याच समाननीय मालिकेत आता सई परांजपे या मराठी स्त्रीचे नाव दाखल होत आहे. 'चश्मेबद्दूर' विषयी लोक म्हणतात, 'सई परांजपेंचा 'चश्मेबद्दूर' देखा' 'सई परांजप्यांचा 'चश्मेबद्दूर' पहायचा आहे.' मुंबईतील 'अंबर,' 'सचिनम्' ही चित्रपटगृहे गाजवून चश्मेबद्दूर आता 'गंगा' 'चंदन' येथे जोरात सुरू आहे. गुल आनंदनिर्मित (PLA Production) या चित्रपटाचे कथालेखन, संवादलेखन आणि दिग्दर्शन सई परांजपे यांनी केले आहे.

यापूर्वी विजय तेंडुलकर, जयवंत दळवी या मराठी लेखकांनी कथाकार म्हणून हिंदी चित्रसृष्टीत प्रवेश केला आहे आता सई परांजपे यानी हिंदी चित्रसृष्टीत कथा आणि संवादलेखन करून दिग्दर्शनाची महत्त्वपूर्ण कामगिरीही बजाविली आहे.

सई परांजपे हे नाव महाराष्ट्राला सुपरचित आहे एके काळी त्यांनी मराठी बालनाट्यसृष्टी लेखिका आणि दिग्दर्शिका म्हणून गाजविली होती. त्यांची 'जिगोलो'सारखी उत्कृष्ट कथा आणि 'नोएल' हा ललित निबंध कुणाच्याही लक्षात रहावा असाच आहे. 'नादा सौख्यभरे' 'जास्वंदी' या नाटकानी मराठी रंगभूमीवर उत्तम यश मिळविले. दूरदर्शनावरील 'गजरा'मध्ये त्यानी सादर केलेल्या 'काकाकुवा मसाला' 'अनुराग चप्पल' यांच्या जाहिराती, 'प्राण्याची भाषा' या कार्यक्रमानी प्रेक्षकाना खूप हसविले आहे. विनोद, विडंबन हा सई परांजपे यांच्या लेखणीचा स्थायीभाव आहे. जिगोलो'सारख्या गंभीर कथेत किंवा 'जास्वंदी' या गंभीर नाटकातही विनोद वारंवार डोकावतोच.

हास्यरसातच 'चश्मेबद्दूर' सुरू होतो; फुलतो आणि संपतो. ही साधीसुधी प्रेमकथा आहे. रम्य, मनोहर, गुलाबी प्रेमकथा. मात्र खानदानकी इज्जत, अलिशान बगले, बर्थडे पार्टी, हिंस्त्र खलनायक वगैरे प्रकार नसलेली प्रेमकथा. विद्यार्थ्यांची अस्ताव्यस्त पसारा असलेली खोली, सुखवस्तू माणसांची छोटीशी बंगली, सार्वजनिक बाग, ऑफिस याच्या पार्श्वभूमीवर घडणारी प्रेमकथा.

तीन तरुण विद्यार्थी दिल्लीत एका ठिकाणी एक खोली घेऊन रहात असतात. त्यातले दोघेजण टगे आहेत-- जोमो (रवी बासवानी) आणि ओमी (राकेश बेदी) जोमो चित्रपटाचा छंदी. ओमी शेरोशायरीत दंग ! दोघांनाही अभ्यासाचे सुवेरसुतक नाही. दोघेही सदैव मुलींचा पीछा करीत मोकाटपणे फिरतात. तिसरा सिद्धार्थ (फरुक शेख) मात्र अभ्यासू आहे. तिघेही जबरदस्त धूम्रपान करणारे आहेत. लल्लन मिया (सईद जाफरी) या पानव त्याकडे त्यांची नेहमी सिगरेट्सची उधारी. एकदा जोमो आणि ओमी नेहाला (दीप्ती नवल) गच्चीवरून पहातात. ती कोठे रहाते, घरात कोण आहे वगैरे माहिती काढतात. पैजा मारून वेगवेगळ्या वेळी दोघेही तिच्या घरी जातात. कोणाचीच डाळ शिजत नाही; पण खोलीवर परत येऊन मात्र तिने आपले कसे सुदर स्वागत केले याच्या बाता ते दुसऱ्याजवळ मारतात. तीच नेहा 'चमको' साबूची विक्रेती म्हणून खोलीवर येते, तेव्हा तिची आणि सिद्धार्थची ओळख होते. त्या ओळखीतून पुढे प्रेम, नंतर मित्रांमुळे तिच्याबद्दल गैरसमज, दोघांमध्ये कलह, आजीच्या मध्यस्थीने विवाहाचा गोड शेवट !

कथा अशी साधीच आहे. वैशिष्ट्य आहे तेही कथा कशी फुलत जाते या शैलीचे. उत्कृष्ट व्यक्तिचित्रे, निर्मळ विनोद, खुसखुशीत विडंबने यानी ही कथा रंगते.

जोमो आणि ओमी उनाड, टगे आहेत सिद्धार्थ अभ्यासू आहे. तरी या तिघाची मन पूर्वक मैत्री आहे. अशा व्यक्तिमत्त्वांचा चित्रसृष्टीत एक साचा बनला आहे. अभ्यासू मुलगा पूर्णपणे निर्व्यसनी असतो. मुलींच्या बाबतीत तो इतका 'भोलाभाला' असतो की मुलीने भोवती-भोवती केले, पुढाकार घेतला तरी तो पळून जातो. इतर टगे मित्र त्याला येताजाता हास्यास्पद बनवतात; पण सभ्य मुलाचे भोळेपणच नायिकेला आवडते आणि ती त्याला माळ घालते. 'सिद्धार्थ' या साच्यातला नाही तो वेगळा आहे. अधिक वास्तव आहे अभ्यासू असला तरी या दोघाबरोबर तोही चिकार धूम्रपान करतो. एकसारखा मुलीच्या मागे फिरत नाही; पण कोणी मुलगी भेटेल, ती म्हणेल तेव्हा सिगरेट सोडायची असे तारुण्यसुलभ स्वप्न तोही पहातो. लल्लन मियाची उधारी न भागवता नवे कपडे वगैरे घेण्याचा बेछूटपणा तोही करतो. जोमो आणि ओमी यांनी कथन केलेले मुलीच्या घरी गेल्यावर ती कशीकशी गोड वागली हे किस्से रस घेऊन ऐकतो. त्याचे बोलणे सुसंस्कृत आहे. चालणे तडफदार आहे. स्वतःच्या हुशारीचा त्याला अभिमान आणि विश्वास आहे. जोमो आणि ओमी त्याला कधीही हास्यास्पद करू शकत नाहीत. अभ्यासू म्हणजे बावळट हे समीकरण या चित्रपटात मोडले गेले आहे. 'सिद्धार्थला' असा अधिक संपन्न व्यक्तिमत्त्वाचा दाखविताना इतर दोघाना कमी लेखलेले नाही. मोकाटपणे फिरत असले, बेजबाबदार वागत असले तरी ते मवाली वाटत नाही. कारण त्यांचेही वागणे तारुण्यसुलभ वाटते. नेहा

चालू मुलगी आहे. ती आमच्याबरोबर फिरली आहे असे हे दोघे सिद्धार्थला सांगतात तरी ते खलनायक वाटत नाहीत. त्याच्या अनेक उद्योगात, अतिनैसर्गिक मत्सराने केलेला तो खोडसाळपणा वाटतो. त्यात गांभीर्य नाही. म्हणून सिद्धार्थचा प्रेमभग हे गंभीर प्रकरण होत आहे असे वाटताच ते खरे बोलून मोकळे होतात तेही वास्तव वाटते; फिल्मी ट्रान्सफर सीन वाटत नाही. नेहाचे व्यक्तिमत्त्वही इतर चित्रपटाच्या नायिकांपेक्षा वेगळे आहे. हुल्लागुल्ला चित्रपटातील नायिकांपेक्षा वेगळे आहेच; पण 'रजनीगंधा' 'छोटीसी बात' यातील वास्तव वाटणाऱ्या नायिकांपेक्षाही नेहा वेगळी आहे. उस दिन आपने अनजानसे बताया था न मैं, उस क्लासमें म्युझिक के लिए जाती हूँ तो मैं आज मैं कबसे उधर चक्कर लगाता रहा' असे बोलणाऱ्या सिद्धार्थला ती म्हणते, 'मैंने अनजानसे नही, जानबुझकरही इतना सब बताया था। अगर तुम चाहो तो आ सकते हो।' बहुतेक नायिका नायकांना सिगरेट सोडण्यास सांगतात. नेहाला मात्र त्याची फिकीर नाही. ती सहजपणे म्हणते, 'चेन स्मोकर हो। छोडोगे नही।' एवढेच बोलून ती थाबत नाही तर मला पण सिगरेट ओढून बघावीशी वाटते असे म्हणते. इतक्या धीटपणे बोलणारी हिंदी चित्रसृष्टीतील ही पहिलीच नायिका असेल! फोनवर बोलताना, बागेत फिरत असताना, गाताना सगळीकडेच ती सिद्धार्थबरोबर अतिशय अकृत्रिमपणे आणि खेळीमेळीने मनमोकळे वागते.

चित्रपटात क्षणाक्षणाला विनोद आहेत. या विनोदात शाब्दिक कोटया नाहीत. खटकेबाज संवाद नाहीत. कोणाचा उपहास नाही. ( विडंबन असले तरीही ) आचरट, चावट सूचक अर्थ नाहीत. अतिशय निर्मळ, म्हणूनच श्रेष्ठ दर्जाचा असा या चित्रपटातील विनोद आहे. चेहऱ्यांच्या भावामधून विनोद निर्माण झाला आहे. प्रसंगाच्या दृश्यस्वरूपातच अनेकदा विनोद आहे. बोलण्याच्या गंमतीदार संदर्भात विनोद आहे. आपल्या कागदावरचे कॉलम भरण्यासाठी सिद्धार्थची माहिती विचारणाऱ्या नेहाला सिद्धार्थ फुशारून सांगतो, 'मैं एम. ए. फर्स्ट क्लास हूँ! PhD कर रहा हूँ!' आणि नेहा पुढचा प्रश्न विचारते, 'साबून कौनसा इस्तेमाल करते हो?' हा साधा संवाद-उत्कृष्ट विनोद-वरच्या मजल्यावरून जोमो आणि ओमीने केलेले नेहाचे निरीक्षण, लगोलग तिची माहिती काढण्यासाठी त्यांची धावपळ, त्या वेळचे त्यांचे चेहऱ्यावरचे भाव पाहूनच हसू येऊ लागते. नेहाच्या भावाचे खलनायकाच्या भूमिकेत चमकण्यासाठी चाललेले परिश्रमही खूप हसू आणतात. नेहाचे बसस्टॉपवर स्वतःच्याच तंद्रीत ताना घेत उभे रहाणे, नेहा दाराशी आलेली पाहून जोमो आणि ओमीचे पळून जाऊन स्लॅबवर उभे रहाणे, नटयाची उघडीवाघडी चित्रे लावलेल्या त्या तिघांच्या खोलीत नेहाच्या आजीने येऊन बसणे, सिद्धार्थने नेहासाठी मगमध्ये लाडू घालून आणणे ही दृश्येच अतिशय गंमतीदार आहेत. ती पहाण्यातच सगळी गंमत आहे!

हिंदी चित्रसृष्टीवरील विडंबने हे या 'चश्मेबद्दूर' चित्रपटाचे आकर्षण आहे. नेहाने आपले कसे कसे स्वागत केले, तिच्याबरोबर आपण कसे मजेत फिरलो हे ओमी आणि जोमो सांगतात तेव्हा हिंदी चित्रपटातील सर्व प्रकारची प्रणयदृश्ये विडंबनात्मक पद्धतीने दाखवली आहेत. त्यात होडीतले फिरणे आहे गाणे आहे. बागेतले नाचणे आहे. जोरजोरात पियानो बडवणे आहे. घागरा घालून डोक्यावरून ओढणी घेऊन धावणे आहे. होडीत गाताना ओमी आणि नेहा यांच्या दाखवलेल्या प्रोफाइल्स म्हणजे या विडंबनाचा उच्चतमबिंदू (climax) आहे. अशीच विडंबने इतरत्रही विखुरलेली आहेत. नेहा 'चालू' आहे असे आपण सिद्धार्थला सांगून टाकू असे ओमी आणि जोमो ठरवतात तेव्हा 'दोस्त दोस्त–' हे पार्श्वसंगीत, मुलगी पटवण्यासाठी रुमालाची युक्ती का योजावी हे ठरवताना जोमो आणि ओमी याना आठवणारा अमिताभ-रेखाचा चित्रपटातला रुमालाचा प्रसंग हीही अतिशय सुंदर कलात्मक विडंबने आहेत; परंतु दोन विडंबने मात्र तितकी चागली जमलेली नाहीत. नेहा जेव्हा आपण लग्न ठरविल्याचे वडिलांना सांगते तेव्हा वडील तिच्या आजीला म्हणतात, 'मेरा औरही कोई इरादी है।' हे वाक्य अगदी 'मैं ये शादी नही होने दूँगा। मेरा खानदान-' या स्टाइलवर वाटते; पण बाकी प्रसंग अगदी साधा आहे. त्यामुळे या विडंबनाचा परिपोष बरोबर होत नाही. चित्रपटाच्या शेवटी सिद्धार्थचा पराक्रम नेहाच्या मनावर बिंबवण्यासाठी, नेहाची आजी आणि जोमो, ओमी एक घाट घालतात. नेहाला जोमो आणि कपनीने टॅक्सीने पळवायचे. सिद्धार्थला आधीच तेथे बोलवून ठेवायचे म्हणजे तो तिची सुटका करेल, असा, सिद्धार्थ मित्रानी सागितल्याप्रमाणे हजर असतो; पण नेहाला एक टॅक्सीवाला खरोखरच पळवून नेऊ लागतो. सिद्धार्थ पाठलाग सुरू करतो. जोमो–ओमीची टॅक्सी नंतर आल्यावर दादीमांला नेहा खरीच पळवली गेल्याचे कळते. मग जोमो वगैरे त्याचा पाठलाग करतात. मारामारी होते. नेहाला सोडवले


तिसरी आवृत्ती संपत आली

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी ( सचित्र )

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

जाते. लल्लन मिया पोलिसाना घेऊन येतो. त्या मारामारीची सुरुवात, ते शेवटी पोलिसांचे येणे, बक्षीस देणे हे सर्व प्रसंग हिंदी चित्रपटातील मारामारीचे विडंबन आहे असे जाणवते. त्या वेळचे अभिनय, पाण्यात धडपडणे सगळे विडंबनात्मकच आहे; परंतु प्रसंग मात्र खरा आहे. यामुळे विडंबनाचा तोल ढळतो. ही जोमो आणि ओमीने आणखी मित्र घेऊन केलेली खोटी मारामारी असती तर ती त्यांच्या चित्रपटवेडाला आणि विडंबनाला साजेशी झाली असती.

चित्रपटाच्या कथानकात एक लहानसा दोष आहे. नेहावर चिडलेला सिद्धार्थ तिचा आपल्या खोलीतला फोटो फाडून टाकतो. त्यानंतर नेहाची दादीमाँ खोलीवर येते तर नेहाचा फोटो, भिंतीवर पाहते; हे कसे ? फोटो फाडून टाकल्यानंतर जोमो ओमी सिद्धार्थचा नेहाबद्दलचा गैरसमज दूर करतात; पण गैरसमज दूर झाला की, फोटो लगेच भिंतीवर कसा येतो ? त्याच्याकडे दोन प्रती असू शकतात असे मानायला हरकत नाही. हा अगदी लहानसा दोष आहे; पण तो आहे.

सर्वच कलाकार चेहरा, शरीरयष्टी, अभिनय या दृष्टीने आपापल्या भूमिकांसाठी योग्य वाटतात. 'एक बार फिर' या चित्रपटात प्रथम दीप्ती नवल आली. ती आली. तिने पाहिले, तिने जिंकले, असे तिच्या बाबतीत म्हणावे लागते. 'चश्मेबद्दूर'-मधील नेहाच्या तिच्या भूमिकेने तिची लोकप्रियता आणखीच वाढविली आहे. सडपातळ शरीरयष्टी, बोलके डोळे, चेहऱ्यावरचे निष्पाप, रम्य, खेळकर भाव, राग–अनुरागाच्या सूक्ष्म छटा यामुळे दीप्ती नवल याची 'नेहा' रसिकांचे लक्ष आकर्षून घेते. फरुक शेख याना यापूर्वी 'गमन' चित्रपटाच्या नायकाच्या-हुसन गुलामच्या-भूमिकेत पाहिले होते. त्या वेळी सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकच एक बापुडवाणा भाव त्यांच्या चेहऱ्यावर होता. अभिनयसामर्थ्य त्याच्या ठिकाणी आहे असे ती भूमिका पाहून मुळीच वाटत नव्हते; परंतु 'चश्मेबद्दूर' मधला सिद्धार्थ पहाताना वाटते येथे हीच व्यक्ती पाहिजे, दुसरे कोणीही चालणार नाही! एक सुसंस्कृत, उमदा, अभ्यासू आणि उत्कट वृत्तीचा तरुण उभा करावा तर फरुक शेखनीच असे 'सिद्धार्थ'ची भूमिका पाहून वाटते. संगीताच्या बाबतीत मी अनाडी आहे, इकॉनॉमिक टाइम्स मी आवडीने वाचतो, मुलीशी कसे वागायचे मला कळत नाही, असे जे तो स्वत.बद्दल बोलतो, त्याची प्रतीती त्याच्या चेहऱ्यावरील भावात, एकंदर व्यक्तिमत्त्वात येत रहाते. दिग्दर्शक कलाकारात किमया घडवून आणतो म्हणतात त्याहीमुळे 'गमन' आणि 'चश्मेबद्दूर'च्या त्यांच्या भूमिकेत एवढा फरक पडला असेल. रवी वासवानी (जोमो) आणि राकेश बेदी (ओमी) यांची जोडी नायक-नायिकेइतकीच रसिकांना आवडली आहे. 'सईद जाफरी'नी 'एक बार फिर'मध्ये बाजूची भूमिका असून रसिकांचे लक्ष आकर्षून घेतले होते तसेच 'चश्मेबद्दूरमधे'ही त्यांनी लल्लनमियाच्या भूमिकेत रंग भरला आहे. लीला मिश्रा, रंजन गरेवाल, विनोद जोशी, चमन बग्गा, जोनशॉ, मदन शर्मा, कमल नाथानी, कीमती आनंद, कमला, विनोद नागपाल, रविकिरण शास्त्री, अलका नुपुर, शीव, राजेंद्रन्, विनी जोगळेकर, पार्थ रॉय इ. अनेक कलाकारांनी या चित्रपटात लहान-मोठ्या भूमिका केल्या आहेत.

वीरेंद्र सयानी यांच्या छायाचित्रणाने बगीचा, रस्ता, बसस्टॉप, बंगले, वरच्या मजल्यावरची खोली या सर्व ठिकाणचे वातावरण अचूक टिपून उचित परिणाम साधले आहेत. इंदु जैन यांची गीते, 'राजकमल' याचे संगीत आणि शैलेंद्र सिंग, हरिहरन्, आनंदकुमार सी, हेमती शुक्ला याच्या पार्श्वसंगीताने चित्रपटाची रंगत वाढविली आहे.

'चश्मेबद्दूर' या शब्दाचा मराठीत भावार्थ 'इडा पीडा टळो!' नेहा आणि सिद्धार्थ याच्या प्रेमावरची इडापीडा टळते.

सई परांजपे यांचा 'स्पर्श' हा चित्रपट पारितोषिकविजेता म्हणून वास्तविक आधी गाजला; परंतु अजून तो प्रेक्षकांच्या पुढे आलाच नाही. 'चश्मेबद्दूर' मागून येऊन पुढे गेला. आता प्रेक्षक 'स्पर्श'ची आणखी उत्सुकतेने वाट पहात आहेत.

सध्या मराठी चित्रपट गुणवत्तेच्या दृष्टीने फार कमी दर्जाचे वाटतात. या प्रतिभावंत मराठी लेखिका, दिग्दर्शिकेचा लाभ मराठी चित्रसृष्टीसही व्हावा.

— विनया खडपेकर

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**